
साप्ताहिक
# माणूस

२८ जानेवारी ८४ । दोन रुपये





## इचलकरंजी हिंदू एकता

## सेवा संघर्ष

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : पस्तिसावा

¤

२८ जानेवारी १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार..

### या आपल्या ' महान ' देशात

¤ एका मन विदीर्ण करणाऱ्या घटनेबद्दल केवळ सुस्कारे सोडणारे हे पत्र. ती घटना म्हणजे अरबी फासात अडकलेल्या निरपराध भारतीय मुलींच्या व्यथेची करुण कहाणी. तुम्ही ही करुण कहाणी ' माणूस ' मधून सुरू केली हे तुमचे एक माणूस म्हणून आणि संपादक म्हणूनही धैर्य आणि ज्याने प्रत्यक्ष मिरजेत जाऊन या सर्व भीतीदायक आणि तितक्यात करुन कहाणीचे चित्रण केले; करीत आहेत त्या श्री. सुभाष काळे यांच्याही धैर्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

सोळाव्या शतकात गुलामांचा आणि तरुण मुलींचा बाजार या देशात भरत होता. आजचे हे विसावे शतक आहे. देशाने पारतंत्र्य मागे टाकून पस्तीस वर्षे झाली. त्या अगोदरचा शंभर वर्षांचा इतिहास स्फूर्तीदायकच आहे. राममोहन रॉयपासून महात्मा गांधींपर्यंत आणि सावरकरांपासून सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत असंख्य लोकांनी आपले गतवैभव मिळविण्यासाठी आपल्या जीवनांचा महायज्ञ केलेला आहे.

आपली संस्कृती जगातल्या अत्यंत प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. तिच्या इतिहासाचे जगात पाठांतर केले जात आहे जगातील मोठमोठे विद्वान आणि तत्वज्ञ तिचा अभ्यास करण्यात गढून गेलेले आहेत. त्या आपल्या महान देशात सध्या काय घडत आहे ? दररोज निरपराधी स्त्रियांचे खून पडत आहेत. दिवसा ढवळ्या मोठमोठाल्या बँकांवर लाखो रुपयांचे दरोडे पडत आहेत. विरुद्ध पक्षाचे आमदार फोडण्यासाठी पैशांच्या थैल्यातून अमाप द्रव्याचा पाऊस पडत आहे. गुंडांना प्रतिष्ठा लाभत आहे आणि विद्वान तपस्वी अभ्यंकरशास्त्रीसारख्या वयोवृद्धांचे खून पडत आहेत.

प्रत्येक भारतीयाच्या मनात दिवस उगवल्यापासून भीतीचे आणि काळजीचे साम्राज्य सुरू होते आणि रात्रीच्या झोपेत देखील त्याला सुखशांती मिळत नाही. पंतप्रधान अगदी निर्लज्यपणे देशातील भाववाढीचे समर्थन करतात आणि तितक्याच निर्लज्जपणे देशाच्या गरिबीविषयी कनवाळाही दाखवितात ! आमदार एकनिष्ठतेच्या आणि देशाचा स्वाभिमान जपण्याच्या शपथा घेतात आणि लायक व विद्वान लोकांच्या साहाय्याने राज्य करण्याऐवजी गुंडांना हाताशी धरतात. देशाचे स्वास्थ्य जपणाऱ्या पोलिसांची यंत्रणा तर त्यांनी अगदी पोखरून टाकलेली आहे. न्याय संस्थेवर कुरघोडी करण्याचे या राजकारण्याचे प्रयत्न तर रात्रंदिवस चालूच आहेत.

थोडक्यात म्हणजे अगदी पाहता पाहता सर्व समाज या राजकारणी लोकांनी नासवून टाकलेला आहे.

दुसऱ्या देशातील रानटी लोकांना आपले यजमान म्हणून हे लोक मोठ्या मानाने वागवीत आहेत. त्यांच्या पाशवी आणि कामुक चाळयांच्या आगीत येथील निरपराध मुलींच्या आहुती देत आहेत. हे किती भीषण आहे, किती लाजिरवाणे आहे ? मिरज, सांगली ही वसंतदादांची कर्मभूमी आणि वसंतदादा हे आपले मुख्यमंत्री ! आपल्या घरातच चालणाऱ्या या अनाचाराकडे या महोदयाचे लक्षच नाही आणि यांच्या पत्नीचे काय ? दुसऱ्या पक्षातील आमदार फोडण्याचा यानी विडा उचललेला. खरे तर या दोघानी आईबापाप्रमाणे आपल्या या गावाचा साभाळ करावा ! पण त्यांना स्वाभिमानापेक्षा, देशाच्या प्रतिष्ठेपेक्षा सत्तेची हाव अधिक.

परंतु आजकाल सत्तेच्या जोरावर अमाप पैसा मिळविला जात आहे आणि पैशाच्या जोरावर देशाचा स्वाभिमान विकत घेतला जात आहे.

तुमच्या अंकातील हे लेख वाचून मन विदीर्ण झालेले आहे. देशाचे भवितव्य सर्व

मुखपृष्ठावरील छायाचित्रात : १. गांधीचौकातील शपथविधी.
शपथ देताना श्री. अजित पाटील (फेटा बांधलेले) बाजूला श्री. मुरदंडे, श्री. मदन चव्हाण, श्री. हिंदुराव पाटील, श्री. ताटे.
२. हिंदु एकता : जट निर्मूलन प्रसंगी.

बाजूनी थोडक्यात आलेले आहे. या देशाचे शेवटी काय होणार आहे ? आपण सारे कोठे जाणार आहोत.

तुमच्यासारखे संपादक आहेत आणि सुभाष काळे यांच्यासारखे निधडच्या छातीचे वार्ताहर आहेत म्हणून देशाचे चित्र डोळयां-समोर तरी उभे राहू शकते, नाही तर हे सारे अंधाराचेच साम्राज्य झाले असते !

आपला

१५ जानेवारी ८४ वि. शं पारगावकर

पुणे

◘ 'माणूस' साप्ताहिकाचे इतर नियत-कालिकांहून खास असे वैशिष्टय आहे. त्यातील लेख, गोष्टी व स्फुटे आवडणारा एक वेगळा वाचकवर्ग निर्माण झाला आहे. विचारांना चालना देणारे, समाजाला दिशा दाखवणारे, बुद्धीची तहान भागवणारे असे त्यातले लिखाण असते. दिवाळी अंकातील 'लग्न व सहजीवन' हा विशेष लेख फारच आवडला. स्त्रियाच्या प्रश्नाकडे समाजाचे प्रकर्षाने लक्ष वेधू लागले आहे ही गोष्ट जाणवली. हा लेख लग्न झाले-ल्याना, लग्नाला उत्सुक असलेल्याना मार्गदर्शक व विचारप्रवृत्त करणारा आहे. लेखाबद्दल शोभा भागवत याचे मन:पूर्वक अभिनंदन. सतत अशा दर्जेदार लिखाणाची 'माणूस'कडून अपेक्षा.

१४ डिसेंबर १९८३ सौ. ज्योत्स्ना द पेंडसे

वरळी, मुंबई

**सहजीवन आणि नवी कुटुंबसंस्था**

'लग्न आणि सहजीवन' या दिवाळी अंकातील लेखावर वाचकांच्या ज्या प्रतिक्रिया आल्या त्याआधारे एक परिसंवाद व प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम 'माणूस'तर्फे योजण्यात आला आहे. सर्वांनी यावे.

रविवार दि. २९ जानेवारी ८४

टिळक स्मारक मंदिराचे सभागृह पुणे.

संध्याकाळी ४ ते ७.

# दोन शेतकरी आंदोलने

श्री. ग. मा.

चळवळ खरोखरच नवी असेल तर तिच्या वाढीबरोबरच नवे नवे शब्दही जन्मास येतात. हे शब्द चळवळीला पुढे तर नेतातच; पण तिचा आशयही अधिकाधिक समृद्ध व व्यापकही करतात. अशा शब्दांमुळे चळवळ वाढते व चळवळीमुळे शब्दानाही ताकद व आधार लाभतो. महाराष्ट्रातली शरद जोशी यांची शेतकरी चळवळ या-पूर्वीच्या शेतकरी चळवळीपेक्षा निश्चित नवीन व वेगळी होती. ती स्वाभि-मानाने व शेतकऱ्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वा-वर उभी राहू पाहत होती. स्वातंत्र्य-चळवळीत टिळकपर्वाचे जे स्थान होते तेच स्थान शेतकरी चळवळीत शरद जोशी-पर्वाचे आहे, असेही म्हणता येईल. अर्ज-विनंत्यांचा अगोदरचा नेमस्ताचा मार्ग टिळकांनी सोडून दिला व स्वरा-ज्याच्या मागणीमागे जनतेचे बळ उभे करण्याच्या प्रयत्नाला ते लागले. तसेच काहीसे शरद जोशीच्या शेतकरी संघ-टनेचे कार्य आहे. दान म्हणून विका-साच्या काही चार-दोन योजना शेत-कऱ्यांच्या पुढ्यात शासनकर्त्यांनी टाकणे हा यापूर्वीचा खाक्या. राज्यकर्त्यांचा किंवा ग्रामीण विकास कार्यक्रमात सह-भागी असलेल्या बहुतेकांचा आजवरचा दृष्टिकोन असा की, शेतकरी मागास-लेला आहे, त्याला आपण–पुढारलेल्या मंडळींनी, उपकार म्हणून काही द्यायचे आहे; त्याला मदत करायची आहे. शाळा, वीज, पाणी, रस्ते, दवाखाने या रूपाने ही मदत आजवर आपण शेत-कऱ्यांना देतही आलो; पण शेतकऱ्याचे दास्य यामुळे काही कमी झाले नाही. तो राज्यकर्त्यांच्या, निरनिराळ्या विकाससंस्थांच्या जाळयात अधिका-धिक गुरफटून मात्र गेला. त्याचे पराव-लंबन वाढले. शरद जोशी याच्या शेत-करी चळवळीने शेतकऱ्याला अधिका-धिक परावलंबनाकडे, कर्जबाजारी-पणाकडे, गुलामीकडे नेणाऱ्या या मार्गाचा त्याग केला व दान नको, मदत नको, शेतकऱ्याला त्याच्या श्रमाचा योग्य दाम द्या, हा दाम त्याला मिळाला की, आपला विकास तो स्वबळावरच व स्वकल्पनांप्रमाणे हवा तसा साधून घेईल, अशी शेतकऱ्याचा स्वाभिमान जागवणारी, त्याला त्याच्या श्रमाची, कर्तृत्वाची ओळख पटवून देणारी भूमिका मांडली व तिच्या आधारे प्रत्यक्ष आंदोलनेही उभी केली. शेतकऱ्याच्या हाती पूर्वी अर्ज-विनंत्यांची भेंडोळी होती. त्याऐवजी शरद जोशी यांच्या चळवळीने त्यांच्या हाती आसूड दिला. चळवळ सुरू होऊन जेमतेम पाच-सात वर्षेच झाली; पण या आसुडाचा प्रभाव एवढा की, बहुतेक राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात 'शेती मालाला योग्य भाव द्या' या शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागणीला ठळकपणे स्थान दिले व राज्यकर्त्यांनाही या मागणीला यापुढे डावलणे अशक्य करून ठेवले आहे. ही मागणी फक्त श्रीमंत शेतकऱ्याची आहे अशी या चळवळीवर डाव्या विचा-राच्या मंडळींकडून सुरुवातीपासून टीका होत आहे; पण मराठवाड्यात

श्रीमंत शेतकरी किती आहेत ? तिथेही चळवळीला आता वाढता पाठिंबा लाभतो आहे. महाराष्ट्रातला कादा उत्पादक हा काही श्रीमत शेतकरी म्हणून गणला जात नाही. चळवळीची सुरुवातच मुळी या कांदा-उत्पादकाला योग्य भाव मिळाला पाहिजे या मागणी-पासून झाली. ऊस-उत्पादकातही सगळेच श्रीमंत नाहीत. साखर-सम्राट तर अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच निघतील. निपाणीचे तबाखू-आंदोलन मुख्यत: मध्यम शेतकऱ्यानीच लढवले. प्रश्न श्रीमंती-गरिबीचा नाही. प्रश्न शेतकऱ्याच्या स्वाभिमानाचा, आत्मप्रतिष्ठेचा आहे. शरद जोशींनी शेतकऱ्याचा स्वाभिमान जागा केला. त्याच्यावर होत असलेल्या अन्यायाची त्याना जाणीव करून दिली. या जाणिवेतून चीड निर्माण झाली, चळवळ उभी राहिली. महाराष्ट्राबाहेरही तिचा प्रभाव पडला. लाचार, गरजू, दयेची याचना करणारा शेतकरी 'योद्धा' शेतकरी झाला! तो दान मागण्याऐवजी हक्क मागू लागला. अगदी थट टिळकांची भाषा त्याच्या तोंडी येऊ लागली. नुकतेच येवले येथे शरद जोशी याचे भाषण झाले. या भाषणात ते म्हणाले : पुढारी मते मागण्यासाठी शेतकऱ्याच्या दारात आला तर त्याला फक्त शेतमालाच्या भावाबद्दल काय ते बोला एवढेच निक्षून सागा ! शेतीमालाला रास्त भाव मिळवणे हा शेतकऱ्याचा श्रमसिद्ध व जन्मसिद्ध हक्क असल्याने लाचारीने पुढाऱ्याकडे काहीही मागू नका. हक्काने तेवढेच घ्यायचे ही भूमिका ठेवा. ( केसरी, १८ जानेवारी १९८४ ) टिळकानी फक्त स्वराज्य हा माझा 'जन्मसिद्ध' हक्क आहे एवढेच म्हटले. शरद जोशी यानी 'श्रमसिद्ध हक्क' हा नवीनच शब्द वापरला. शेतकरी जो योग्य भावाची मागणी करतो तिचा आधार उपकार किंवा भीक हा नाही. श्रमाची योग्य किंमत व्हावी हा त्याचा हक्क तो प्रस्थापित करू पाहत आहे. हा केवळ 'जन्मसिद्ध हक्क नाही. तसे पाहायचे तर स्वातंत्र्याशिवाय दुसरा कुठलाच हक्क माणसाला 'जन्मसिद्ध हक्क' म्हणून सांगता येणार नाही. बाकीचे सर्व हक्क प्रयत्नावर, श्रमावर, कौशल्यावर मिळवावे–राखावे लागतात. शेतकरीकुळात जन्मास आला म्हणून शेतीमालाला योग्य भाव मिळाले पाहिजेत अशी कुणी मागणी करू शकत नाही. मी शेतीचे काम करतो, श्रम-कौशल्य वापरून शेती पिकवतो, म्हणून मला योग्य भाव मिळाले पाहिजेत, असे भाव न मिळू देणारी अर्थव्यवस्था बदलली पाहिजे, ही मागणी आधुनिक मूल्याना धरून आहे, पूर्ण नैतिक आहे. औद्योगिक क्षेत्रात ही भूमिका, ही मागणी मान्य झालेलीच आहे. मग शेती-शेतकरी क्षेत्रात ती मान्य का होऊ नये ? पण डावे विचारक–प्रचारकसुद्धा विनाकारण घोळ घालून हा शेतकऱ्यांचा साधा 'श्रमसिद्ध' हक्क त्याला लाभू द्यायला तयार होत नाहीत. श्रीमंत शेतकरी–गरीब शेतकरी हा भेद असेल–आहेही; पण कामगार-कामगारातही हा भेद आहे. म्हणून कामगारांचा श्रमसिद्ध हक्क कुणी नाकारत नाही. अगदी बँकेत–आयुर्विमा मंडळात तो काम करीत असला तरी. श्रीमंत–गरीब शेतकऱ्यांमधले अंतर कमी करण्याचे जे काही प्रयत्न व्हायचे ते होऊ द्यात; पण सगळा शेतीधंदाच तोट्यात चाललेला आहे, तो प्रथम योग्य बाजारभाव देऊन सुस्थिर पायावर उभा केला पाहिजे, यासाठी शेतकऱ्याच्या श्रमाचे मोल ठरवा, ते त्याला मिळू द्यात, ते ठरवताना त्याला विश्वासात घ्या. एवढेच शेतकरी संघटनेचे प्रतिपादन आहे व ते व न्याय्य तर्कसंगतही आहे. उद्योगधंद्यात श्रमाचे मोजमाप, त्यानुरूप वेतन हे तत्त्वतः व काही प्रमाणात व्यवहारातही मान्य झालेले आहे. मग हीच पद्धत शेती-क्षेत्रात का लावली जाऊ नये ? मानवी श्रम जर सारखेच आहेत तर शेती आणि उद्योगधंदे यातल्या श्रम-मोजणीत व वेतनपद्धतीत जमीन-अस्मानचे अंतर ठेवून कसे चालेल ? दाम श्रमाप्रमाणे कौशल्याप्रमाणे ठरवा, मग ते श्रम उद्योगधंद्यातले असोत किंवा शेती क्षेत्रातले असोत. 'श्रम एव जयते' अशी नुसती बोधवचने, घोषणा नकोत. प्रत्यक्षात समान काम, समान दाम अशी स्थिती उत्पन्न करून, श्रमाला प्रतिष्ठा मिळते असा अनुभव लोकांना येऊ द्या. असा अनुभव आज शेतकऱ्याला, बहुसंख्य देशवासियांना येत नाही. बँकेतल्या शिपाई-कारकुनापेक्षा लहान शेतकरी दसपट तरी काम करतो, काळज्या वाहतो. तरी तो कर्जबाजारी, सारखा बँकेच्या दारातच ! आणि बँकेतला शिपाई कर्मचारी मात्र आरामात ! या भेदभावाला अनुलक्षूनच शरद जोशी यानी 'भारत' आणि 'इंडिया' अशी शब्दयोजना केली. शहरे आणि खेडी असे हे द्वैत नाही. शब्द जुनेच आहेत; पण नव्या अर्थाने ते वापरले गेले. शेतकरी चळवळीमागील विचार त्यामुळे चटकन लोकांपर्यंत पोचू शकला 'श्रमसिद्ध' हा शब्द मात्र नवीन, त्यामागील आशय व अर्थही नवीन. शेतकरी चळवळ ही एक वर्धिष्णु चळवळ आहे याची ही एक खूणच मानावी लागेल. असे नवे शब्द पुढे

येतात, ते चळवळीला पुढे नेतात, चळवळ आणि शब्द असे हे एक अद्वैत असते.

### उरण-पनवेल आंदोलन

उरण-पनवेलचे जमीन बचाव आंदोलन जरी शेतकऱ्यांचे असले तरी त्याचा विचार मात्र वेगळा करावा लागेल. आदोलन करणारे शेतकरी सर्व अल्पभूधारक आहेत. त्यांच्या जमिनींना थोडी जास्त किंमत मिळाली तर सामाजिक-आर्थिक न्यायाच्या आजच्या कल्पनांना ते धरूनच आहे. या दृष्टीने हे आंदोलन गोळीबार करून पोलिसी बळाचा अतिरेकी वापर करून सुरुवातीलाच चिरडून टाकण्याची महाराष्ट्र शासनाची कृती निषेधार्हच आहे. वाटाघाटींनी, थोडी देवाणघेवाण करून हा प्रश्न सोडवणेच उभयपक्षी हिताचे ठरले असते, असेच नंतरच्या घटना पाहता कुणीही म्हणेल. पण चाकण–नाशिक–निपाणीचे शेतकरी आंदोलन आणि हे उरण–पनवेलचे आंदोलन यात एक मूलभूतच फरक आहे. एक आहे जमिनीतून वर आलेले, स्वाभाविक पद्धतीने वाढत जाणारे व शेतकऱ्यांनीच उभे केलेले. याउलट उरण–पनवेलचे आंदोलन मुख्यत: स्थानिक आहे, अचानक पेटलेले-भडकलेले आहे व पुढारपण शेतकऱ्यांऐवजी राजकारणी नेत्यांकडे असलेले आहे. उरण–पनवेलच्या शेतकऱ्यावर गोळीबार–लाठीमार झाल्यावर सर्व पक्षांचे आजीमाजी पुढारी घटनास्थळी धावून गेले; हे ठिकच झाले. पण नासिकच्या ऊस आदोलनाच्या वेळी खेरवाडी स्टेशनवर असाच गोळीबार झाला, माणसे मेली. निपाणीला तर शांतपणे रस्त्यावर बसलेल्या शेतकऱ्यांच्या मोठ्या जमावावर बेछूटपणे गोळ्या झाडल्या गेल्या. बारा-तेरा माणसे जागच्या जागी ठार झाली; पण या दोन्ही वेळी, महाराष्ट्रात वा कर्नाटकात, निर्घृण व विनाकारण गोळीबार करणाऱ्या शासनावर विरोधी पक्षांनी, वृत्तपत्रांनी आगपाखड केली का ? गोळीबारात ठार झालेल्यांच्या त्या वेळी प्रेतयात्रा निघाल्या नाहीत, महाराष्ट्र–मुंबई बंदचे पुकारेही झाले नाहीत, बड्याबड्या वृत्तपत्रांनी आंदोलनाचे फोटो–वार्ता हात राखूनच दिल्या व शासनाचा जळजळीत निषेध करणारे अग्रलेख तरी कुठे झळकले ? शेतकरीप्रेमाचा आज बड्या वृत्तपत्रांना व विरोधी राजकीय पक्षांना फुटलेला पान्हा तेव्हा का आटला होता ? आणि आजच हा अचानक का दुथडी भरून वाहत आहे? निवडणुका जवळ आल्या हे एक कारण तर उघडच आहे. पण यापेक्षा मूळचे कारण हे आहे; पनवेल–उरणच्या शेतकऱ्यांची मागणी मान्य झाली न झाली, तरी प्रचलित व्यवस्थेला त्यामुळे कोणतेच धक्के बसणार नाहीत; उलट शरद जोशीप्रणित शेतकरी आंदोलनाची मागणी मूलभूत बदल घडवून आणणारी आहे. आजचे सत्ताधारी व विरोधक एकाच वर्गातले आहेत; पण शेतीमालाला किफायतशीर भाव मिळून शेती धंदाच नफ्यात चालू लागला तर उद्योगधंद्याचे आजचे वर्चस्व कमी होईल, त्यावर आधारीत शहरी जीवनाचे महत्त्वही ओसरेल. म्हणून 'श्रमसिद्ध' मागणी असूनही शरद जोशी एकाकी. त्यांचे आदोलन चिरडून-झोडपून काढले गेले तरी त्याकडे दुर्लक्ष; अगदीच लक्ष द्यायची वेळ आली तर टीका आणि टिंगल-टवाळी; आणि याउलट पनवेल उरणची स्थिती. सर्व पक्षांचे, झाडून सर्व नेते, पत्रकारांसमवेत गोळीबार पोलिसी अत्याचार झाल्या झाल्या उरण-पनवेलात दाखल झाले. नेमके शरद जोशी मात्र अद्यापतरी या भागात अनुपस्थित ! तेच लाब राहिले की, त्यांना लांब ठेवण्याचे राजकीय नेत्यांनी आपापसात संगनमत करून ठरवले, हे कळायला काही मार्ग नाही. पण 'इंडिया' आणि 'भारत' यातील तफावत स्पष्ट करणारी ही उपस्थिती आणि अनुपस्थिती आहे, यात शंका नाही. या उपस्थितीमध्येही एक गोम आहेच. शेतकरी कामगार पक्ष सोडला तर अजून कोणीही एकरी चाळीस हजार रुपये ही या भागातील शेतकऱ्यांकडून मागितली जात असलेली जमीन-किंमत सरकारने दिली पाहिजे असे खणखणीतपणे म्हणत नाही. दहा वर्षांपूर्वी या जमिनींसाठी एकरी पाच-सहा हजार रुपये ही किंमत ठरली. त्यानंतर वाढता वाढता ती आज एकरी तीस-चाळीस हजार रुपयांच्या घरात गेली. ही वाढ अर्थातच इतर कारणांमुळे झाली. तरीपण शेतकऱ्याना या वाढीचा फायदा मिळणे यात गैर काहीच नाही; पण तुटेपर्यंत ताणले जात नाही, मनुष्यहानी होणार नाही हेही पाहिले पाहिजे. सामाजिक-आर्थिक न्याय शेतकऱ्याच्या बाजूचा आहे–कारण ते अल्पभूधारक आहेत, त्यांचे आपल्या वाडवडिलार्जित जागेतून-घरादारांतून उच्चाटन होणार आहे; त्यांचा एकमेव आधार नाहीसा होणार आहे. तेव्हा जेवढे झुकते माप या शेतकऱ्याच्या पदरात घालता येईल तेवढे सरकारने घातलेच पाहिजे; पण असे माप घातले गेले तरी शेती-शेतकऱ्याचे प्रश्न अशा आंदोलनांनी सुटणार नाहीत. शेतकऱ्याचे रक्त सांडले जाईल; पण व्यवस्था बदलू पाहणाऱ्या शेतकरी चळवळीचे पाऊल पुढे पडणार नाही. त्यासाठी शेतकरी संघटनेच्या श्रमसिद्ध मूल्य-विचाराकडे वळावे लागेल–आज नाही तर उद्या.

□

शेतीमालाला योग्य भाव मिळाले पाहिजेत हा शेतकऱ्यांचा जन्मसिद्ध व श्रमसिद्ध हक्क आहे असे शरद जोशी म्हणतात; पण हेही ध्यानात

घेतले पाहिजे की, ' हक्क ' ही कल्पनाच मुळात ' इंडिया 'ची आहे. इंग्रजी राज्याबरोबर ती इकडे आली. पाश्चिमात्य देशात हक्कांना कर्तव्याची जोडही दिली गेलेली आहे. आपल्याकडे फक्त हक्कभावना फैलावली. त्यामुळे व्यक्तीची प्रगती झाली; पण सामाजिक-राष्ट्रीय जाणिवाचा विकास त्याबरोबर साधला नाही. शेतकरी चळवळीने केवळ हक्कांवरच भर दिला तर आज जे शहरात आहे तेच चित्र खेड्यातही उमटेल. ' भारत ' हा ' इंडिया ' चीच एक प्रतिकृती बनेल. कामगारक्षेत्रात हक्कांना मान्यता मिळाली; पण कर्तव्याची शिकवण रुजली नाही. त्यामुळे आज बहुतांशी कामगार संघटना अर्थवादात घुटमळत-घोटाळत आहेत. मार्क्सला अभिप्रेत असणाऱ्या कामगारक्रांतीची कुणाला आठवणही उरलेली नाही. हक्क आणि कर्तव्याची सांगड घालणाऱ्या ' ऋण ' कल्पनेवर भारतीय समाजाची उभारणी झालेली आहे. विनोबांनी म्हटले आहे : " समाज प्रवाहात्मक आणि नित्य आहे. त्या पूर्वसिद्ध सामाजिक प्रवाहाचे ऋण घेऊन व्यक्ती जन्मास येते. समाजापासून मिळालेल्या सेवादानाची परतफेड करणे व्यक्तीचे जीवित कर्तव्य आहे. परतफेड करण्यात दुसऱ्या कोणावर उपकार होत नाही. आपलीच ऋणमुक्तता होते. ऋणमुक्ततेची संपूर्णता म्हणजेच मोक्ष" अशा या ऋणमुक्ततेशी श्रमसिद्ध हक्कांची सांगड घातली गेली तरच शेतकरी चळवळ टिळक-गांधींच्या चळवळीचा वारसा सांगू शकेल. नाहीतर आपापल्या गटाच्या-वर्गाच्या स्वार्थ साधनेसाठी चाललेल्या चळवळीत आणखी एकीची भर, इतकेच तिचे महत्त्व उरेल. जे स्वार्थही साधतात पण स्वार्थाच्या पलिकडेही पाहतात तेच समुदाय व्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणू शकतात. बाकीचे सगळे केवळ मागणीबहाद्दर ! □

# मुंबापुरी...

इंग्लंडमधील ग्लॅसगोचे मेयर डॉ. मायकेल केली महापौर बेदींच्या निमंत्रणावरून मुंबापुरीच्या दर्शनाला आले. नेमके याच वेळी बेदी सपत्निक योकोहामाच्या सफरीला गेले होते. यामुळे डॉ. केलीचे स्वागत महापौरांच्या चेंबरमध्ये स्थायी समितीचे अध्यक्ष डॉ. सुरेश मजमुनदार ह्यांनी केले.

ह्या असल्या स्वागतसमारमास महापालिका आयुक्त द. म. सुखथनकरांसहित माजी महापौर, महापालिकेचे चिटणीस आणि पालिकेतील वेगवेगळ्या पक्षांचे प्रमुख हजर असतात. एकमेकांच्या शहरांची स्तुती करणारी छापील भाषणे, शीत पेये आणि काजू असे हे समारंभाचे स्वरूप असते; पण ह्या वेळी मात्र थोडी गंमत झाली.

मुंबापुरीची जुजबी माहिती पुरविल्या नंतर सुखथनकरांनी, डॉ. केलींना ग्लॅसगो हे उत्तम स्कॉच व्हिस्कीसाठी प्रसिद्ध असल्याचे सांगितले आता जिव्हाळ्याच्याच विषयाला तोंड फुटल्याने इतका वेळ गप्प बसलेले नगरसेवकही बोलके झाले. जॉनी वॉकरपासून ते रॉयल सॅल्यूटपर्यंतच्या सर्व ब्रँडची माहिती आपणास असल्याचे डॉ. केलींना त्यांनी सांगितले.

डॉ. केली मात्र थोडे गोंधळलेले दिसले. ते म्हणाले इंग्लंडमध्ये पत्रकारासमोर आम्ही कधी व्हिस्कीची चर्चा करीत नाही; पण त्यांची दखल न घेता माजी महापौर कॉ. पै नी रशियामध्ये लोक व्हिस्कीऐवजी व्होडका पितात अशी माहिती पुरविली. आणि मागे जपानमध्ये प्यायलेल्या व्हिस्कीमुळे आपणास दुसऱ्या दिवशी कसा त्रास झाला ह्याचा किस्साही ऐकवला.

मग पत्रकाराकडे पहात गंभीर चेहेरा करून डॉ. पै म्हणाले, भारतात मी दारूला स्पर्शही करीत नाही; पण परदेशात मेयर म्हणून गेल्यावर इतरांना मान देण्यासाठी पिणे भाग पडते.

यावर डॉ केली म्हणाले, ' Now I realise why you became the Mayor. '

□

मुंबईच्या ॲडव्हर्टायझिंग क्लबने गेल्या दोन वर्षांतील विविध क्षेत्रातील जाहिरातींचा आढावा घेण्याच्या निमित्ताने गेल्या बुधवारी ओबेरॉय शेरेटन हॉटेलात एक जंगी पार्टी दिली. रीडिफ्युजन ह्या मान्यताप्राप्त जाहिरातसंस्थेचे प्रमुख अरुण टंडन ह्यांनी हा आढावा घेतला, हा सारा कार्यक्रम इंडिया टुडे ह्या पाक्षिकाने आयोजित केला होता.

आजवर आमची धारणा होती की, कोलगेट, पॉंड्स, रेमंड्स आणि दाऊद ह्यांबद्दलचे आमचे आकर्षण आनुवंशिक असावे; परंतु ह्यामागे ह्या इतक्या लोकांनी जाणून बुजून केलेला कट असेल ह्याची आम्हाला कल्पनाच नव्हती.

□

महापालिकेच्या कामगारांसमोर गेल्या गुरुवारी जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी एक उत्स्फूर्त भाषण ठोकले. It takes me three days to make an extemper speach असे मार्क टवेन यांनी म्हटले आहे; पण जॉर्जसाहेबांचे हे भाषण मात्र खरोखरच उत्स्फूर्त होते.

आपल्या तासाभराच्या भाषणात त्यांनी इंदिरा गांधी, राजीव गांधी ' उरण का कोठे तरी ' झालेली दंगल, जनता राजवटीतील आपली कामगिरी, दिल्ली आणि मुंबईतील पोलीस अशा विविध विषयांचा समाचार घेतला.

त्यांनी ज्या मोर्चापुढे भाषण दिले तो मात्र महापालिकेच्या कामगारांच्या बोनसच्या मागणीसाठी होता. मोर्चातील एका कामगाराची प्रतिक्रिया, ' जॉर्ज बडा चॅप्टर आदमी है। कुछ भी बोलता है।'

□

के. इ. एम हॉस्पिटलचे डीन डॉ. सी. के. देशपांडे ह्यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे पालिकेत सध्या खळबळ माजली आहे. महापालिकेच्या रुग्णालयात जी औषधे घेतली जातात ती ठरविणाऱ्या टेंडर कमिटीच्या कारभारात पालिकेच्या स्थायी समितीने केलेल्या हस्तक्षेपाच्या निषेधार्थ त्यांनी हा राजीनामा दिला असे म्हणतात. असो; पण पालिकेच्या आरोग्यसमितीचे अध्यक्ष रा. ता. कदम यांना मात्र ही बातमी वृत्तपत्रातूनच प्रथम समजली. पालिकेच्या रुग्णालयात पुरविली जाणारी औषधे आणि खाद्यपदार्थ यांच्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात भेसळ असते असा आरोप त्यांनी केला. पुरावा म्हणून नायर हॉस्पिटलमध्ये पुरविली जाणारी चहाची पावडर दाखविली. चौदा रुपये किलोने घेतलेली ही पावडर म्हणजे रंगवलेला लाकडाचा भूसा होता. हा भुसा तरी सागाचा आहे की, जंगली लाकडाचा आहे ह्याचा शोध अजून घ्यायचा आहे.

—विष्णू जयदेव

# ओळखी....

## पुणे
## शिवाजी मिलिटरी स्कूल
## नव्या योजना, नवे प्रकल्प

केवळ शैक्षणिक प्रगती हे उद्दिष्ट न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष ठेवणारी अनुभवी सैनिकी शाळा म्हणून 'श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल 'चं नाव घ्यावं लागेल. चालू वर्ष हे संस्थेचं सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. शाळेची सुरुवात झाली छत्रपती श्री शाहूमहाराज आणि श्री. माधवराव सिंदिया यांच्या प्रेरणेतून. छत्रपती शिवाजीमहाराजांची प्रतिमा तरुण मुलांसमोर जागती रहावी म्हणून 'दि ऑल इंडिया श्रीशिवाजी मेमोरिअल सोसायटी 'चा पायाभरणीसमारंभ १९ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते संपन्न झाला.

श्री. शाहूमहाराजानंतर श्री. राजाराममहाराजांनी संस्थेची सूत्रं हातात घेतली आणि त्याच वेळी श्रीशिवाजी स्मारकसभागृहात लष्करी शिक्षण देणारी शाळा असावी अशा तऱ्हेच्या कल्पनेनं मूळ धरलं होतं. याचं प्रत्यक्ष स्वरूप म्हणजेच पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली लष्करी शिक्षण शाळा आणि तिच्यासमोरील आदर्शाचे प्रतीक मांडणारा छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा ! परधर्मसहिष्णुता, स्वातंत्र्य, समता या महाराजांच्या गुणांना आदर्श मानून गेली पन्नास वर्षं ही शाळा आपलं काम नेटानं करत आहे.

चालू वर्ष संस्थेचं सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या महोत्सवी वर्षात शालेय दैनंदिन व्यवस्थापनात जो प्रमुख बदल झाला तो म्हणजे विंग कमांडर आर. एम्. सरन (निवृत्त) यांची कमांडंट आणि डायरेक्टर म्हणून नियुक्ती झाली. कमांडंट सरन यांच्या नियुक्तीमागचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांना यापूर्वी तीन सैनिकी शाळांच्या प्राचार्यपदाचा अनुभव आहे आणि 'इंडियन पब्लिक स्कूल' च्या परिषदांचे ते अध्यक्ष आहेत.

आपल्या शाळेच्या वेगळेपणाबद्दल कमांडंट सरन म्हणाले, 'फक्त शैक्षणिक गुणवत्तेपेक्षा विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाकडे आमचं लक्ष असतं आणि कोणत्याही सैनिकी शाळेचं उद्दिष्ट हेच असायला पाहिजे. आमच्या शाळेचे काही माजी विद्यार्थी आज निरनिराळ्या क्षेत्रांत महत्त्वाच्या पदावर आहेत आणि त्याचा मला अभिमान आहे !'

शाळेबद्दलचे काही गैरसमजही त्यांनी दूर केले. ते म्हणाले, 'आमच्या शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी देणग्या द्याव्या लागतात हे खरं नाही. आमचा विद्यार्थीवर्ग जास्त करून ग्रामीण विभागातला आहे. आम्ही प्राथमिक शाळेत प्रवेश देताना बरोबर पालकांना फक्त एवढ्याचसाठी बोलावतो की, मुलांनी रडू नये. म्हणून सैनिकी शिक्षणाची आवड असलेल्या कोणत्याही मुलाला आमच्या शाळेत प्रवेश मिळायला हरकत नाही.'

सुवर्णमहोत्सवी वर्षातील नव्या कल्पना सांगताना ते म्हणाले की, उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांना 'सूक्ष्म गणकयंत्रविज्ञान' शिकवण्याची महत्त्वाची योजना डोळ्यांसमोर आहे. शिवाय त्याचाच घटक म्हणून तंत्रविज्ञान महाविद्यालय उभारावे, विविध छंद उत्तेजन वर्ग, सुसज्ज तालीमखाना, पोहण्याचा तलाव बांधणे असे अनेक प्रकल्प डोळ्यांसमोर आहेत.

शाळेचे दैनंदिन व्यवहार गेल्या ५० वर्षांत फारसे बदल न होता आजही तसेच आहेत. पहाटे ५.४५ पासून रात्री ९.३० पर्यंत विद्यार्थ्यांना भरगच्च कार्यक्रम असतो. अशा विशिष्ट पद्धतीच्या शिक्षणपद्धतीत ५ ते ८ वर्षं शिक्षण घेतलेला विद्यार्थी जेव्हा बाहेरच्या जगात प्रवेश करतो त्या वेळी तो विद्यार्थी इतरांच्या तुलनेत जास्त परिपक्व असतो असं सरन यांचं निरीक्षण आहे. या सैनिकी शाळेतली मुलं सातत्यानं नॅशनल डिफेन्स ॲकेडमीमध्ये प्रवेश मिळवून संचालकांचा विश्वास खरा करत आहेत.

शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूलच्या धर्तीच्या अधिक शाळा, असे शिक्षण घेतलेले अधिक विद्यार्थी आज आपल्याला हवे आहेत.



**कमांडंट आर. एन्. सरन**

¤

त्या दृष्टीने सैनिकी शाळेबद्दलचा मध्यमवर्गीय पालकांच्या मनात असलेला न्यूनगंड दूर करण्यात ही सुवर्णमहोत्सवी शाळा यशस्वी झाली आहे !

**—मेधा**

## कलकत्ता
## महाराष्ट्रनिवास
## सुवर्णमहोत्सवी वाटचाल

आम्ही चार बायका परप्रांतात विशेषतः कलकत्त्यात— एकट्या जाण्याचे धाडस करतो आहोत असे आम्हाला बऱ्याच जणांनी भिवविले होते. पण आपल्या आधारावर आम्ही निश्चित मनाने तेथे वावरू शकलो. निःशंकपणे बाहेर फिरू शकलो. आपले आभार मानणे औपचारिक होईल; परंतु खरोखरच त्यासाठी आमच्याजवळ शब्द नाहीत— माझ्या सर्व मत्रिणींच्या भावनांचे हेच शब्दरूप समजावे.

**—कमल आगाशे (पुणे)**

हे पत्र कोणा व्यक्तीलाच लिहिलेलं आहे की काय असं वाटावं. पण नाही. ही स्तुती कलकत्त्यात असलेल्या 'महाराष्ट्रनिवास' या संस्थेची आहे.




¤
**निवासच नाही, सांस्कृतिक जिव्हाळ्याचं केंद्र**
¤

येत्या तीन फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र-निवासला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यासाठी असंख्य लोक विविध प्रकारे झटत आहेत. खरंच असं काय आहे या संस्थेत की त्याचं इतकं कोड-कौतुक व्हावं? त्यासाठी ही संस्था कशी उभी राहिली, तिनं कसकशी वाटचाल केली, तिची वैशिष्टचे कोणती आहेत, या गोष्टी बघायला हव्यात.

नोकरी––व्यवसायानिमित्त कलकत्त्यात आलेल्या मराठी माणसांनी महाराष्ट्राबाहेर मराठी संस्कृती टिकवून ठेवणे, परप्रांतात वाटणारी एकटेपणाणी जाणीव दूर करणं आणि परस्परांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणे, या दृष्टीने १९२४ साली एक जागा भाड्याने घेऊन महाराष्ट्र मंडळाची स्थापना केली.

पण जसजशी कलकत्त्यात मराठी लोकांची जा–ये वाढू लागली तसतशी मंडळाची ही भाड्याची जागा अपुरी पडू लागली. शिवाय बंगाली लोकांच्या जेवणात भात आणि मासेच भरपूर प्रमाणात असल्यामुळे इथे येणाऱ्या मराठी माणसाला पहिली अडचण संपूर्ण शाकाहारी जेवण मिळण्याची होती. तेव्हा बाहेरून येणाऱ्या मराठी लोकांची राहण्या–जेवणाची सोय करणे, धार्मिक व सामाजिक सणवार पार पाडणे, मराठी वाचनालय–ग्रंथालय चालविणे, बंगाल आणि महाराष्ट्रातले संबंध दृढ करणे या व अशाच अनेक उद्दिष्टांसाठी महाराष्ट्र मंडळाने कलकत्त्यात स्वतःची इमारत बांधण्याचा संकल्प सोडला.

इमारतीचा संकल्प सोडल्यावर त्यासाठी निधी जमवणं आलं. मग देणग्या, नाटच-प्रयोग, सर्कसचे खेळ इत्यादी अनेक मार्गांनी पैसे उभे करण्यात आले आणि १९३१ साली महाराष्ट्रनिवासची पहिली तीन मजली इमारत उभी राहिली. ३ फेब्रुवारी १९३४ रोजी देणगीदारांच्या सल्ल्याने 'महाराष्ट्र–निवास ट्रस्ट' हा स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यात आला आणि निवासचा तळमजला मंडळाला देण्यात आला.

निवासच्या चोख व्यवस्थेमुळे निवासचा नाव–लौकिक वाढत गेला आणि ही जागा अपुरी पडू लागली. त्यामुळे १९५४ साली निवासची दुसरी इमारत उभारण्यात आली. जुनी व नवी इमारत यांच्यामध्ये एक सभागृह बांधण्यात आले. ही व्यवस्थाही जेव्हा अपुरी पडू लागली तेव्हा समोरच रस्त्यापलीकडची जागा खरेदी करून तिथे निवासची तिसरी चार मजली इमारत बांधण्यात आली. ही इमारत १९७४ मध्ये पूर्ण झाली.

आज महाराष्ट्रनिवासच्या तीनही इमारती मिळून १६२ लोकाच्या राहण्याची व्यवस्था आहे. 'जागा नाही' म्हणून सहसा कोणालाही परत पाठवलं जात नाही. वेळ-प्रसंगी उतारूंची व्यवस्था रंगमंच, टिळक सभागृह, बँक हॉल व गणेश हॉलमधूनही करण्यात येते.

इथला आचारीवर्ग सगळा बिहारी आहे; पण स्थानिक मराठी भगिनींच्या देखरेखीखाली तो उत्तम प्रकारचा आमटी–भात–भाजी – पोळी– उसळ–चटणी–कोशिंबिरीचा संपूर्ण मराठी पद्धतीचा स्वयंपाक करण्यात तरबेज झाला आहे. सणासुदीला पारंपारिक गोड पदार्थही इथले आचारी करतात. त्यामुळे आपण महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर आहोत ही जाणीव कधीच नाहीशी होते!

१९७७ पासून रोज दुपारी इथे कॅन्टीनची व्यवस्थाही सुरू केलेली आहे. अगदी माफक दरात उत्तम पदार्थ इथे मिळतात. स्थानिक मराठी भगिनी जातीने लक्ष घालून हे पदार्थ तयार करत असल्यामुळे त्यांना घरच्यासारखी चव येते. वेळी–अवेळी येणारे उतारू व कामावरून येणारे थकले-भागलेले लोक व पर्यटक यांची त्यामुळे खूपच सोय झालेली आहे.

निवासच्या विश्वस्त मंडळावर तीन स्थानिक व दोन परस्थ असे एकूण पाच विश्वस्त घेण्याची पद्धत आहे. आजवर साहित्यसम्राट न. चिं. केळकर, लोकनायक डॉ. माधव अणे आणि काकासाहेब गाडगिळांसारख्या व्यक्तींनी निवासची विश्वस्तपदे भूषविली आहेत. सध्याच्या विश्वस्तमंडळात स्थानिक विश्वस्तांपैकी आहेत अध्यक्ष – जे. वि. दिवेकर, चिटणीस – रा. रा. कुलकर्णी आणि खजिनदार – व. वि. बापट. परस्थ विश्वस्त आहेत भारतीय दळणवळण-खात्याचे मंत्री बॅ. विठ्ठलराव गाडगीळ आणि ना. रा. टिकेकर.

सेवकवर्गात आचारी, वाढपी, दरवान, लिफ्टमन व इतर सेवक मिळून एकूण ७० जण आहेत, तर प्रभाकर डोळे, यशवंत डोळे आणि सुधाकर कुलकर्णी हे तिघं मिळून निवासाच्या व्यवस्थापनाची आघाडी सांभाळतात.

### इतर वैशिष्टये

निवासात राहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला इथे आल्यावर सर्वप्रथम जाणवते ती इथली स्वच्छता. स्वयंपाकघराच्या ओटचापासून दाराच्या पितळी कडचांपर्यंत इथली प्रत्येक वस्तू चकाकत असते. इतकंच नव्हे तर इथले वाढपीही जेव्हा पांढऱ्याशुभ्र वस्त्रांनी आणि प्रसन्न चेहऱ्यांनी वाढायला येतात तेव्हा जेवणाऱ्यालाही प्रसन्न वाटल्याशिवाय राहात नाही.

इथे राहायला येणाऱ्यांना हरप्रकारची माहिती आनंदाने पुरविली जाते. त्यांची विमानाची अगर रेल्वेची परतीची रिझर्व्हेशन्स केली जातात. इतकंच नाही तर हवी असल्यास प्रवासाला निघताना पुरी-भाजीची शिदोरीही बरोबर दिली जाते.

मराठी लोकांचं लग्न, मुंज, सत्यनारायण, डोहाळजेवण, बारसं, हळदीकुंकू इत्यादी कुठलंही शुभकार्य असो, निवासाचा त्यात सक्रिय सहभाग असतो. अगदी भटजी आणण्यापासून ते हॉल सजवणे, पंक्ती व बुफेसाठी जेवण तयार करणे, बारशाला सजवलेला प्रशस्त पाळणा आणणे, सर्व प्रकारच्या पूजेसाठी भांडी व इतर साहित्य पुरवणे, इतकंच नव्हे तर अगदी विहिणीची चांदीच्या ताटात जेवणाची हौस पुरवण्यापर्यंत सर्व व्यवस्था निवासच्या भरवशावर होऊ शकते.

निवास इतरांच्या सुखातच सहभागी झाला आहे असं नाही तर युद्ध, दुष्काळ, पूर, आजारपण, मृत्यु इत्यादींसारख्या आपत्तीमध्येही तत्परतेने मदतीला धावून आलेला आहे. कलकत्त्यात स्थायिक झालेल्या मराठी लोकांना आज अडीअडचणीच्या वेळी लांब राहाणाऱ्या नातेवाइकांपेक्षा निवासचाच आधार फार मोठा वाटतो.

देणग्यांच्या बाबतीतही निवास मागे राहिलेला नाही. आजवर निवासने विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना देणग्या देऊन त्यांचं कौतुक केलेलं आहे. या देणग्यांच्या रकमेचा आकडा साडेतीन लाखांच्या वर गेलेला आहे!

निवासला आजवर विविध क्षेत्रांतील अनेक नामवंत, गुणी व वंदनीय अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यक्तींनी भेटी दिलेल्या आहेत. त्यात विशेष उल्लेख करण्याजोगी नावे म्हणजे राधाकृष्णन्, सुभाषचंद्र बोस, आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकर, विनोबा भावे, पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, पु. ल. देशपांडे, शकुंतला देवी, जब्बार पटेल, सुनील गावस्कर, वैजयंती-माला इ.

बंगालचा जलतरणपटु मिहिर सेन, कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश शंकरप्रसाद मित्रा, भारतीय नाटकाच्या इतिहासात आपला जबरदस्त ठसा उमटविणारे नाटककार शंभू मित्र आदींना वेळोवेळी बोलावून, त्यांचे कौतुक करून निवासने बंगालमधील महाराष्ट्राचे दूत असल्याची आपली एक आगळीच भूमिकाही स्पष्ट केली आहे आणि यामुळे वेळोवेळी महाराष्ट्र आणि बंगालमधील परस्पर संबंध दृढ होण्यास मदत झालेली आहे.

अशा या संस्थेवर लोकांनी जीव टाकला तर त्यात आश्चर्य ते कसलं?

—बाली बेलसरे
पुणे

## मुक्काम जळगाव

३० जाने. ते ५ फेब्रु. ८४ या दरम्यान जागतिक अपंग व कुष्ठरोग—सप्ताहानिमित्त नासिक येथे एक मेळावा आयोजित केला गेला आहे.

या मेळाव्यासाठी मदतनिधी उभारण्याचे आवाहन जळगावच्या अपंग मित्रमंडळाला करण्यात आले. गंमत अशी की, सुदृढ नागरिकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालेल अशा प्रकारे एकजूट होऊन जळगावच्या अपंग बंधुभगिनींनी हे कार्य अथक परिश्रमांद्वारे सफलही करून दाखवले.

जिल्हाधिकारी श्री. भास्करराव पाटील यांचे हस्ते १२ डबे सील करून घेऊन हे मित्रमंडळ आपापली दिशा निश्चित करून शहरातील विविध स्तरांतील असंख्य नागरिकांकडे पोहोचले. त्या वेळी यापैकी काहींच्या तिचाकी वाहनांवर 'घायलकी गती घायल जाने', 'दयेची भीक नको सेवेची संधी द्या' अशी घोषवाक्ये असलेले फलक होते.

आपापसातच वर्गणी करून जमवलेल्या ३१ रुपयांचे या मित्रमंडळाने खराटे, बूटपॉलिशच्या डब्या, ब्रश घेतले होते. दया—सहानुभूती टाळून परिश्रमाद्वारे या साऱ्यांनी ६ व ७ जाने. ८४ असे दोन दिवस खपून निधी जमवला. या दोन्ही दिवशी यातील प्रत्येकाने स्वतःचा रोजगार—व्यवसाय तर संपूर्णपणे बंदच ठेवला होता.

पुन्हा साऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एकत्र जमून हे १२ सीलबंद डबे त्यांच्या हस्ते उघडायला लावून मोजून घेतला. १३७९ रुपये ८० पैसे जमलेल्या या निधीत एका



अपंग बंधूंसमवेत – वार्ताहर नीला शर्मा

दात्याने महाराष्ट्र लॉटरीचे क्र. SH–११७५१४७ हे तिकीटही आढळले, तेही दोन रुपयांचे बक्षीस लागून.

सर्वश्री प्रमिला दीक्षित, प्रकाश मोदे, राधाकिसन पांडे, अरविंद जैन, राजेंद्र जैन, प्रकाश अत्तरदे, बन्सी सपकाळे, सोपान वरकडे, सलीम पटेल आदींनी केलेले हे कार्य पाहून तरी आपण प्रेरणा घेऊ शकू काय ?

प्रेषक : नीला शर्मा

## संजय

### आमची पंधरावी कला

चोविसाव्या महाराष्ट्र राज्य कलाप्रदर्शनाच्या व्यावसायिक विभागात पुण्यातील तरुण चित्रकार संजय पवार याला २५०० रु. चा राज्यपुरस्कार देण्यात आला.

गेली एक–दोन वर्षं हा चित्रकार पुण्यातील काही प्रमुख दैनिके, साप्ताहिके, मासिके यांमधून आपल्या वेगळ्या शैलीच्या चित्रातून या क्षेत्राशी संबंधित लोक व वाचक यांच्या 'लक्षात' आलेला आहे. शिवाय काही सामाजिक संघटनांच्या जाहीर पोस्टर प्रदर्शनातली याची चित्रे महाराष्ट्रभर फिरलेली आहेत. त्यामुळे या बक्षिसाच्या निमित्ताने त्याच्याशी थोडं बोलून त्याची थोडी पार्श्वभूमी व पुढील योजना, मानस काय आहे हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला.

संजय मूळचा मुंबईचा. मुंबईच्या सर ज. जी उपयोजित कलामहाविद्यालयातून १९७९ साली त्याने उपयोजित कलापदविका संपादन केली आणि १९८१ साली संजय पुण्यात आला. मुंबईसारखं शहर, जेथे लोक पैसे कमवण्यासाठी जातात आणि जेथे व्यावसायिक कलेसाठी विस्तृत क्षेत्र उपलब्ध आहे अशा ठिकाणाहून पुण्यात येणं आणि येथे 'आमची पंधरावी कला' नामक जाहिरातसंस्थाही सुरू करणं या सगळ्या उलटया प्रवासाचं कारण सांगताना संजय म्हणाला, एकतर जाहिरात–संस्थांमधून नोकरी करण्याची इच्छा नव्हती आणि दुसरं म्हणजे मुंबईत जाहिरात व्यवसायात स्पर्धाही खूप



अमूर्त रेखाटनांचं स्वागत

¤

आहे. त्यामुळे मुंबईपासून लांब तरीही जवळ असं पुणं निवडलं. पुणं निवडण्याचं आणखी एक कारण म्हणजे पुण्यात प्रकाशनसंस्था बऱ्याच आहेत आणि मला रेखाटनाची (Illustrations) आवड आहे.


रेखाटनाचा विषय निघाला तेव्हा मी विचारलं की तुझी रेखाटने बऱ्याचदा अमूर्त शैलीकडे झुकलेली असतात व सर्वसामान्य वाचकांना ती अनाकलनीय वाटतात. याबद्दल तुझा काय अनुभव आहे? 'माझी चित्रे अमूर्त (abstract) शैलीकडे झुकणारी असतात हे मान्य आहे. काही वेळा वाचक, संपादक यांकडूनही याबाबत सांगितलं जातं. परंतु याबद्दल माझं मत असं आहे की, चित्रकलेच्या क्षेत्रात वेगवेगळे प्रवाह येतात. मध्यंतरी वास्तववादी (realistic) चित्रांचा मुळगावकर, दलालांचा जमाना होता. त्यानंतर सुभाष अवचटने स्टाईलाईज्ड इलस्ट्रेशन हा नवीन प्रकार आणला. परंतु अमूर्त रेखाटने किंवा विचाराला प्रवृत्त करणारी रेखाटने ही केवळ self expression म्हणूनच वापरली गेली. अशा प्रकारच्या चित्रांचा आता काही प्रमाणात व्यावसायिक क्षेत्रातही वापर व्हायला लागला आहे आणि लोकांना ही चित्रे जरी अनाकलनीय वाटली तरी अशा चित्रांचा व्यावसायिक क्षेत्रात झालेला वापर मला स्वागतार्ह वाटतो. कारण आपल्याकडे चित्र समजून घेण्याची लोकांची प्रवृत्ती नाही. 'मृच्छकटिक'च्या चाहत्यांना आता 'हयवंदनही' आवडत किंवा भा. रा. तांबेंच्या रसिकांना मर्ढेकरही भावतात. आवारा, श्री. ४२० पासून ते अर्ध्यसत्य, मंडीपर्यंतचा चित्रपटांचा प्रवास लोकांना सुसह्य होतो. पण चित्रांबाबतीत हा प्रवास फारच हळू आहे याचं कारण म्हणजे जशी व्हायला हवी तशी, त्या उत्कटतेने कलेची समीक्षा केली गेलेली नाही व त्यामुळे अशा प्रकारच्या अमूर्त चित्रांचा वापरही अल्प प्रमाणात आहे. सामाजिक संघटनांसाठी मी जी प्रदर्शने केली आहेत त्यात मी आवर्जून प्रतिकात्मक चित्रांचा उपयोग केला आहे, कारण ही चित्रे सरळ सरळ लोकांसमोर जातात.

वेगवेगळ्या सामाजिक संघटनांशी तुझा संबंध आहे. तू या संघटनांसाठी काम करतोस ते केवळ आवड म्हणून की काही भूमिकांतून ?

सामाजिक संघटनांशी माझा संबंध अर्थातच विशिष्ट भूमिकेतूनच आहे. मला असं वाटतं की कलाकार, त्याच्या एकूण प्रवृत्तीमुळे म्हणजे निसर्गाची आवड, भावनिक असणं इ. इ. मुळे वेगवेगळ्या पातळ्यांवर विचार करू शकतो. त्याचप्रमाणे त्याच्याकडे visualisation power ही असते. त्यामुळे त्याने समाजाच्या नवनिर्मितीत भाग घेणे आवश्यक आहे. फ्रेंच राज्यक्रान्तीमध्ये बऱ्याच चित्रकार कवींनी भाग घेतला. त्याचप्रमाणे युद्धावरचे पिकासोचे चित्र तर जगप्रसिद्ध आहे म्हणजे तशी ही परंपरा जुनी आहे.

आपली पार्श्वभूमी चित्राची अनाकलनियता यावर संजय बोलल्यानंतर त्याच्या पुढील योजनांबद्दल त्याला विचारलं तेव्हा त्याने त्याच्यातील लेखक आणि visualisation यांचा उपयोग करून जाहिरात फिल्म अथवा डॉक्युमेन्टरी बनवण्याचा मानस असल्याचे सांगितले. तसेच सामाजिक क्षेत्रातही त्याच्या माध्यमाचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा असे त्याला वाटते. संस्थेच्या नावापासूनच्या वेगवेगळेपणामुळे लक्षात राहिलेल्या 'आमची पंधरावी कला'द्वारे जाहिरातक्षेत्रात लक्षणीय कामगिरी बजावण्याची इच्छा असल्याचेही त्याने सांगितले.

–प्रतिनिधी



चौसष्टाव्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी ज्योत्स्नाबाईंची बिनविरोध निवड झाली. संमेलन ४-५-६ फेब्रुवारीला गोव्यात-पणजीला. गोवा हे ज्योत्स्नाबाईंचे माहेर ! माहेरी मुलींचे नेहमीच कौतुक. मुलींनाही माहेरची अपार ओढ. त्यातून मुलगी 'कर्तुम्-अकर्तुम्' असेल तर मग काय विचारायलाच नको ! ज्योत्स्नाबाई तशाच 'स्वकुलतारकसुता !' मग काय विचारता ? 'कोण आली, गौर आली, सोन्याची पाउले घरी आली' या भावनेनेच त्यांचे माहेरच्या वेशीत स्वागत होणार ! गोव्याची नाटकवेडी, भावभोळी मंडळी मांडवीच्या तीरावर स्वागताला सिद्ध झाली आहेत-

# स्वकुलतारकसुता - ज्योत्स्नाबाई

गो. रा. जोशी

निसर्गसुंदर गोमंतकाच्या कुशीत लपलेलं बांदोड. तिथलं महालक्ष्मीच्या परिसरातलं टुमदार कौलारू घर. जांभ्या दगडांचं. माडाच्या झावळ्यांनी झाकलेलं,आंब्या-फणसांच्या झाडांनी वेढलेलं. दारी तुळशी-वृंदावन असलेलं.सकाळ-संध्याकाळ देवळातला सनई-चौघडा कानी पडणारं. सुरंगीच्या सुगंधानं भरलेलं. समाधानानं ओसंडणारं केळेकरांचं घर ! याच वास्तूत दुर्गाचा (ज्योत्स्नाबाईंचा) पाळणा हलला !

आई-वडील संगीताचे जाणकार. या घरात सदैव चिवचिव चालायची, ती बोलांची नि तालांची. सारी भावंडं सुगंधित सूर घेऊन जन्माला आलेली. या भावंडांत दुर्गा शेवटून दुसरी.

म्हणजे प्रेमापेक्षा (मंगला रानडे) मोठी. ताई म्हणजे गिरिजाबाई केळकर (पं. वझेबुवांच्या शिष्या) यांचा आवाज गोड; पण ढाला. या बहिणींत खरी चढाओढ लागे ती बायजी (केसरबाई बांदोडकर) नि दुर्गा यांचीच; पण इथे बायजीचा चढा सूर दुर्गाला मागे टाकी; पण दुर्गाचा भावनात भिजलेल्या शब्द-सुरांचा दरवळ घर भरून टाकी. तरी पण या सगळ्यात तेज होता त्यांचा भाऊराया-रामराय. तो आपल्या गुणधनाची बहिणींना भाऊबीज घालून घाईघाईनं देवाघरी निघून गेला ! त्यातल्या त्यात दुर्गाला तर त्यानं 'केशवराव' ही फार मोठी भाऊबीज' घातली. कारण त्याच्याच ओळखीनं केशवराव भोळे, प्रथम त्यांच्या घरी आले होते.

दुर्गाचे गोव्यातले 'रम्य ते बालपण' संपले नि ती शिक्षणासाठी मुंबईत आली. लॅमिंग्टनरोडच्या म्युनिसिपल शाळेची विद्यार्थिनी झाली; पण खरं म्हणजे दुर्गाचं शिक्षणात फारसं मन लागत नव्हतं. तिचा जीव गुंतला होता गाण्यात. घरी ताईला नि बायजीला वझेबुवा तालीम देत असत. ते ऐकून ऐकून, ही दुर्गा, यमन-बिहाग-भीमपलास यांसारखे राग गात असे. शाळेत गाण्याच्या कार्यक्रमात दुर्गा पुढे असे. त्या वेळी 'बोल ब्रिजलाला' या पदाच्या चालीवरचे 'मोल हरिनामाचे विभवी न दिसे मोल' हे गाणे म्हणून मोठ्या बाईंची शाबासकी मिळविली होती. एक वेळ अशी होती की, दुर्गाचा हात कोणत्याही हत्यारावर सहज फिरे. मग तो हार्मोनियम असो, दिलरुबा असो, नाही तर तबला असो; पण त्या एकदा इतक्या आजारी पडल्या, की पुढे अशक्तपणामुळं त्यांचा हातच चालेना. सूरसंगत मात्र सुटली नाही. आजही अडीनडीला ज्योत्स्नाबाई तबल्याचा ठेका सहज धरतात. इतकेच काय; पण एखाद्या गाण्यातल्या छोट्या छोट्या जागा किंवा मुरक्या समजावून सांगताना त्या हातांनी ठेका धरून, तालासुरात त्या कशा बसतात हे सहज सांगतात-म्हणजे गाऊनच दाखवतात !

गप्पांच्या ओघात ज्योत्स्नाबाईंनी एक गंमत सांगितली. त्यांच्या वर्गात बालगंधर्वांची मुलगी होती. तिची त्यांची मैत्री होती. ती आपल्या वडिलांना नेहमी सांगत असे, 'नाना, आमच्या वर्गातली दुर्गा आहे ना, ती गाणे

काय छान म्हणते !' 'अग, मग तिला आण एकदा आपल्याकडे!'—बालगंधर्व. एक दिवस दुपारच्या सुटीत, दुर्गा आपल्या मैत्रिणीबरोबर तिच्या घरी गेली. 'नाना, दुर्गा आली आहे.'—त्यांची कन्या. 'या बाळ, वर या !' म्हणून नानांनी हाक मारली. त्या वर गेल्या. 'बस बाळ !' म्हणून बालगंधर्वांनी तिला जवळ बसविली— 'म्हण पाहू आता' असे म्हणताच तिने एक छोटेसे गाणे म्हटले; पण ते आता त्यांच्या लक्षात नाही. त्यांच्या लक्षात आहे ती त्यांनी दिलेली शाबासकी नि त्यांच्या मैत्रिणीचे वडील—गोरे गोरेपान, नि उन्हाळा असल्याने, पाढरेशुभ्र धोतर नेसलेले उघडे बसलेले—बालगंधर्व—नाना ! पुढं मात्र घरच्या माणसांशी हट्ट धरून, रडून बालगंधर्वांचे 'एकच प्याला' पाहिले.

गाण्याच्या गोडीने नि ओढीने शाळा सुटली. घरी ताई तर गाणे शिकवीत होतीच; पण दुर्गाची ताकद ओळखून, खादिमहुसेनखाची तालीम सुरू केली. तंबोऱ्याच्या तारा छेडल्या जात होत्या. सूर कानात घुमत होते, मनात रुजत होते. रागरागिण्यांच्या स्वरमाला गळ्यावर चढत होत्या. अखंड मेहनत सुरू होती. एकदा खादिमहुसेनखांसाहेब 'पिया के मिलन की आस' ही जोगिया—ठुमरी शिकवीत होते. गाता गाता ज्योत्स्नाबाईंचा असा सूर लागला की, खांसाहेबांचे डोळे भरून आले. ते गदगदून म्हणाले, 'बस ! बस ! बेटी !'

त्यांच्या स्वरसाधनेबाबत खुद्द केशवरावांनी दिलेला निर्वाळा मोठा बोलका आहे. 'संगीताचा व्यासंग आम्ही तासन् तास करीत होतो. शिकवावे, खूप मेहनत करावी, त्याचाच आनद लुटावा अशा व्यासंगाच्या धुंदीत आम्ही मशगूल होतो. तिची ग्रहणशक्ती तीव्र. आवाज असाधारणपणे गोड, मेहनती स्वभाव. आपण खूप मेहनत करून गायिका व्हावे, अशी महत्त्वाकांक्षा असल्याने, मेहनतीला ती कंटाळली आहे, असा अनुभव मला कधीच आला नाही. मी शिकवावे, तिने शिकत रहावे. अनेक राग, त्यातल्या तऱ्हतऱ्हेच्या चिजा, नाटकातली पदे, भावगीते, हिंदी-मराठी भजने मी तिला शिकविली. रोज कमीत कमी एका बैठकीत सहा तास मेहनत होत होती.'

दुर्गाला 'बॉम्बे ब्रॉडकास्टिंग कंपनी'चे (आताची आकाशवाणी) बोलावणे आले. दुर्गा सुरेख गायली. तिच्या मोठ्या बहिणीइतकीच बिदागी तिला मिळाली. पुढे पुढे तर कोणी कलावंत आला नाही, तर दुर्गाला वरच्यावर बदली कलावंत म्हणून बोलावून घेऊन जाऊ लागले.

१९३१ च्या सुमारास केशवरावांशी परिचय झाला. केशवराव गाणे शिकवू लागले. 'किती गोड गोड वदला' नि 'तू बोलल्याविना मी नाहीच बोलणार' ही त्यांनी शिकविलेली पहिलीवहिली भावगीते. मग केशवरावांनी त्यांना अनेक चिजा, नाट्यगीते, अभंग शिकविले. गाण्याने नादावलेल्या या दोन जीवांची जवळीक झाली. सूरसंगतीच्या साथीत दोन जीवांचे मधुर मीलन झाले ! दुर्गा केळेकर सौभाग्यवती ज्योत्स्ना भोळे झाल्या. (२२ जानेवारी १९३२).

याच सुमारास के. नारायण काळे, वर्तक, काणेकर, आळतेकर आदी केशवरावांच्या मित्रांनी 'नाट्यमन्वंतर'ची स्थापना केली. वर्तकांच्या 'आंधळ्यांची शाळा' या नव्या नाटकाचा नारळ फुटला. ज्योत्स्नाबाई नको नको म्हणत असता केशवरावांनी त्यांना तालमीला उभी केली. 'हे पहा दुर्गा, प्रयत्न करायला काय हरकत आहे ? केशवराव दाते तालमी घेणार आहेत. त्यातूनही तुला नाहीच जमलं, तर मी आग्रह करणार नाही. मग तर झालं ?' केशवरावांच्या या आत्मविश्वासपूर्वक साखरपेरणीतून ज्योत्स्नाबाईंची 'बिंबा' उभी राहिली. त्यांच्या या पहिल्याच भूमिकेचे अपार कौतुक झाले. सौ. वर्तक नि ज्योत्स्नाबाई रंगभूमीवर आल्याने गृहिणींना—स्त्रियांना रंगभूमीचा दरवाजा खुला झाला; परंतु सुशिक्षित मंडळींनी जन्माला घातलेली 'नाट्यमन्वंतर' मात्र अल्पजीवी ठरली ! ज्योत्स्नाबाईंना प्रथम नाटकात काम करण्याची जरी आवड नव्हती, तरी त्यांच्या 'बिंबा'नं त्यांच्यातला कलावंत जागा केला होता. नाटकाची ओढ त्यांच्या मनात रुजली होती. अगदी लहानपणी, 'बांदोड्यात 'वेणूनाद' या छोट्याशा नाटुकल्यात त्या कृष्ण झाल्या होत्या. त्या बाल-कृष्णाचे खूप कौतुक झाले होते. देवळाच्या पुजाऱ्याच्या पत्नीनं तर, हा कृष्ण कडेवर घेऊन गावभर मिरविला होता ! जेऊ—खाऊ घातला होता. ज्योत्स्नाबाईंना त्या यशोदेची आठवण झाली की, त्यांचे डोळे पाणावतात. त्या म्हणतात, 'त्या माउलीन त्या वेळी माझी दृष्ट काढली होती, म्हणूनच आयुष्यातली इडापीडा टळली नि हे भाग्य माझ्या वाट्याला आलं !'

## बोला अमृत बोला

नाटक थांबले तरी गाण्याचा रियाज सुरू होता. नव्या नव्या गुरूकडून विद्या घेतच होत्या. गावोगावी त्यांच्या गाण्याच्या बैठकी होत होत्या. त्यांच्या गोड गळ्याची जाहिरात, त्यांच्या रेकॉर्डसूनं होतच होती. आमंत्रणावर आमंत्रणे येत होती. यशाची किरणे घरकुल उजळीत होती. घरात घुंगरू वाजत होते. केशव—ज्योत्स्ना फुलत होते. 'पहा गोकुळी रंगल्या गोपबाला' ही त्यांची पहिली रेकॉर्ड ग्रामोफोनवर सगळीकडे घुमत


**सुलभ स्वीट मार्ट**

१०।६४ बँक ऑफ महाराष्ट्र समोर, मेन रोड

इचलकरंजी ४१६ ११५.

होती. 'आला खुशीत समिंदर' 'बैसले मी पायथ्याशी' 'माझिया माहेरा जा पाखरा' अशा किती तरी भावगीतांच्या ध्वनिमुद्रिका बाहेर पडून लोकप्रिय झाल्या.

ज्योत्स्नाबाईंचे रंगभूमीवर पुन्हा दर्शन झाले ते मो. ग. रांगणेकर यांच्या 'नाट्य-निकेतन'ने रंगभूमीवर आणलेल्या 'आशीर्वाद' नाटकात मग लगेचच त्यांचे कुलवधू रंगभूमीवर आले (१९४२). 'कुलवधू' म्हणजे रांगणेकर (लेखन), मा. कृष्णराव (संगीत) नि ज्योत्स्नाबाई (भानुमतीची प्रमुख भूमिका) यांचा त्रिवेणी संगमच ठरला. रांगणेकर नि मा. कृष्णराव पडद्या-आड राहिले; पण ज्योत्स्नाबाईंच्या भानुमतीने लोकप्रियतेचं शिखर गाठलं. तरी ज्योत्स्नाबाई म्हणतात की, 'भानुमती' ही माझ्याशी मिळती-जुळती होती; पण खरे आव्हान होते ते 'एक होता म्हातारा' या नाटकातल्या उमेच. पहिल्या अंकातली भाबडी प्रेयसी, दुसऱ्या अंकात आई म्हणून आपल्या प्रियकराला सामोरी जाते– हे अत्यंत अवघड होते; पण रांगणेकराचे दिग्दर्शन नि ज्योत्स्नाबाईंची भूमिकेची जाण यानी त्यांची उमा प्रेक्षकाच्या जिव्हारी जडली. भानुमतीपेक्षाही काकणभर उंचावली. 'कोणे ऐके काळी'तली कल्याणी गाजली. गो. नी. दांची आगळी-वेगळी राधा (राधामाई) सुरेख सजविली. मामा वरेरकरांच्या सीतेला (भूमिकन्या सीता) न्याय दिला. देवयानी (विद्याहरण) यशस्वी केली. त्यांची देवयानी पाहिल्यावर मात्र त्यांनी बालगंधर्वांची रुक्मिणी (स्वयंवर) मनावर घ्यावी, असं वाटलं. बालगंधर्व एकदा म्हणाले होते, 'माझी कलेची वस्त्रं ज्योत्स्नाबाईंना साजून दिसतील. माझा वारसा त्या चालवतील.' यापरते दुसरे कौतुक काय हवे ?

दोन तपाहून अधिक काळ त्यांनी रंगभूमी गाजवली आहे. कलावंताला लाभावे असे सारे मान-सन्मान त्यांनी संपादले आहेत. आकाशवाणीच्या अनेक केंद्रावरून त्या गायल्या आहेत. नॅशनल प्रोग्रॅम सादर केले आहेत. त्यांच्या एकसष्टीचा गौरवसमारंभ रसिकांनी मोठ्या थाटामाटात साजरा केला आहे. कला अकादमीने त्यांना गौरविले आहे. भावे सुवर्ण पदकाच्या त्या मानकरी आहेत.

आजच्या घडीला त्यांनी गाजविलेली नाटके नजरेसमोर नाहीत; पण ज्या ज्या भूमिकांशी त्या एकरूप झाल्या, त्यातली गाणी मात्र अजून आठवतात, ऐकू येतात नि त्या त्या भूमिकेतली त्यांची प्रतिमा डोळ्यांसमोर उभी रहाते. 'क्षण आला भाग्याचा' 'मनरमणा मधुसुदना' 'बोला अमृत बोला' 'छंद तुझा मजला' 'खेळेल का ग माझिया अंगणी' अशी किती किती म्हणून नाट्यगीते सांगावी ! भावगीतात तर अग्रपूजेचा मान ज्योत्स्नाबाईंचाच ! त्यांच्या या भावगीतांवरून, ज्योत्स्नाबाई एक मोठी भावभरी आठवण सांगतात. आपले अण्णासाहेब म्हणजे रँग्लर र. पु. परांजपे आजारी होते. त्यांना माझे गाणे ऐकण्याची इच्छा झाली. मी डॉ. कोयाजी नर्सिंग होममध्ये गेले एक-दोन गाणी म्हटली. 'माझिया माहेरी जा पाखरा' हे गाणे ऐकत असता अण्णांचे डोळे भरून आले. नि खरं सांगू, एवढ्या मोठ्या माणसाला आपण काही क्षण का होईना आनंद दिला म्हणून मीही भरून पावले होते !

ज्योत्स्नाबाईंचं कलावंत म्हणून जीवन समृद्ध आहे, तसेच एक स्त्री म्हणून, गृहिणी म्हणून, त्यांचं जीवन सुफल संपूर्ण आहे. त्या हळव्या आहेत. त्यांच वाचन उत्तम आहे. त्यांची 'स्वरवंदना' हे आत्मचरित्रात्मक नि दुसरं 'अंतरीच्या खुणा' हे पत्ररूप अशी दोन पुस्तकंही आहेत. 'आराधना' हे नाटक आहे. उत्तम साहित्याचा त्यांच्या मनावर किती परिणाम होतो याच उदाहरण म्हणजे शरश्चंद्राच्या विप्रदास या कादंबरीतलं वंदना हे नायिकेचं नाव त्यानी आपल्या मुलीला ठेवलं. बंगल्यालाही आधी तेच नाव ठेवलं होतं; पण केशवराव आणि त्या दोघेही स्वरसाधक म्हणून साधनेला स्वरांची रांगोळी घालून स्वरबंधनात आले.

ज्योत्स्नाबाई स्त्रीरूपाच्या साऱ्याच पायऱ्यावर आज समाधानी आहेत. कर्ते मुलगे–सुना, नातवंडांनी घर नांदत आहे. या आनंदात त्या कधीकधी अंतर्मुख होतात त्या वेळी चटकन म्हणतात, 'आज पापा हवे होते' (केशवराव भोळे) नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होताच त्यांची पहिली प्रतिक्रिया हीच होती आणि ती अगदी सहजिकच होती. त्या आज सत्तरीच्या उंबरठ्यावर आहेत. सदा सतेज आहेत. हे सदाफुलीचं झाड सदैव असंच असावं हेच मंगेशाच्या पायी मागणं ! □


**Panchganga Products Pvt. Ltd.**

**Manufacturers of Pure Corbon-Di-Oxide Gas**

Factory & Regd. Office : Tilwani,
P. O. Sajani 416115

VIA–Ichalkaranji Dist. Kolhapur
Gram : BARAFWALA
Ichalkaranji; Ph : 2650

गुंडांचा, गुंडगिरीचा बंदोबस्त करणे हे काम वास्तविक पोलीस–यंत्रणेचे;
पण महाराष्ट्राच्या या मँचेंस्टरमध्ये मात्र घडते आहे उलटेच....

# गुंडगिरीविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांना मारहाण कशासाठी ?

सुभाष काळे

इचलकरंजी डेक्कन को. ऑप. स्पिनिंग मिलचे आवार. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशनचे अँथनी बर्टन, मायकेल गैरंड आपल्या कपाळावरील घाम पुशीत दूरदर्शन कॅमेऱ्याने एकेक दृश्य टिपीत होते. अखेरचा शॉट पूर्ण होताच हात उंचावून अँथनी बर्टन ओरडला·

'ओ के ऽऽ कट् ऽ'

आणि त्याबरोबरच चित्रीकरणासाठी पेटविलेले प्रखर प्रकाशझोत एकदम शांत झाले.

ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधी मावळत नव्हता त्या ब्रिटिशाची सत्ता दुसऱ्या महायुद्धानतर एखादी मेणबत्ती वितळत जावी तशी वितळत गेली. एकेक देश ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होत गेला !

साम्राज्यसत्ता अस्तंगत झाली तशी त्याची इतर देशावरील आर्थिक पकडही ढिली होत गेली. एक गरीब राष्ट्र म्हणून मदतीसाठी अमेरिकेच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी एके काळच्या या सम्राटावर आज आली आहे.

भारत ब्रिटिश साम्राज्याच्या गुलामगिरीत असताना अनेक प्रकारचा कच्चा माल येथून नेला जात असे. त्यात प्रामुख्याने कापूस होता. भारतीय कापसाच्या तलम धाग्यावर मँचेस्टरचे वैभव दिमाखाने उभे होते. भारत स्वतंत्र झाला आणि त्याबरोबर मँचेस्टरचा कापूस–पुरवठा बंद पडला. साहजिकच मँचेस्टर–कापडउद्योगाला उतरती कळा लागली. आज मँचेस्टरची अवस्था बंद पडलेल्या सोलापूरच्या जुन्या गिरणीच्या मार्गावर आहे.

ब्रिटिशाना हे अनपेक्षित होते अशातला भाग नाही. अपेक्षित होते; पण हे सर्व इतक्या अल्पावधीत घडेल असे त्यांना वाटले नव्हते. भारतातला कापडउद्योग स्वयंपूर्ण व्हायला निदान पन्नास वर्षे तरी लागतील, तोपर्यंत मँचेस्टरचा कापडउद्योग सावरता येईल असा त्याचा कयास होता; पण त्याच्या भ्रमाचा भोपळा भारतीयांनी अवघ्या वीस वर्षांत फोडला ! कापडउद्योगातल्या भारतीयांची नेत्रदीपक प्रगती पाहून ते अवाक बनले. एखाद्या धनाढ्य माणसावर अचानक भीक मागायची पाळी यावी तसे हे एके काळचे ब्रिटिश-सम्राट कापडउद्योगातली आपली बेइज्जत लपवीत, त्याच्या कारणाचा शोध घेत जगभर भटकू लागले. शोध घेणाऱ्यांत बी. बी. सी. ही मागे नव्हती. मुळापासून शोध घेण्याचा बी. बी. सी. चा प्रयत्न म्हणजेच त्यांचा 'राईज अँड फॉल ऑफ् कॉटनकिंग' हा अनुबोधपटाचा आराखडा !

अनुबोधपटाचा निर्णय पक्का होताच अँथनी बर्टन, मायकेल गैरंड व इतर आठ सहकारी अशा दहाजणाचा दूरचित्रवाणी–कलाकारांचा ताफा आपले कॅमेरे सरसावीत भारतात दाखल झाला.

भारतात आल्या आल्या त्यांनी प्रथम अहमदाबाद दूरदर्शन-केंद्राचे श्री. हर्शजित ठक्कर याची मदत मिळविली. अहमदाबाद–मुंबईच्या चित्रीकरणानंतर त्यानी अनुबोधपटाचा शेवट महाराष्ट्राचे मँचेस्टर समजल्या जाणाऱ्या इचलकरंजीत करायचा असे ठरविले. या तुकडीने इचलकरंजीतील आपल्या पंधरा दिवसाच्या वास्तव्यात सहकारी सूतगिरण्या, जुन्या व नव्या पद्धतीचे अद्ययावत यंत्रमाग-दत्ताजीराव कदम टेक्स्टाइल इन्स्टिटयूटमधील लॅबोरेटरीचे चित्रीकरण पूर्ण करून इचलकरंजीतील राजवाड्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या अनुबोधपटाचा समारोप केला.

असे हे ब्रिटिश वस्त्रोद्योगाला नामोहरम करण्यात प्रमुख वाटा उचललेले, जागतिक पातळीवर पोचलेले महाराष्ट्राचे मँचेस्टर आज शांत नाही ! समाधानी नाही ! प्रसन्न तर नाहीच नाही ! तीव्र असंतोष खदखदत आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणूस त्रस्त झाला आहे.

मिरजेतल्या अरबाच्या वास्तव्यावर लेखमाला लिहिण्याचे माझे काम चालू असताना एका रात्री सहज सांगलीतील हिंदु एकता आंदोलनाच्या कार्यालयात गप्पा मारीत बसलो होतो. नारायणराव कदम, प्रकाशराव जगताप, शिवाजीराव ठोंबरे, प्रभाकरपंत पटवर्धन किश्श्यावर किस्से बाहेर पडत होते. पान-तंबाखूचे बार भरले जात होते. गप्पाना चांगला रंग चढलेला होता. तेवढ्यात इचलकरंजीहून हिंदु एकतेचा एक कार्यकर्ता तिथे आला.. आल्या आल्या त्याने आपले अंग उघडे करून नारायणराव कदमाना दाखविले. त्याला पोलिसांनी बेदम मारहाण केली होती. 'ठीक आहे मी उद्या येतो' असे त्या कार्यकर्त्याला सागून कदम माझ्याकडे वळून म्हणाले,

'काळे, हे पहा पोलिसांचे उद्योग ! आपल्या सहकाऱ्याची विचारपूस करण्यासाठी म्हणून हे कार्यकर्ते पोलीस-स्टेशनवर गेले असताना त्यांना मिळालेला हा प्रसाद! आपण उद्या सकाळी माझ्याबरोबर आलात तर प्रत्यक्षच हे सर्व पहायला मिळेल !'

## गुंडगिरी–आरोप

अरबप्रकरणात सर्वात महत्त्वाचा रोल हिंदु एकतेचा होता. साहजिकच हिंदु एकतेबद्दलची जास्तीत जास्त माहिती गोळा करण्यासाठी मी भटकत होतो. इचलकरंजीतल्या हिंदु एकताबद्दलही मी बरेच ऐकून होतो. आपण इचलकरंजीला एकदा जाऊन येऊ असे मी नारायणरावांना म्हटले होते. आज-उद्या करीत आठवडा लोटला होता. ती वेळ अशी चालून आली !

'ठीक आहे. उद्या सकाळीच निघू !' असे म्हणून मी इचलकरंजी-भेटीचा कार्यक्रम निश्चित करून टाकला.

दुसरे दिवशी सकाळीच मी, नारायणराव कदम आणि तो कार्यकर्ता असे तिघेजण इचलकरंजीत जाऊन दाखल झालो.

महाराष्ट्राचे मँचेस्टर ही उपमा कोणाच्या डोक्यातून निघाली हे माहीत नाही; पण इचलकरंजीत पाऊल ठेवल्यानंतर ही उपमा किती योग्य आहे हे मात्र लगेच पटले. इतर कोणत्याही शहराने हेवा करावा असे हे इचलकरंजीचे उद्योग-वैभव आहे. कोणत्याही भागात जा ठाक ऽऽ ठाक ऽऽ हा यंत्रमागाचा आवाज कानावर पडतो. स्वातंत्र्योत्तर अवघ्या पस्तीस वर्षांच्या काळात इचलकरंजीने वस्त्रोउद्योगात ही नेत्रदीपक प्रगती करून दाखविलेली आहे. स्वातंत्र्यापूर्वीचे हे पंधरा-वीस हजार वस्तीचे छोटेसे गाव आज दोन लाखाच्या जवळ गेलेले आहे, पण बेकारीचे कुठे नाव नाही ! घरातील साठ वर्षांच्या आजीबाई असोत किंवा त्यांचा दहा-अकरा वर्षांचा नातू असो, रिकामा बसणार नाही. सतत कामात मग्न. प्रत्येक माणसाला कामधंदा पुरविणारी जपानसारखी 'कॉटेज इंडस्ट्री' हे इचलकरंजीचे वैशिष्टये. नव्याण्णव टक्के उद्योगधंदा असलेले हे महाराष्ट्रातले कदाचित एकमेव शहर असावे. पाच-सहा मोठे कारखाने आणि बाकीचा सर्व मजूरवर्ग असा प्रकार इथे नाही. हाताच्या बोटावर मोजण्याएवढ्या प्रोसेस गिरण्या सोडल्या तर बहुतेक सर्व दोन–चार साचे असलेल्या छोट्या कॉटेज इंडस्ट्रीज आहेत. अशा उद्योगमग्न शहराला गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून कलहाचे गालबोट लागलेले आहे. येथला कलह औद्योगिक कलहात मोडणारा नाही. वास्तविक पाहता मालक–मजूर हा संघर्ष तीव्र हवा. कारणे काहीही असोत, तसा संघर्ष अस्तित्वात असला तरी तीव्र स्वरूपाचा नाही. यासंघर्षाची झळ सर्वसामान्यांपर्यंत पोचलेली नाही. हेही लक्षात घ्यायला हवे. येथला संघर्ष औद्योगिक क्षेत्राबाहेरचा आहे. दोन नंबरचे धंदे करणारे, सत्तेच्या आश्रयाने जगणारे लोक येथे बरेच आहेत. वाममार्गाने आलेली संपत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नाही. साहजिकच संपत्तीच्या जोरावर ते वाटेल ते साध्य करू पाहतात. त्यांना विरोध करते आहे हिंदु एकता !

वाममार्गीयांच्या अशा एका ग्रुपने इचलकरंजीत बरेच थैमान घातले होते. मारामाऱ्या, खून, बलात्कार हे प्रकार फार झाले होते. १९७७ मध्ये इचलकरंजीतले एक सत्प्रवृत्त गृहस्थ कांग्रेसपुढारी श्री. तात्यासाहेब रामलिंग कबाडे यांचा गुंडांनी रात्री आठ-नऊच्या दरम्यान खून पाडला ! या प्रकरणी आवळे यांना पकडण्यात आले होते. ते न्यायालयात निर्दोष सुटले. दिवसाढवळ्या हे सर्व घडत होते; पण हे थोपविण्याची हिम्मत मात्र कोणातही नव्हती. हिंदु एकतेची स्थापना १९८० मध्ये झाली. त्यांनाही दोन वर्षे मारच



कै. तात्यासाहेब रामलिंग कबाडे यांचा खून झाला.

खावा लागला. त्यांचे अनेक कार्यकर्ते जायबंदी होऊन दवाखान्यात गेले. तेव्हा हिंदु एकतेच्या मदतीला कोणताही राजकीय पक्ष धावून आला नाही. पोलीसदेखील गुंडांच्या विरोधात तक्रार नोंदवून घ्यायला घाबरत होते. मग हिंदु एकतेने प्रतिहल्ले चढवायला सुरुवात केली. हिंदु एकतेच्या एका कार्यकर्त्याला दवाखान्यात जावे लागले तर त्याचा बदला म्हणून चार गुंड जेव्हा हॉस्पिटलमध्ये पडू लागले, तेव्हा कुठे वचक निर्माण झाला.

वस्तुस्थिती लक्षात न घेता म्हणा किंवा हेतुपुरस्सर म्हणा हिंदु एकतेवर गुंडगिरीचा आरोप केला जातो. पोलीसइन्स्पेक्टर श्री. हिंदुराव पाटील यांनी देखील त्याचा पुनरुच्चार माझ्याशी बोलताना केला. या वेळी इचलकरंजी हिंदु एकतेचे अध्यक्ष श्री. गजानन मुरदंडे हे उपस्थित होते. अर्थात हिंदु एकतेचे कार्यकर्ते गुंडगिरी करतात हे त्यांनाही मान्य आहे; पण ही गुंडगिरी सर्वसामान्य लोकांबरोबर नव्हे तर गुंडांविरुद्धची गुंडगिरी आहे असा त्यांचा दावा आहे. श्री. मुरदंडे यांचे म्हणणे असे की, 'आमच्यावर गुंडगिरी लादली जाते त्याला आम्ही काय करणार ? जी कामे पोलिसांनी लक्ष घालून करायची ती ते करीत नाहीत, गप्प बसतात. अशा वेळी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी पावले उचलावी लागतात. न्याय्य मार्गांनी जर लोक जगूच देत नसतील तर आम्ही करावे तरी काय ?' श्री. मुरदंडे यांच्या बोलण्यातला तथ्यांश मला इचलकरंजीतील आठवडाभराच्या मुक्कामात पटला. हिंदु एकतेने स्वतःच्या कार्यकर्त्यांवर अत्याचार करणाऱ्या गुंडांना जसा धडा शिकविला तसा सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्यांनाही शिकवला. एक घटना इथे देण्याजोगी आहे. कु. विद्या नरेंद्र राजेभोसले ही मुजावरगल्लीत राहणारी विज्ञानशाखेला शिकणारी मुलगी. डॉ. नरेन्द्र रामचंद्र राजेभोसले यांची ही कन्या. राजभोसले हे मूळचे पुण्या-मुंबईचे. तीन-चार वर्षांखाली व्यवसायानिमित्त इचलकरंजीत आलेले. कु. विद्याला गुंड इतका त्रास देऊ लागले की, तिला कॉलेजमध्ये जाण्यासाठी घराबाहेर पडणेदेखील कठीण झाले. साहजिकच डॉक्टरांनी त्याबाबत पोलिसांना कळविले पण ते शांतच. नंतर डॉक्टरांनी इचलकरंजीतल्या काही प्रतिष्ठितांच्या कानांवर हा प्रकार घातला. शेवटी त्याचाही उपयोग होत हे नाही लक्षात आल्यावर कोणाच्या तरी सांगण्यावरून ते हिंदु एक-

तेच्या गजानन मुरदडे याना भेटले. वस्तुस्थितीची माहिती घेऊन मुरदंडे यानी पंचवीस तरुणाना बरोबर घेऊन मुजावरगल्लीत प्रवेश केला व त्या मुलीची छेडछाड करणाऱ्या गुंडाना बेदम चोप दिला. आज परिस्थिती अशी आहे की, विद्याकडे डोळे उघडून बघण्याची देखील हिम्मत कोणी करत नाही. स्वत: विद्याने ही हकिकत मला सागितली.

दुसरी घटना आहे इचलकरंजी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. रमाकांत शालगर यांच्या बाबतीतली. श्री. शालगर हिंदु एकतेच्या कार्याचे खूप कौतुक करतात हे जाणवले. भा. ज. प. चा अध्यक्ष हिंदु एकतेचे कौतुक करतो हे पाहून मला आश्चर्य वाटले, म्हणून मी खोदून खोदून त्यामागची कारणे विचारली. त्या वेळी त्यांनी सागितलेली हकीकत डोके सुन्न करणारी आहे. ती हकीकत श्री. शालगर यांच्याच शब्दात देतो–

'काळे, मला प्रथम हे कबूल केले पाहिजे की, भा. ज. प. मध्ये हिंदु एकतेबद्दल फारशी सहानुभूती नाही. 'उडाणटप्पूची टोळी' या शब्दात त्यांची सभावना केली जाते; पण व्यक्तिश: मला तसे वाटत नाही. मला हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांचा फार चागला अनुभव आलेला आहे. पार्टीतल्या लोकाची मते काहीही असोत. मी मात्र तेव्हापासून हिंदु एकतेचा मित्र बनलो आहे. सातारा शहरातही गुंडगिरी आहे. तेथेही गुडानी मुली पळवून नेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यातल्या काही मुलींनी आपल्या आई–वडिलांना पत्र पाठवून सुटका करण्याची देखील विनंती केली; पण प्रतिष्ठेच्या खोटया कल्पनापायी त्यांनी आपल्या पोटच्या गोळघाकडे पाठ फिरवली आहे! माझ्या अगदी जवळच्या नात्यातल्या मुलीला देखील असाच पळवून नेण्याचा प्रयत्न झाला. झाले काय, रविवार सुट्टीच्या दिवशी दुपारी अडीच–तीनच्या सुमाराला नात्यातली ही वीस–एकवीस वर्षांची मुलगी मैत्रिणीला भेटण्यासाठी घराबाहेर पडल्याचे पाहून पाळतीवर असलेल्या गुडानी तिला पळविले. पंधरा–वीस मिनिटांतच कोणी तरी ही हकीकत मला सांगितली. त्या वेळी मी काही कामानिमित्त साताऱ्याला गेलो होतो. मला हे समजताच लगेच मी पोलिसांकडे गेलो; पण पोलीस साधी तक्रार लिहून घ्यायला देखील तयार नव्हते, तेव्हा तपास तर दूरच ! मग मी साताऱ्याच्या हिंदु एकताच्या अध्यक्षांची भेट घेतली. माझी हकीकत ऐकताच तीस–चाळीस हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यानी त्या गुंडाच्या घराला वेढा दिला. गुंडांनी नात्यातल्या त्या मुलीला दोराने हातपाय बांधून एका खोलीत कोंडले होते. लगेच मुबईत हलविण्यासाठी म्हणून गाडीचा शोध चालू होता. हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांनी त्या बद खोलीचा दरवाजा फोडून त्या तरुणीची सुटका केली व त्या गुडाचे घर पेटवून दिले ! हे सर्व घडेपर्यंत एकाही पोलिसाच्या पोटातले साधे पाणीदेखील हलले नाही ! त्या गुंडाचे घर पेटताच मात्र ते तिथे धावत आले. मग तक्रार नोंदवून घेतली. मुलगी पळविण्याच्या आरोपावरून त्या गुंडाला अटक झाली. सध्या कोर्टात ती केस चालू आहे. हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांनी मदत केली नसती तर अवघ्या तासाभरात तिचे जीवन उध्वस्त झाले असते ! त्या घटनेपासून मी हिंदु एकतेचा मित्र बनलो आहे !'

◻

## रक्तदान–जटनिर्मूलन

१० फेब्रुवारी १९८० रोजी हिंदु एकता आदोलनाचा जन्म सांगलीत झाला. त्यानंतर अवघ्या पाच महिन्यांत २० जुलै ८० ला हिंदु एकतेची स्थापना इचलकरंजीत झाली. स्थापनेच्या वेळी आशीर्वाद देण्यासाठी कै. दत्ता बाळ उपस्थित होते. अगदी थोड्या काळातच हिंदु एकतेने इचलकरंजीत बाळसे धरले व ती धंदेवाईक गुंडाच्या विरोधात दंड थोपटून उभी राहिली. साहजिकच गेली पधरा वर्षे त्रस्त झालेले मध्यमवर्गीय आणि कामगारवर्ग या संघटनेच्या पाठीशी उभा राहिला. त्यानंतरचा गेल्या तीन वर्षांचा काळ म्हणजे हिंदु एकताने गुडगिरीविरुद्ध दिलेल्या संघर्षाचा इतिहास आहे.

सर्वसामान्य माणूस गुंडगिरीला तोंड देऊ शकत नव्हता. पोलीस गुडगिरी थोपवू शकत नव्हते. कारण गुंडांनी सत्ताधाऱ्यांचा आश्रय घेतलेला होता. अशा परिस्थितीत हिंदु एकतेने या गुंडगिरीच्या विरोधास उभे राहवयाचे धाडस केले. साहजिकच ही संघटना सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीयांच्या आश्रयाने भक्कम पाय रोवून उभी ठाकली. इतक्या अल्पावधीत मिरज, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, सातारा, कऱ्हाड या भागात ही संघटना कशी काय फोफावली याचा मी जेव्हा बारकाईने तपास केला तेव्हा त्या सर्व ठिकाणी एक कॉमन फॅक्टर आढळला. तो म्हणजे हिंदु एकतेने स्थानिक गुडाविरुद्ध सघर्ष करून सर्वसामान्यांची मिळवलेली सहानुभूती हा होय. ज्याप्रमाणे संघाने केरळात मार्क्सवाद्यांशी संघर्ष करून स्वत:चे पाय मजबूत केले, नेमके तेच हिंदु एकताने कोल्हापूर–सागलीत–विशेषत: इचलकरजीत केले. त्यामुळे संघर्ष हा हिंदु एकतेचा स्थायीभाव बनलेला आहे. निदान तो इचलकरंजीत तरी स्पष्टपणे जाणवतो. अर्थात हा संघर्षाचा मार्ग स्वत: होऊन हिंदु एकतेने निवडलेला नाही, तर तो त्यांच्यावर लादलेला आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

सागलीत हिंदु एकतेची स्थापना होताच त्यानी मिरजेतील अरबाच्या प्रश्नावर आवाज उठविला. त्या निमित्ताने संघटना वाढली तरी तिथे संघटची बांधणी नाही. खुद्द सागलीत तर ती अतिशय विस्कळित आहे; पण इचलकरंजी आणि कऱ्हाडच्या शाखांची बाधणी आणि ताकद हे दोन्ही वाखाणण्याजोगे आहे. किमान दोन हजार तरी कडवे तरुण कार्यकर्ते संघटनेजवळ असावेत !

इचलकरंजी हिंदु एकतेत सर्व समाजाचे कार्यकर्ते मला दिसून आले. त्यात मुस्लिम आणि ख्रिश्चनही आहेत. सत्तार मुजावर, शिरीष डिसोझा, पिटर डिसोझा, मौला नदाफ हे तर नेहमी आघाडीवरच असतात ! त्यातल्या त्यात मौला नदाफ हा तरुण तर अतिशय तडफदार आहे. वयाच्या बाराव्या–तेराव्या वर्षी कर्नाटकातले आपले घर सोडून बाहेर पडलेला मौला गेल्या सहा–सात वर्षांपासून इकडेच आहे. आनंद कोल्डिंगमध्ये काम करतो. मौलावर मालकांचा एवढा विश्वास आहे की, ते आपला संपूर्ण धंदा त्याच्यावर सोपवून बाहेरची कामे करतात !

हिंदु एकतेने फक्त मारामाऱ्या करण्यातच आघाडी मारली आहे असे मात्र नाही. आपली संघर्षाची आघाडी सांभाळत सांभाळत


त्यांनी इतर अनेक सामाजिक व राष्ट्रीय कार्यांना हातभार लावलेला आहे. हिंदु एकतेवर गुंडगिरीचा आरोप करणारे मात्र त्यांच्या या सामाजिक कार्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात. सध्याच्या काळात इतर कोणत्याही दानापेक्षा रक्तदान महत्त्वाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्रात किती संघटना प्रयत्न करतात? महाराष्ट्रात सोडा; मिरज, सांगली, कोल्हापूर, कऱ्हाड, सातारा, इचलकरंजी या भागात किती संघटना नियमितपणे रक्तदानासाठी तत्पर असतात? हिंदु एकतेचे कार्यकर्ते यात महाराष्ट्रात आघाडीवर आहेत. रक्ताची गरज कोणालाही पडो– मग तो ख्रिश्चन असो किंवा मुस्लिम हिंदु एकताचे कार्यकर्ते स्वतः होऊन पुढे सरसावतात. मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये नोकरी करणाऱ्या एका ख्रिश्चन डॉक्टराने तर मला अशी माहिती दिली की, 'रोग्यांना रक्ताची गरज पडली की, संबंधितांना आम्ही सरळ हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांना भेटा असा सल्ला देतो.' तर इचलकरंजी, मिरज, सांगलीतले पोलीसअधिकारी अशा वेळी गाड्या पाठवून हिंदु एकता कार्यकर्त्यांना बोलवून घेतात व त्यांचे रक्त स्वीकारतात. ही माहिती खुद्द पोलिसांनीच दिलेली आहे. डॉक्टर आणि पोलिसांचा हा विश्वास कशाचा निदर्शक आहे?


कोणीही हिंदु एकतेचा इचलकरंजीतला कार्यकर्ता भेटला की, माझे प्रथम दोन प्रश्न निश्चित ठरलेले असत. पहिला, किती वेळा अटक झाली आणि दुसरा रक्तदानाचा. त्यांचे पहिल्या प्रश्नाला उत्तर असे– सात वेळा अटक, आठ वेळा अटक. तर रक्तदान दहा वेळा, अकरा वेळा. इचलकरंजीतल्या हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांनी गेल्या तीन वर्षांत प्रत्येकाने कमीत कमी दहा ते अकरा वेळा रक्तदान केलेले आहे.

कोल्हापूर–जत–परिसरात हिंदु एकताने केलेले दुसरे उल्लेखनीय कार्य म्हणजे 'देवदासी' पद्धतीला आळा घालण्याचे व 'जट' निर्मूलनाचे. मुलीच्या केसांची जट व्हायला लागली, 'पोरगी देवाला सोडली पाहिजे' 'जट कापणे' हे पाप आहे. अशा समजुतीवर हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांनी जाहीर सभा, घरोघर बैठकांतून हल्ले चढविले. स्वतःच्या हातात कात्र्या घेऊन जटनिर्मूलन केले. त्यामुळे अनेक तरुण मुली माणसात आल्या. ज्या देवदासी विवाह करू इच्छितात अशांच्या विवाहात हिंदु एकतेने पुढाकार घेतला.

या सामाजिक कार्याखेरीज त्यांचे राष्ट्रीय एकात्मतेसाठी देखील प्रयत्न आहेत. पंधरा ऑगस्टचा दिवस ते 'अखंड भारतदिन' म्हणून साजरा करतात. त्या दिवशी ते चौकात समारंभपूर्वक तलवारीने आपल्या हाताची करंगळी कापून घेऊन, 'भारताच्या अखंडत्वासाठी कोणताही त्याग करण्यास मी सिद्ध आहे' अशी शपथ घेतात. या कार्यक्रमाखेरीज शिवजयंती, दुर्गापूजा, महंमद पैगंबर-जयंती यासारखे उत्सव साजरे करतात. प्रत्येक वर्षी–मिरज, सांगली, इचलकरंजी या भागात महंमद पैगंबराच्या जयंतीनिमित्त मिरवणुका निघतात. त्यात हिंदु एकतेचे कार्यकर्ते सर्वांत पुढे असतात. इचलकरंजीत हिंदु एकताच्या अनेक शाखा आहेत. त्यातल्या एका शाखेचे नाव आहे. डॉ. जाकीर हुसेन हिंदु एकता आंदोलन शाखा!'

इचलकरंजीतल्या काही सभा पाहायला मिळाल्या. त्यात हिंदु एकता, धर्मनिरपेक्ष दल, कॉंग्रेस आय इत्यादींच्या सभांचा समावेश होता. सर्वांत जास्त गर्दी पहायला मिळाली ती हिंदु एकतेच्या





श्री. गजानन शंकर मुरदंडे
इचलकरंजी

श्री. प्रकाश शंकरराव जगताप
सांगली

हिंदू एकता आंदोलन

□

सभेला. अगदी अचानक जरी सभा बोलावली तरी कमीत कमी चार-पाच हजार लोक तरी सहज येतात. त्याउलट धर्मनिरपेक्षदलाची स्थिती पन्नासवर माणसे म्हणजे अगदी डोक्यावरून पाणी!

धर्मनिरपेक्षदलाला सर्वजण डी. एन. डी. म्हणून ओळखतात. तिचा जन्म हिंदु एकताच्या विरोधासाठीच जणू! परिस्थिती अशी की कुठेही दोन व्यक्तींमध्ये संघर्ष उडाला की, एकजण हिंदु एकतेच्या आश्रयाला जातो आणि तो हिंदु एकतेकडे गेला म्हणून दुसरा डी. एन. डी. कडे वळतो. त्यामुळे संघर्षाची व्याप्ती कमी होण्याऐवजी वाढत चाललेली आहे. त्यात पोलिसांचा भ्रष्टाचार आणि निष्क्रियता हे तेल ओतण्यास कारणीभूत ठरला आहे.

हिंदु एकतामध्ये बहुसंख्य कार्यकर्ते कॉंग्रेसजन आहेत. कारणे काहीही असोत भा. ज. प. आणि हिंदु एकताचे अजिबात जमत नाही. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी हिंदु एकताचे कार्यकर्ते कॉंग्रेसच्या पाठीशी उभे राहतात हा आजपर्यंतचा इतिहास आहे. याबाबत मी नारायणराव कदम, आप्पासाहेब ताटे वगैरेंशी बोललो, तेव्हा त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की, हिंदुत्वाच्या व्यासपीठावर आम्ही एकत्र येताना जात, पात किंवा राजकीय पक्ष म्हणून पाहण्याचे कारण नाही. 'हिंदु एकतेत' सर्वच पक्षांच्या लोकांना प्रवेश आहे. कोणीही आपला पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून हिंदु एकतेत येऊ शकतो. अधिक चर्चा करण्याच्या हेतूने मी इचलकरंजी हिंदु एकताचे शहर अध्यक्ष श्री. गजाननराव मुरदंडे यांनी गाठले.

गजानन शंकर मुरदंडे हा पस्तीस वर्षांचा तरुण. शिक्षण बेताचेच. पैलवानी थाटाची शरीरयष्टी. घरातले हे शेंडेफळ अपत्य. विवाहित तीन मुले. असा हा तरुण हिंदु एकतेत आल्यापासून सतत एक पाय घरात व दुसरा पाय तुरुंगात ठेवून उभा आहे. पंचवीस वेळा अटक. तीन महिने मिसाखाली स्थानबद्ध. सर्वसाधारण तरुण स्वतःच्या नावाबरोबर आपल्या डिग्रीचा उल्लेख करतो. तसे हे आपले नाव सांगताना मी गजानन शंकर मुरदंडे – मिसामुक्त असा स्वतःचा उल्लेख करतात.

हिंदु एकतेच्या स्थापनेनंतर त्यातील अनेकांना मिसाखाली स्थानबद्ध व्हावे लागले. त्यात महाराष्ट्र प्रांताध्यक्ष नारायणराव कदमही

होते. पण इचलकरंजीतल्या गजानन मुरदंडे, अजित पाटील आणि मदन चव्हाण यांची मिसा हिंदुत्व चळवळीत ऐतिहासिक ठरली आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या काळात हिंदुत्वासाठी लढणाऱ्या संघ, जनसंघ किंवा हिंदुसभेच्या लोकांना जे साध्य करता आले नाही ते इचलकरंजीतल्या या तिघांनी एका तुरुंगवारीत 'मिसाला' आव्हान देऊन साध्य केले. ज्या घोषणांचे निमित्त करून त्यांना मिसा लावला त्याविरुद्ध या तिघांनी मुंबई कोर्टात 'रिट पिटिशन' दाखल केले. या रिटपिटिशनचा निकाल देताना हिंदु एकताने दिलेल्या घोषणा गैर नाहीत एवढाच निकाल देऊन कोर्ट थांबलेले नाही. त्यांनी खालच्या कोर्टावर, जिल्हाधिकाऱ्यांवर अत्यंत कडक ताशेरे मारून शासनाला समज दिली. तर अशा पराक्रमी त्रिमूर्तीतले हे गजाननराव मुरदंडे. त्यांच्या घरीच मी त्यांना गाठले. यंत्रमागाच्या खाडखाड आवाजाच्या पार्श्वभूमीवर आमची मुलाखत सुरू झाली.

'गजाननराव, आपला काँग्रेसशी काही संबंध आहे काय?'........मी

'काही संबंध म्हणजे ? मी काँग्रेसचाच आहे. सामान्य कार्यकर्ता म्हणून मी पूर्वीपासून काम करीत आलो आहे'– – मुरदंडे.

'कोणती काँग्रेस ? इंदिरा की समाजवादी ?'–मी.

काळेसाहेब, आमची काँग्रेस गांधी–नेहरूंची. मागचा इतिहास आपण सोडून देऊ. मागच्या निवडणुकीत मी ना. कल्लप्पा अण्णांचा प्रचार केला त्या वेळी आम्ही समाजवादी काँग्रेसबरोबर होतो. सध्या मी इंदिरा काँग्रेसचा कार्यकर्ता आहे.–मुरदंडे.

हिंदु एकतेच्या कार्यात काँग्रेस सदस्यत्वाचा किंवा काँग्रेसमध्ये हिंदु एकतेच्या कार्याचा कुठे अडथळा येत नाही का ?'–मी.




'कारण काय ? हिंदु एकता ही काही राजकीय संघटना नाही. हिंदुत्वाच्या व्यासपीठावर आम्ही जातीय किंवा पक्षीय भेद मानीत नाही. प्रत्येकाला आपापले धार्मिक कार्य करण्याचे स्वातंत्र्य आहे. सर्व पक्षीय मुस्लिम खासदार धर्माच्या नावाखाली एकत्र येऊ शकतात. त्याला जनता पक्ष किंवा इंदिरा काँग्रेस हरकत घेत नाही. तशी ती घेण्याचे कारणही नाही. मग आम्हीच काय घोडे मारले काय ? हिंदु एकतेत आल्यानंतर आमचा दृष्टिकोन फक्त हिंदु हिताचाच असेल. त्यात राजकारण असणार नाही.' मुरदंडे.

तुमचे इतर हिंदुत्ववादी संघटनांशी संबंध कसे काय ? थोडक्यात संघ, हिंदुसभा यांचेशी संबंध कसे काय ?–मी

'भा. ज. प. आणि हिंदुसभा हे राजकीय पक्ष आहेत. त्यांच्याबाबत विचार करताना काँग्रेसचा म्हणून आम्हाला ते विरोधी पक्ष आहेत. बाकी राहिला रा. स्व. संघ. संघ ही पूर्णपणे सांस्कृतिक संघटना आहे. हिंदुत्वाच्या हितासाठी कार्य करते आहे. आम्हाला ती निश्चितपणे जवळची वाटते.'–मुरदंडे.

'पण काही बाबतीत तुमचे मतभेद असतील त्याबाबत काय निर्णय घेता ?'–मी.

'हिंदुत्वाला पूरक ठरणे, हे आमचे कार्य आम्ही मानतो. पूरक नसले तरी मारक ठरणार नाही याची आम्ही काळजी घेतो. हिंदुत्वाच्या प्रश्नावर आम्हाला मतभेद मान्य नाहीत. संघ, विश्व हिंदु परिषदेच्या कोणत्याही कार्यक्रमात आम्ही सहभागी होतो. संघाच्या आणि विश्व हिंदु परिषदेच्या कार्यक्रमात आम्ही सहभागी होतो. पडेल त्या कार्याची जबाबदारी स्वीकारतो; पण कोणताही संघवाला किंवा विश्व हिंदु परिषदेचा कार्यकर्ता आमच्या कार्यक्रमाकडे साधा फिरकत देखील नाही. जवळपास हिंदु एकतेचा कार्यक्रम असेल तर तेथून निघून जातो. सहकार्य तर दूरच; पण आम्हाला त्याचा राग नाही. हिंदुहिताचे कार्य करणाऱ्या कोणत्याही संघटनेशी संघर्ष करायचा नाही. मतभेद असले तरी पूर्णपणे सहकार्य करायचे हे आमचे ब्रीद आहे !' मुरदंडे.

'आपण पूर्वी बरीच गुंडगिरी म्हणजे मारामाऱ्या वगैरे केल्या आहेत असे मी ऐकतो; हे खरे आहे काय ?'–मी.

'काळेसाहेब, त्यात थोडेफार तथ्य आहे, नाही असे नाही; पण त्यामागची वस्तुस्थिती आपण थोडी लक्षात घ्या. आम्ही काँग्रेसचे तरुण 'भडंग' कार्यकर्ते !'

'भडंग कार्यकर्ते–हा काय प्रकार ?'–मी.

'हो हो–तोच सांगतो. शेव, चिवडा, चुरमुरे, ज्याला तुम्ही लेनिन मिक्चर म्हणता, त्याला या भागात भडंग म्हणतात. काँग्रेसचे पुढारी अशा भडंगांची पोती आमच्या समोर ओतीत आणि 'अमक्या अमक्याचा जरा समाचार घ्या, असे सांगत. अशा वेळी आम्ही त्याचे तंतोतंत पालन करीत असू. चांगले–वाईट न कळण्याजोगे ते वय. साहेब तशा मी बऱ्याच मारामाऱ्या केल्या आहेत; पण मागे. पंधरावीस वर्षांचा असताना, समजायला लागल्यापासून मी साधी कोणाच्या थोबाडीतदेखील मारलेली नाही !'–मुरदंडे.

'गजाननराव, या कृत्यांचा तुम्हाला कधी पश्चात्ताप वाटत नाही का ?–मी

'वाटतो ना ! पण हातून जे घडून गेले त्याबद्दल फक्त पश्चात्ताप

वाटून उपयोग. काय ? तुम्हाला एक हकीकत सांगतो. मागे पधरा-वीस वर्षांपूर्वी अशाच एका मारामारीत मी त्वेषाने चिडून एक मिठाईचे दुकान फोडले. ही गोष्ट घडून गेल्यानंतर मला त्याचा पश्चात्ताप झाला. हिंदु एकतेत मी प्रवेश केल्यानंतर मी त्या मिठाई-दुकानदाराची भेट घेतली व त्याची माफी मागितली. त्या वेळी त्या दुकानदाराला फार आनंद झाला. त्याने, 'गजानन, तुझ्या माफीमुळे माझे झालेले नुकसान आज मिळाले. म्हणून मला मिठी मारली नंतर खाऊ–पिऊ घातले. काळेसाहेब, तुम्हाला आश्चर्य वाटेल हा दुकानदार माझा जिवलग मित्र बनलेला आहे.. अर्ध्या रात्री तो माझ्या मदतीला धावून येतो.'–मुरदंडे.

तुम्हाला मिसात कुठे पकडले ?–मी.

'मी एका लग्नानिमित्त करमाळ्याला गेलो होतो. तेथील पोलीस सबइन्स्पेक्टरनी मला सोलापूरला सिनेमा पाहायला जाऊ अशी थाप मारून सोलापुरात आणले व मिसाखाली अटक केल्याचे सांगितले.'

मिसात काही त्रास ? –मी.

'हो फारच त्रास झाला. आम्हाला सोलापूर जेलला ठेवण्यात आले होते. तिथे जेवण तर खराब होतेच होते, वैद्यकीय सोय, राहण्याची व्यवस्थाही चांगली नव्हती. वेड्या लोकांच्या बराकीत ठेवले होते. त्यामुळे फार त्रास झाला. तशा स्थितीत आम्ही सव्वा दोन महिने काढले ! —'

बेड्या वगैरे घातल्या होत्या का ? –मी.

'अध्यक्ष म्हणून मला त्याची सवलत देण्यात आली होती. बाहेर पडताना माझ्याबरोबर दोन सशस्त्र पोलीस असायचे. पळून जाण्याचा प्रयत्न केल्यास जागेवरच गोळी घालून ठार मारण्याचा आदेश वरिष्ठांनी आमचे समोरच पोलिसाना दिले होते. एकदा अजित पाटलांना बेड्या व दंडाला काढण्या बांधून दवाखान्यात नेण्यात आले. तेव्हा या प्रकाराचा निषेध म्हणून त्याने दवाखान्यात औषधोपचार करून घेण्यास नकार दिला. त्यानंतर मात्र तो प्रकार बद पडला !'

आपल्या सुटकेसाठी कोणी प्रयत्न केला ? –मी

'आमच्या हिंदु एकतेशिवाय अन्य कोणीही माझ्या सुटकेसाठी प्रयत्न केले नाहीत. फक्त हिंदु एकतेचे पदाधिकारी येऊन भेटून जात. सोलापूरचे एक चहाचे व्यापारी श्री. प्रल्हादभाई पटेल यानी आमचा त्यांच्याशी कोणताही संबंध नसताना, पूर्वपरिचय नसताना फार मदत केली–'

आपल्याशी पोलिसांचे वर्तन कसे होते ?–मी

'हे पहा काळेसाहेब, आम्ही राजकीय कैदी होतो. स्मगलर, गुंड किंवा दोन नंबरचे धदे करणारे नव्हतो. तुरुंगात स्मगलर, गुड, दोन नंबरचे धदे करणारांना मानाचे स्थान आहे. पोलीस त्याना सन्मानाने वागवतात. अस्तित्वात असलेल्या आणि अस्तित्वात नसलेल्या देखील सवलती उपलब्ध करून देऊन त्याची सेवा करतात आमच्यासारख्या कार्यकर्त्यांसाठी त्यांचा पोलिसी–खाक्या असतो. येरवडा कारागृहातून पुणेस्टेशनवर जाताना अजित पाटलाने एका पोलिसाला केवळ बक्कलनंबर विचारला. त्याबरोबर त्याने चिडून जाऊन आम्हा सर्वांनाच बेड्या ठोकल्या व दंडाला काढण्या बाधून आमची चालत धिंड काढली. अशा वेळी गप्प बसण्यापलीकडे आम्ही काय करणार होतो ? सबंध मिसाच्या कालावधीत एक देशमुख नावाचा सबइन्स्पेक्टर तेवढा आमच्याशी फार चांगला वागला.' –मुरदंडे.

बरे, आपली डी एन. डी. बद्दलची मते काय ? –मी

बेकायदेशीर व्यवहार करणारे लोक तिच्यात आहेत. काळ्या पैशाच्या जोरावर ते दादागिरी करतात आणि ती दादागिरी चालत राहावी असा त्यांचा नेहमीचा प्रयत्न असतो.– मुरदंडे.

आपल्या संघटनेचे धोरण काय ?– मी

'समान नागरी कायद्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देणार आहोत. सर्वसामान्य माणसांना हक्काची जाणीव करून देणे, त्यांचे दुःख निवारण्यासाठी झटणे आणि देशाच्या अखंडत्वासाठी प्रयत्नशील राहणे हे आमचे ध्येय आहे.' – मुरदंडे.

रात्रीचे दोन वाजले होते. बराच उशीर झाला असल्याने मी शेवटी मुलाखत आटोपती घेतली आणि शिवशंकर लॉजकडे जाण्यासाठी निघालो.

## गाजलेल्या ६ घोषणा

ज्यानी मिसा गाजविला त्यातला दुसरा तरुण आहे अजित पाटील. वय पंचविशीतल्या घरात. अत्यंत तडफदार, हुषार असलेला हा तरुण हिंदु एकतेचा सरचिटणीस आहे. पूर्वी कोणत्याही राजकीय पक्षाशी अगर चळवळीशी संबंध नसलेला तरुण केवळ हिंदुत्वप्रेमापोटी संघटनेत सहभागी झाला. घरात सर्वांत मोठा. आर्थिक परिस्थिती बेताची तसे इचलकरंजीतले हिंदु एकतेचे कोणतेच कार्यकर्ते श्रीमंत नाहीत. दिवसभरातील कामाचे पैसे गाठीला मारून संघटनेसाठी अहोरात्र झटणारे हे तरुण निर्व्यसनी आहेत हे लक्षात घेण्याजोगे आहे. अजित पाटीलही त्याला अपवाद नाहीत. अजित पाटील हे चागले वक्ते देखील आहेत. पाच–पाच हजारांच्या जमावाला वक्तृत्वाने एक जागी खिळवून ठेवण्याचे कौशल्य आणि सर्वसामान्याना रुचेल असा युक्तिवाद करण्याची बौद्धिक कुवत अजित पाटलाजवळ चांगली आहे. असे हे अजित पाटील गेल्या गेल्याच भेटले; पण त्यानी गप्पा मारण्यासाठी दोन दिवसानी येण्याबाबत सुचविले. दोन दिवस थाबून नंतर त्यांच्याकडे गेलो तर त्यांनी गप्पाची व्यवस्था जेवणाच्या टेबलावरच केलेली होती. अजित पाटलाच्या मातोश्री आग्रह करून वाढत होत्या आणि त्याच वेळी आमच्या गप्पाही रंगलेल्या होत्या.

आपण विवाहित की अविवाहित ? – मी.

'माझे अद्याप लग्न झालेले नाही.' – पाटील.

मग या वर्षी विचार दिसतो आहे काय ?–मी

'छे ! छे. सध्या नाही. अजून चार–पाच वर्षे तरी नाही. सार्वजनिक कार्य करणाऱ्यानी लवकर विवाह करू नयेत असे माझे मत आहे.' –अजित.

आपला कोणत्या राजकीय पक्षाशी संबध ? – मी.


कोणत्याही नाही – पाटील.

गुंडगिरी, मारामारी वगैरे काही– मी.

'नाही. तो माझा प्रांत नव्हे.' – पाटील.

आपल्याला प्रथम अटक कधी झाली ? – मी.

'इस्लाम मेळाव्यानिमित्त.' – पाटील.



श्री. अजित पाटील

आपणाला ज्या घोषणांबद्दल मिसा लावला त्या घोषणा आपण खरोखर दिल्या होत्या काय ? – मी.

'होय आम्ही त्या दिल्या होत्या. आमच्यापैकी तिघांनीही ते हायकोर्टात कबूल केले आहे. आम्ही घोषणाच दिल्या नाहीत असा आमचा स्टँड नव्हता तर आम्ही दिलेल्या घोषणांमुळे जातीय तणाव निर्माण होण्याचे कारण काय असा आमचा सवाल होता. त्याच एका मुद्द्यावर आम्ही हायकोर्टापर्यंत शासनाशी भांडलो.' अजित

'त्या घोषणा कोण कोणत्या ?' –मी.

'१) एक धक्का और दो पाकिस्तान तोड दो !

२) जला दो जला दो पाकिस्तान जला दो !

३) जिसको चाहे पाकिस्तान उसको भेज दो कबरस्तान !

४) अरब हटाव मिरज बचाव !

५) अगर इस देशमें रहना होगा तो वंदे मातरम् कहना होगा– आणि

६) हिंदुस्थान हिंदुओंका नहीं किसीके बापका !'

आता हे पहा काळेसाहेब, या घोषणा आम्ही दिल्या. त्यावरून आमच्यावर जाती–जातीतील तेढ वाढविणे, प्रामुख्याने मुसलमानांच्या भावना दुखविणे हा आरोप ठेवून आम्हाला स्थानबद्ध केले.

'आम्ही हिंदु एकता आंदोलनाचे कार्यकर्ते म्हटले की, मुसलमान-विरोधी असे विनाकारण गृहीत धरलेले जाते. आता 'अरब हटाव मिरज बचाव' या घोषणेत गैर काय ? हिंदु एकता आंदोलनाने अरबांच्या मिरजेतील चाऱ्यांबद्दल आवाज उठविला. त्याबाबत शासनाकडे तक्रारीही केल्या होत्या. अरबप्रश्नाबाबत आम्ही मुस्लिम स्त्रीवरील अन्याय नव्हे तर भारतीय स्त्रीवरील अत्याचार म्हणून त्याकडे पाहिले. भारतीय स्त्री, मग ती मुसलमान असो की हिंदु – तिच्या स्वत्वासाठी आम्ही झगडतो. या अरब हटाव घोषणेचा आणि मुसलमानांच्या भावना दुखावण्याचा संबंध शासनाने कसा जोडला हेच आम्हाला समजत नाही.

'आता त्यानंतरच्या 'एक धक्का और दो पाकिस्तान तोड दो, जला दो जला दो पाकिस्तान जला दो आणि जिसको चाहे पाकिस्तान उसको भेज दो कबरस्तान' या सर्व घोषणात कुठेही मुसलमानांच्या भावना, विशेषत: धार्मिक भावना दुखवणारे काहीही नाही. ना पूज्य महंमद पैगंबराबद्दल अपशब्द; ना पवित्र कुराणाबद्दल अनादर. मुसलमान हा शब्दही त्यात नाही !'

'त्यानंतरची 'अगर इस देश मे रहना होगा तो वंदे मातरम् कहना होगा' ही घोषणा. यात मुस्लिम बांधवांविरुद्ध काय आहे ? ही घोषणा एकूण जाती-धर्माचा विचार न करता, या देशाला मातृभूमी मानावयास तयार नाही. त्या प्रत्येकाविरुद्धचा आहे. तो कोणाही धर्माचा असू शकतो. वंदे मातरम, हा स्वातंत्र्याचा घोष आहे. यात भावना दुखवण्याचा प्रश्न येतच नाही. तसेच 'हिंदुस्थान हिंदुओंका नही किसी के बापका' या घोषणेबद्दलही आहे. आपले पंतप्रधान राष्ट्रपतींसारखे नेते 'हिंदुस्थान' असा शब्द हिंदीतून वापरतात. भारताला रूढ अर्थाने आणि आजही परदेशात हिंदुस्थान म्हणतात. भारतातून गेलेला माणूस मग हिंदू असो की मुस्लिम त्याला हिंदु–हिंदुस्थानी म्हणूनच ओळखतात. या ठिकाणी हिंदु याचा अर्थ भारताला मातृभूमी मानणारे अशा वेळी हिंदुस्थान हिंदुओंका हा शब्दप्रयोग भावना दुखविणारा कसा ठरतो हेच आम्हाला कळत नाही. भावना दुखावणे हा शब्द अत्यंत गुळगुळीत आहे. मुसलमानांच्या धार्मिक भावना पाकिस्तानविरोधी,म्हणजे दुसऱ्या एका भारतविरोधी असलेल्या राष्ट्रविरोधी दिल्याने कशा दुखावल्या जातात ? मुसलमान स्त्रियांच्या शीलाचा व्यापार करू इच्छिणाऱ्यांविरुद्ध लढा देणे आणि मुसलमानांच्या भावना दुखावणे यांचा अर्थाअर्थी तरी संबंध आहे का ? काळेसाहेब, हायकोर्टाने याबद्दल शासनावर ताशेरे तर मारलेच मारले पण शासनच मुस्लिम लोकांच्या राष्ट्रप्रेमाबद्दल शंका घेते असे स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे.'

## तुरुंगातले अनुभव

आपल्याला अटक कुठे केली ? –मी.

'मी घरी असताना ६ जानेवारीला रात्री साडेबारा वाजता स्वत: इन्स्पेक्टर व डी. एस. पी. मला घेऊन गेले. इचलकरंजी पोलीस-स्टेशनमध्ये नेल्यावर मी घरातून कपडे व पन्नास रुपये मागविले. तोपर्यंत काहीही सांगितले नव्हते. त्यानंतर मला हातकणंगले येथे नेल्यानंतर स्थानबद्ध केल्याचे सांगण्यात आले. प्रथम आम्हा तिघांना वेगवेगळे ठेवण्यात आले होते; पण आम्ही विनंती केल्यानंतर तिघांनाही एकत्रित ठेवले.'

जेलमध्ये विशेष त्रास वगैरे काही ? –मी.

'जेवण चांगले नव्हते हा तर भाग होताच; पण करमणुकीचे साहित्य मागितले ते आम्हाला नाकारण्यात आले. अखेर मी चित्रे काढण्याची परवानगी मागितली. कोणत्याही परिस्थितीत जेलचे दृश्य कुठेही येणार नाही या अटीवर ती देण्यात आली. ही पहा मी जेलमध्ये काढलेली चित्रे.'

अजित पाटलांनी कारागृहात रंग दिलेली सुमारे डझन-दीड डझन चित्रे पाहिली. खरोखरच ती उत्कृष्ट आहेत. त्यामुळे त्यांना चांगला विरंगुळा मिळाला.

बरे पाटील, तुरुंगातले काही सांगण्याजोगे अनुभव... –मी.

'फारसे नाहीत; पण एक सांगतो. आम्ही आर्थररोडला असताना एक १७ वर्षाची तरुणी एका अरबाला भेटायला तुरुंगात येत होती. तो अरब स्मगलिंगच्या आरोपावरून तुरुंगाची हवा खात होता. त्या अरबाची इच्छा होताच तो त्या तरुणीला बोलावून घेत असे.

आणि पोलीस बिनधास्तपणे तिला व त्या अरबाला एका खोलीत बंद करून त्यांना परस्पर सहवासाचा आनंद लुटू देत. एका स्मगलराने तर मला 'मूर्ख आहात! कसली हिंदु एकता आणि काय घेऊन बसलात' असे सांगून स्मगलिंग करण्याचा उपदेश केला. तर काळेसाहेब, असे आहे आपले तुरुंगखाते! आम्ही करमणुकीचे साहित्य मागितल्याबरोबर आम्हाला नियमावर बोट ठेवून नकार आणि स्मगलरांना मात्र बाई-बाटलीपासून तुरुंगात काय हवे ते उपलब्ध होऊ शकते. याचा आता आपणच विचार करा!'

अजित पाटलांबरोबची मुलाखत संपली त्या वेळी थक्क झालो. पोलीसखात्यातला हा भ्रष्टाचार देशाला कुठे घेऊन जाईल हे सांगता येत नाही.

तिसरे मिसामुक्त आहेत. मदन ज्ञानदेव चव्हाण, वय वर्षे २०, शिक्षण ८ वी पास. अविवाहित. संघटनेत कोणतेही पद नसलेला असा हा सामान्य कार्यकर्ता. त्याची मुलाखत मागितली तर, 'साहेब मी विशेष काय सांगणार?' हेच त्याचे पालुपद. बऱ्याच प्रयत्नानंतर त्याला बोलते केले.

आपल्याला कुठे पकडले?.. मी.

'मंगळवारपेठेत एका मित्राकडे रात्री झोपलो असताना इन्स्पेक्टर पवार आले आणि त्यांनी बोलावून नेले. पोलीसस्टेशनवरून तसेच हातकणंगले येथे नेण्यात आले. तिथे माझ्यापूर्वीच अजित पाटलांना आणण्यात आले होते. त्यांनीच मला आपल्याला मिसाखाली स्थानबद्ध केल्याचे सांगितले.'

इतर कोणत्या पक्षाशी संबंध?– मी.

'कोणत्याही नाही!'

हिंदु एकतेत कसे काय आलात?–मी.

'हिंदुत्वाबद्दल मला अभिमान आहे. हिंदुत्वनिष्ठ संघटना म्हणून मी प्रवेश केला.'

पोलिसांनी काही त्रास वगैरे दिला का?– मी.

'नाही.'

वर्ग कोणता?–मी.

'क वर्गात होतो.'

मिसा कोणता होता?–मी.

'गुंडा-मिसा-सामाजिकदृष्टया विघातक असलेल्यांना लावतात तो.'


घरची काही जबाबदारी?– मी.


'आहे! घरी आई-वडील असले तरी मलाच सर्व बघावे लागते. दुसरा एक भाऊपण आहे.'

तुरुंगात असताना कसे काय?–मी.

'मी व माझा भाऊ आम्ही दोघेही संघटनेत आहोत. कधी माझा भाऊ तुरुंगात तर कधी मी. आतापर्यंत आम्ही दोघांनाही १५ ते १६ वेळा तुरुंगवाऱ्या केलेल्या आहेत, पोलीस फार त्रास देतात. विनाकारण रात्री-अपरात्री उठवून चौकीवर नेतात व दिवस दिवस डांबून ठेवतात. त्याचा आम्हा कार्यकर्त्यांपेक्षा घरच्या लोकांना फार त्रास होतो. घरच्या लोकांची मनःस्थिती सांभाळणे फार अवघड असते.'

हे असे किती दिवस चालायचे? या माझ्या प्रश्नावर 'आम्ही





श्री. मदन चव्हाण  मौला बापूसाहेब नदाफ
हिंदू एकता, इचलकरंजी

¤

किंवा समोरचा शत्रू यापैकी एकजण संपेपर्यंत असेच चालायचे.' या वाक्यात समारोप करून मदन चव्हाण यांनी मुलाखत संपविली.

इचलकरंजीतली ही परिस्थिती एकाकी बिघडली नाही. ती या पातळीवर पोचण्याला इचलकरंजीतले पोलीसखातेही काही प्रमाणात जबाबदार आहे. गुंडगिरीकडे या खात्याचे फार दुर्लक्ष होत आहे. एखादा गुन्हा घडल्यानंतर त्याबद्दल तक्रार करण्याची कोणाची हिम्मत नसायची. असे कोणी धाडस दाखविलेच तर पोलीसच त्याला वाटेला लावीत. साहजिकच गेल्या पंधरा वर्षांच्या काळात गुंडगिरी वाढतच गेली. गुंडगिरीविरुद्ध पोलिसांनी काहीही हालचाल केली नाही; पण हिंदु एकतेने त्या विरुद्ध दंड थोपटताच ते त्यांच्यावर मात्र तुटून पडले!

## तक्रारीवर एकच उपाय

प्रमोद बाळकृष्ण लाटणे हा मॅट्रिकपर्यंत शिकलेला १९ वर्षांचा हिंदु एकतेचा कार्यकर्ता. याला पोलिसांनी ताब्यात घेतले. कायद्यानुसार आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर २४ तासांच्या आत मॅजिस्ट्रेटपुढे हजर करायचे आणि नंतर पोलीसरिमांड घ्यायचा; पण इचलकरंजी पोलिसांनी या प्रमोद लाटणेला इतके बेदम बडविले की, दुसरे दिवशी त्याला कोर्टापुढे उभेदेखील राहता येईना. अशा स्थितीत पोलिसांनी प्रमोदला पोलीस-कस्टडीत पाठविण्याची मागणी केली. त्या वेळी प्रमोद मोठ्याने ओरडला–' साहेब, फाशी द्या; पण पी. सी. नको. मला काल रात्री पोलिसांनी इतके मारले आहे की, मला उभेदेखील राहता येत नाही आणि तरीही आपण पी. सी. दिलीत तर मी आत्महत्या करेन!' प्रमोदच्या या म्हणण्यानंतर कोर्टाने त्याची शारीरिक तपासणी करून घेतली आणि ती भयानक मारहाण पाहून त्यांनी पोलिसांना सुनावले. त्या वेळी पोलिसांनी कोर्टाची माफी मागितली असली तरी छळाची पद्धत मात्र बदलली नाही! हाच प्रकार प्रमोदबरोबर असलेल्या रमेश कबाडेच्या बाबतीतही घडला. रमेश कबाडे हा गुंडाच्या अत्याचाराला बळी पड-

लेले कै. तात्यासाहेब रामलिंग कबाडे याचा मुलगा. हिंदु एकतेचा कार्यकर्ता. त्याच्या बाबतीत तर पोलीस दयामायादेखील दाखवायला तयार नसतात. त्याच्या दृष्टीने रमेशने हिंदु एकतेत प्रवेश केला हा फार मोठा गुन्हा केला.

कोणाचीही चार ओळी जरी तक्रार आली तरी हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांना पकडायचे, बेदम झोडपायचे, नंतर त्याला बेड्या घालून, काढण्या बांधून रस्त्यावरून मिरवत लाबच्या रस्त्याने कोर्टापुढे न्यायचे, ही येथल्या पोलिसाची खास पद्धत. ज्या वेळी कोणाचीही तक्रार नसते त्या वेळी चौकशीच्या नावाखाली आणून मारहाण करायची किंवा कोणी कार्यकर्ता तक्रार घेऊन आल्यास त्याची तक्रार नोदवून न घेता त्यालाच झोडपत सुटायचे हा येथला खाक्या. याबाबत नुकतेच म्हणजे २२।१२।८३ रोजी कोल्हापूरच्या डी. आय. जी.ना श्री. गजानन मुरदडे यानी एक निवेदन सादर केले आहे व त्याच्या प्रती, मुख्यमंत्री, गृहमंत्री याना पाठविल्या आहेत. ते निवेदन आहे तसेच इथे देतो. त्यावरून थोडीफार कल्पना येऊ शकेल.

इचलकरंजी
दि. २२।१२।१९८३

**मा. श्री. डी. आय. जी. साहेब,**
**कोल्हापूर, यांना—**

अर्जदार : श्री. गजानन शंकर मुरदंडे
अध्यक्ष — हिंदु एकता आंदोलन
शाखा — इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

विषय : इचलकरंजीमधील पोलीसखात्याची बेजबाबदार वागणूक व आमच्या कार्यकर्त्यांचा अमानुष छळ.

महोदय,

हिंदु एकता आदोलन ही सघटना १९८१ पासून इचलकरंजी शहरात काम करीत आहे. काम करीत असताना अनंत अडचणीवर मात करून पुढे जावे लागले आहे. काही वेळा सरकारी धोरणाविरुद्ध आम्हाला संघर्ष करावा लागला. हे करीत असताना सामान्य नागरिकाला मात्र कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. उलट सामान्य नागरिकांचे सहकार्य, सहानुभूती आम्हाला लाभली आहे. असे असताना मात्र इचलकरजीमधील पोलीसइन्स्पेक्टर व पोलीस हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांना अपमानास्पद वागणूक देतात. त्याचबरोबर पकडून नेउन अमानुष मारहाण करतात. आमच्या कार्यकर्त्यांनी काही गुन्हा केला तर त्यांच्यावर पोलिसांनी काही कारवाई करू नये अशी आमची अपेक्षा नाही; परंतु पूर्वग्रहदूषित दृष्टी ठेवून हा हिंदु एकतेचा आहे, म्हणून जास्तीत जास्त मारहाण, अमानुष छळ, त्याचेकडून जबरदस्तीने राजिनामे लिहून घेणे, हिंदु एकतेमध्ये जाऊ नका, हवे तर हिंदु महासभेचे कार्य करा, आर. एस. एस. मध्ये जावा असा दबाव आणणे हे मात्र आम्हाला मंजूर नाही. लोकशाहीमध्ये कोणलाही सघटना बाधण्याचा व तिचा प्रचार करण्याचा अधिकार आम्हाला घटनेनेच दिलेला आहे; पण आपले पोलीस मात्र आमचा हा अधिकार हिरावून घेतात हे मात्र आपल्या खात्यास भूषणावह नाही. दिनाक १०।११।८३ रोजी इचलकरंजी सग्रामचौकात सुरेश अबुलाल ढालाईत ह्या तरुणावर चाकूहल्ला झाला. त्यासंबंधी सशयीत म्हणून आमचे कार्यकर्ते १) सुनिल इंगवले, २) लक्ष्मण शेटके, ३) राजाराज शिंदे, ४) बदा सातपुते, ५) उमेश कलडोणे, ६) रगा काबळे, ७) मधुकर टेंबगुडे, ८) बाळू शेटके आदी कार्यकर्त्यांना पकडले व पोलीसकस्टडीत ठेवले व दररोज रात्री वरीलपैकी एक–एक कार्यकर्त्याला बाहेर काढून सब-इन्स्पेक्टर श्री. नदाफ यानी त्याना नग्न करून हातपाय बाधून तोडात बोळे घालून कातडीपट्ट्यानी बेफाम मारहाण केली. एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. त्यानी कार्यकर्त्यांचे गुप्तइंद्रिय पिरगाळले व त्यावरचे केस उपटून तोडात घातले ! हे करीत असता तोडाने ते अर्वाच्य शिवीगाळ करीत होते. तुम्ही हिंदु एकता करता नाही का ? राडेच्यानो, तुमची संघटनाच मोडून काढतो. तुमच्या आई–बहिणीचा लिलाव करीन. गप्प हिंदु एकता सोडा नाही तर तुमचेवर ह्यापेक्षा भनायक खोट्या केसिस घालून तुम्हाला आयुष्यातून उठवीन ! हे प्रकार पोलीसकस्टडीमध्ये झाले. तर एक कार्यकर्ता लॉकअपमध्ये होता त्या वेळी कार्यकर्त्याच्या घरी जाऊन त्याची बायको घरी एकटीच असता तिला सुद्धा दमदाटी दिली व म्हणाले, तुला सुद्धा रात्री पोलीसस्टेशनला नेईन व नागडी करीन ! अशा तऱ्हेने आमच्या कार्यकर्त्यांवर दडपण आणून आमची संघटना मोडू पाहतात. हे पारतंत्र्यापेक्षा भयानक छळ स्वातंत्र्यात होणे, हे कायदा व सुव्यवस्था सांभाळणारे जे पोलीस तेच करू लागले तर हे आम्हास सहन होणार नाही. याचा आपण जर विचार केला नाही व नदाफ याच्यावर काही कारवाई लवकरात लवकर जर केली नाही तर आम्हाला लोकशाही मार्गाने न्याय मिळवून घ्यावा लागेल !


दुसरा प्रकार गावभाग पोलीसस्टेशनचे इन्स्पेक्टर श्री. हिंदुराव पाटील ह्यांनी परवा ता. १४।१२।८३ इचलकरंजीमध्ये डिलक्स हॉटेलवर काही गुडांनी दंगा करून दगडफेक केली. त्या वेळी मी स्वतः त्या लोकांना त्या हॉटेलमधून बाहेर काढले व दंगा थांबविला. अशी वस्तुस्थिती असताना हिंदुराव पाटील यानी तो हॉटेलमालक तक्रार करणार नव्हता तरी सुद्धा त्याला बोलावून घेऊन त्याच्याकडून तक्रार घेतली, त्यामध्ये माझे नाव मुद्दाम घातले व त्यावर त्याची सही घेतली. त्या हॉटेलमालकाला मराठी लिहिता–वाचता येत नाही हे आपण नोद करा. त्यानंतर हिंदुरावानी आमच्या २९ कार्यकर्त्यांची कारण नसताना धरपकड केली व त्या सर्वांना एका अपुऱ्या लॉकअपमध्ये घातले व त्यामध्ये त्यांना धड बसतासुद्धा येत नव्हते. त्या वेळी आमच्या कार्यकर्त्यांना हिटलरच्या गैस्चेंबरची आठवण झाली. वर धाणधाण शिव्या देणे, तोडावर थुकणे, कार्यकर्त्यांचे घरी जाऊन बाईमाणसांना वाटेल त्या शिव्या देणे, दम देणे हे प्रकार केले.

ह्या हिंदुराव पाटलांनी, पूर्वी कोल्हापूरमध्ये असताना तेव्हा आमच्याच संघटनेच्या कार्यकर्त्यांना भडकावून डी. आय. जी. ऑफिसवर बांगडी-मोर्चा काढायला लावले. कारण श्री. आर. वाय. भोसले व श्री. दमामे इन्स्पेक्टर याना बदनाम करण्याचा त्यांचा हेतू होता. हे उघड झाल्यामुळे त्या वेळी त्यांची तावडतोब बदली

झाली. आता हे महाभाग कोल्हापूर जिल्ह्यात आलेत. ह्या हिंदुराव पाटील व नदाफ यांचे दोन नंबरचे धंदे करणाऱ्या लोकांशी घनिष्ट संबंध आहेत. या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा व पोलीसखात्याची जाणारी अब्रू वाचवून आम्हाला न्याय द्यावा.

तसेच गावात कोणत्याही प्रकारची गोष्ट घडल्यास हिंदु एकताचे कार्यकर्ते अटक केले जातात व त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. ह्या हॅन्यासमेंटमुळे कार्यकर्ते गुंडप्रवृत्तीकडे झुकू पाहतात. याचा उद्रेक गावात कधी ना कधी घडेल व हे सर्व घडविण्याचे काम इनडायरेक्ट पोलीसखातेच करते, याची आपण नोंद घ्यावी. जर आपल्या मनात असेल तर हिंदु एकता कार्यकर्त्यांची सी. आय. डी.मार्फत चौकशी करून योग्य तो न्याय आम्हाला द्यावा. हे सर्व घडले नाही तर एक दिवस इचलकरंजी गावात भयानक परिस्थिती निर्माण होईल व त्याची जबाबदारी पर्यायाने पोलीस खात्यावर राहील याची नोंद घ्यावी व आम्हाला योग्य न्याय द्यावा,ही विनंती.

आपला
गजानन शंकर मुरदंडे
अध्यक्ष
हिंदु एकता आंदोलन
इचलकरंजी, जि. कोल्हापूर



श्री. मालजी पेंढारकर, श्री. कोशकार भिडे यांच्या समवेत उभे असलेले श्री. पंचनदीकर गुरुजी

पोलिसांनी फक्त हिंदु एकतेलाच त्रास दिला असे नाही तर सर्वसामान्यांनादेखील त्रास दिलेला आहे. नदाफ नावाच्या सबइन्स्पेक्टरने श्री. रामभाऊ पंचनदीकर यांची काही कारण नसताना अशीच धिंड काढली. श्री. रामभाऊ पंचनदीकर हे इचलकरंजीतले एक प्रतिष्ठित शिक्षक, बी. एस्सी. बी. एड. सामाजिक कार्यकर्ते. इचलकरंजीतले अनेक वकील, डॉक्टर, प्राध्यापक त्यांच्या हाता- खाली शिकलेले. विलास पवार या गरीब कारखानदारावर झालेला अन्याय या ध्येयवादी शिक्षकाला पाहवला नाही. त्यांनी त्यासाठी सनदशीर व प्रामाणिक प्रयत्न केले व ते विलास पवारच्या पाठीशी उभे राहिले. त्याचा आकस अर्थाअर्थी काही संबंध नसताना पोलीस-सबइन्स्पेक्टर नदाफ यांनी धरला व पंचनदीकरगुरुजींना दहशत बसावी, त्यांचे चारित्र्यहनन व्हावे म्हणून दि. १ जुलै ८३ रोजी बेडया घालून त्यांना कोर्टात नेले आणि तेदेखील नेहमीचे, जवळचे रस्ते सोडून मुद्दाम गर्दीच्या रस्त्यावरून त्यांना चालत नेले. गुरुजींची प्रकृती ठीक नव्हती. त्यांनी, 'मला रिक्षातून घेऊन चला, रिक्षा-भाडे मी भरतो' अशी नदाफना विनंती केली; पण ती त्यांनी धुडकावून लावली !

पोलिसांच्या या निंद्य कृतीने इचलकरंजीतले लोक संतापले. घडलेल्या घटनेची उच्च पातळीवर चौकशी करून सामाजिक प्रतिष्ठितांचा अवमान करणाऱ्या पोलीसअधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी सर्व थरांतून मागणी सुरू झाली. या अधिकाऱ्याला समज दिली जावी अन्यथा यावर आंदोलन उभे करावे लागेल असा स्पष्ट इशारा देणारे पत्रक नागरिकांनी काढले. त्यावर स्वाक्षऱ्या करणारे आहेत—

श्री. रमाकांत शालगर—भारतीय जनता पक्ष, श्री. साळुंखे—मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, श्री. दिरगोंडा पाटील—भारतीय कम्युनिस्ट पार्टी, श्री. विजय जगताप—समाजवादी काँग्रेस, मधुकर बापू परीट—सत्यशोधक तरुण मंडळ, रमेशभाई पंड्या—शहर लाकडी खोकी छोटे व्यापारी संघटना, श्री. गणपतराव फाटक—जनता पक्ष, श्री. भीमराव अतिग्रे, डी. वाय. एफ. ऑफ. गजानन मुरदंडे—हिंदु एकता आंदोलन, मिश्रिलाल जाजू—भारतीय जनता युवा मोर्चा, सदाशिव पाटील—गुमास्ता असोसिएशन, त्याखेरीज श्री. शामराव भिडे व इंदिरा काँग्रेसच्या अनेक नेत्यांनीही त्याबद्दल तीव्र नापसंती

व्यक्त केली. एवढे सर्व होऊनही नदाफसाहेब इचलकरंजीत सुरक्षित आहेत !

' आज इचलकरंजीत काय चालत नाही ? कामगारवस्ती भरपूर असल्याने दारू भरपूर खपते. नगरपालिका जेवढा पाणीपुरवठा करते त्याच्या किती तरी पट अधिक गॅलन हातभट्टी इचलकरंजीत रोज तयार होते. इचलकरंजीत हातभट्टीला 'पोलीसब्रँड' म्हणून ओळखतात. पोलिसांच्या सौजन्याने ती चालते म्हणून तिला 'पोलीसब्रँड' हे नाव बहाल करण्यात आलेले आहे. तर अशी ही 'पोलीसब्रँडची' गटारे. तर इचलकरंजीत वाहतातच; पण व्हीडीओवरील ब्ल्यू फिल्म, तीन पानी जुगार, चक्री जुगार, अफीम, चरसची विक्री इत्यादी व्यवहार अगदी उघडपणे चालतात. इचलकरंजीतील आठ दिवसाच्या वास्तव्यात मी सात ते आठ ब्ल्यू फिल्म पाहिल्या. शाहूनगरमधील टॉकीजजवळ एका सरदारजीचा व्हीडीओ आहे. तो तर सिनेमाची जाहिरात करून नुसता थाबत नाही तर ब्ल्यू फिल्मच्या नग्न जाहिराती बाहेर लावून राजरोसपणे धदा करतो. मी त्याला 'परवानगी कशी काय मिळविलीत ?' म्हणून विचारले तर तो गुर्मीत म्हणाला, 'साहेब, फुकट नाही. महिन्याला तीन हजार रुपयाचा रोख हप्ता देतो आहे, काय समजलात ?'

आता या सरदारजीच्या उत्तरावर मी काय बोलणार ?

नंतर पोलीसइन्स्पेक्टर श्री. हिंदुराव पाटील यांची भेट झाली. त्यांना हा किस्सा सागितला तेव्हा ते म्हणाले, 'पत्रकारसाहेब, तो माझा भाग नाही.'

नंतर मी, ते ज्या भागात काम करतात त्या गावभाग पोलीस–

# मुस्लिम समाजावर काळिमा

अरबांच्या या औषधोपचाराच्या निमित्ताने वाढत्या संख्येबरोबर लोकाची–विशेषत: स्त्रियाची-नीतिमत्ता भयंकर खालावत आहे. मिरज तर आपणास रंगेल बनल्याचे दिसून येईल आणि पैसा मिळविण्यासाठी मिरजेतील व सागलीतील काही नागरिक किती लाचार बनले आहेत हे आपणास कदाचित माहीत नसेल; परंतु मुस्लिम स्वार्थी पुढारी काझी आणि काही समाजद्रोही नागरिक स्वत: पोट भरण्यासाठी व पैसा कमविण्यासाठी काय काय करीत आहेत, याची जाणीव मुस्लिम समाजास होण्यासाठी आम्ही हे पत्रक काढले आहे.

मिशन हॉस्पिटलजवळ व वॉनलेसवाडी येथे राहणारे काही तरुण अरबाचे वाटाडे व एजंट म्हणून काम करतात. अरबाना निरनिराळ्या पक्वान्नासाठी स्मार्ट स्त्रियांची नेमणूक करणे, त्याना सर्व प्रकारच्या सुखसोई उपलब्ध होतील अशा हॉटेल–लॉजमध्ये स्वयंपाक करण्यासाठी पुरुष चालत नाही का ? देखण्या व स्मार्ट मुलीच का लागतात ? हे समाजातील नीतिमत्ता ऱ्हास होण्यास कारणीभूत आहे. तसेच अरबाकडून ह्या एजंटाना पैसा मिळतोच; परंतु हॉटेल व लॉजचे मालकही अरब गिऱ्हाईक आणल्याबद्दल कमिशन देतात. स्वयपाकीण म्हणून काम करणाऱ्या स्त्रियामध्ये मुस्लिम समाजाच्या तरुणीचा भरणा जास्त आहे. दारिद्र्य व अज्ञानाने पिडलेल्या या तरुणी काही दिवसातच कुमार्गाकडे वाटचाल करू लागतात. अरबांच्या श्रीमंतीने दिपलेल्या या तरुणी आयत्याच एजटाच्या जाळ्यात सापडतात व पुन्हा हे एजट नवीन पाखरांच्या शोधात फिरतात. हे असले नीच समाजद्रोही एजंट पैशासाठी आपल्या बहिणी-मुलींसुद्धा अरबाच्या स्वाधीन करण्यास कचरणार नाहीत ! हे एजट कोवळ्या तरुणीशी, की ज्याचे पाय स्मशानभूमीत आहेत अशा जख्ख अरबी म्हाताऱ्याशी मुलीच्या आईबापास आर्थिक परिस्थितीने दारिद्री असल्यामुळे पैशाचे आमिष दाखवून लग्न लावतात. ह्या वठलेल्या वृक्षाबरोबर मुली लग्नास तयार नसतातच; परतु जरी लग्न झालेच तर हे अरब संपूर्ण जबरीने शरीरसुख घेतात व आपल्या मायदेशी जातात.

त्यानतर त्या कोवळ्या मुलीचे भवितव्य काय ? हे कोणी ठरवावे ? त्या बिचाऱ्या मुलीचे दुसरे लग्न होऊ शकत नाही. समाजातील जे स्थान होते ते गमावल्यामुळे दुर्दैवी तरुणी वेश्याव्यवसाय करण्यास उद्युक्त होतात. अशा अनेक मुस्लिम तरुणी आज येथे वावरत आहेत. त्याचप्रमाणे मुदत विवाहानेही लग्न करून घेतात; परंतु मुदत–विवाह म्हणजे काय ? हे मुलीच्या आईबापास माहीत नसते. अरब हे लोढणे घेण्यास तयार नसतो ही गोष्ट समाजाच्या दृष्टीने हानिकारक आहे हे मुस्लिम पुढाऱ्याना व लग्न लावणाऱ्या काझीना का कळत नाही ? जर कोणी अरबाना आपल्या मुली अथवा पाल्य दिल्यास त्या कुटुंबावर समाजाने बहिष्कार टाकावा व जेणेकरून त्यांना लग्नकार्य, इतर सामाजिक कार्य व अंत्यविधी यास सहकार्य देऊ नये. हा एकच समाजद्रोही गजकर्णावर जालीम उपाय आहे. तरी आपण समाजहितासाठी यात सहभागी व्हावे.

## मुस्लिम पुढारी व काझी

जर मुस्लिम पुढाऱ्यांबद्दल सांगावयाचे झाले तर जसे पाऊस सुरू झाला की सपूर्ण माकडे एका झाडावर गोळा होतात आणि आपआपसात चर्चा होते की मित्र हो, आता पावसाळा सुरू झालेला आहे आणि आपण पाऊस थाबला की स्वरक्षणासाठी घर बाधू. परतु खरोखरच पाऊस थाबला की सर्व काही विसरून जातात आणि लगेच या झाडावरून त्या झाडावर व त्या झाडावरून या झाडावर टणाटण उड्या मारतात. त्याप्रमाणे या माकडरूपी मुस्लिम पुढाऱ्यात रात्री थंड वातावरणात सिगरेटचे झुरके ओढत तक्क्याना टेकून हे पुढारी मिटिंगा घेतात व आपण हम्‌ करेंगे, त्यूं करेंगे म्हणतात. सकाळ झाली की सर्व विसरून जातात. वास्तविक पहाता ह्या पुढाऱ्यानी आपल्या समाजाची अब्रू वाचविण्यासाठी जनतेची खास करून तरुणांची व मुत्सद्दी लोकाची साथ घेऊन सरकारचे लक्ष या अरबी लोकाच्याकडे केंद्रित केले पाहिजे होते. तसे काहीच

स्टेशनहद्दीतल्या व्हिडीओंची नावे सांगितली. तेव्हा ते म्हणाले, 'मी काय सांगणार? वरिष्ठांना विचारा!'

इचलकरंजीत इतरही अनेक पोलीसअधिकाऱ्यांना असेच प्रश्न विचारले आणि त्यानी अशीच उत्तरे दिली. टाळाटाळी व उडवा-उडवीची!

¤

पंधरा दिवसाच्या इचलकरजीतील वास्तव्यात मी भा. ज. प., जनता पक्ष, इदिरा काँग्रेस, समाजवादी काँग्रेस, कम्युनिस्ट, शे. का. प. च्या अनेक नेत्यांबरोबर चर्चा केली. या सर्वांनी गुडगिरी आणि पोलिसांचा भ्रष्ट कारभार यामुळे सर्वसामान्य माणूस त्रस्त असल्याचे मान्य केले. हिंदु एकता आंदोलनाने गुडगिरी संपविण्यासाठी केलेले धाडसही त्यांना मान्य आहे; पण त्यांना हिंदु एकतेबद्दल तिळमात्र प्रेम नाही. उलट अनेक बाबतीत ते हिंदु एकतेवर टीका करतात. त्याना हिंदु एकतेचा जनमानसावरील प्रभाव फारसा पसंत नाही. हे असे असले तरी सर्वसामान्य माणसे, मध्यमवर्गीय हे बहुसंख्येने हिंदु एकतेच्या मागे आहेत हे मान्य करावेच लागते.

या नेतेमडळींखेरीज, यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगारानाही भेटलो. महाराष्ट्राच्या अनेक भागातील कामगार इचलकरंजीत येऊन स्थाईक झालेले आहेत. आमच्या सोलापूर-बार्शी भागातलेही अनेक कामगार येथे येऊन राहिलेले आहेत. इचलकरजीत कोणीही माणूस बेकार राहू शकत नाही. दोन वेळचे तो समाधानाने खाऊ शकतो हे अनेकांनी मला सांगितले. त्याबरोबरच दहशत, गुंडगिरी याचा त्रास सर्वांनाच होतो असे सांगितले.

अर्जुन रामा पवार सत्तरी उलटलेला कामगार. सोलापूरचा

# फासणारे समाजकंटक

करत नाहीत. नुसता मीपणा गाजवत फिरतात. जर ह्या पुढाऱ्यांना समाजाकडे लक्ष देता येत नसेल तर निदान न्हाव्याचे दुकान काढून लोकांची मापे काढत समाजसेवा करावी.

समाज खालावत जाण्याचे मुख्य कारण म्हणजे हे मुस्लिम पुढारीच आहेत. त्याचप्रमाणे ह्या पुढाऱ्यांनी अनेक सघटना काढलेल्या आहेत; परंतु ह्या संघटनानी प्रत्यक्षात कार्य मात्र काहीच केलेले दिसून येत नाही. नुसती शब्दरूपी जागा अडवून ठेवलेली आहे. तरी ह्या पुढाऱ्यांनी व समाजाने एकत्र येऊन अरबांचे व एजटांचे समाजद्रोही कृत्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. नाहीतर बकासुर ज्याप्रमाणे प्रत्येक घरातील बळी घेत होता त्याप्रमाणे आपल्या समाजातील प्रत्येक घरातील अल्पवयीन मुलीचे हे अरब बळी घेतल्याशिवाय राहणार नाहीत! तरी ह्याला भीमटोला दिलाच पाहिजे!

तसेच हे काझी धर्माचे पंडित असतात. ह्यानी पैशांसाठी आपल्या समाजातील कित्येक तरुण मुलीचे की जो त्या मुलीला तिच्या आजोबाप्रमाणे शोभतो अशा म्हाताऱ्या अरबाशी लग्न लावून दिलेले आहे. वास्तविक पाहता त्या काझी लोकांनी समाज आणि मुलीचे जीवन इकडे लक्ष देऊन असे वाईट धदे सोडून द्यावेत व अशा लग्नात काझीपणा करू नये. त्यांनी अशी भूमिका घेऊ नये की नवरा मरू दे नाही तर नवरी मरू दे आपणास दक्षिणा मिळण्याचे कारण. त्याचप्रमाणे काही तरुण आणि म्हाताऱ्या अरब लोकांनी या समाजातील तरुण मुलीच्या जीवनाची दुर्दशा करण्यापेक्षा हजरत महंमद पैगंबरांनी सांगितलेले उपदेशाचे डोस येथील लोकाना जर का पाजले तर समाजाचे फार मोठे हित होईल आणि वाईट कुकर्मापासून ते वाचतील. जर का या अरबी, काझी आणि त्यांच्या एजंटानी असली वाईट समाजघातकी कृत्ये सोडून न दिल्यास त्याचे परिणाम त्यांनाच भोगावे लागतील.

शेवटी आपणास समाजहितासाठी असे सागावयाचे आहे की, मुलामुलींच्या लग्नकार्यात उच्च आणि नीच, गरीब-श्रीमंत हा भेदभाव न समजता हम सब भाई भाई है, याप्रमाणे समजून लग्नकार्य करावे आणि आपल्या इस्लामधर्मात उच्च-नीच हा भेदभाव नाही असे पैगंबरानी सांगितलेच आहे, त्या गोष्टीचा मुस्लिमांनी आदर्श ठेवावा आणि पैगंबराच्या या उपदेशांनी मुलीच्या बापाच्या डोक्यावरील ओझे कमी होईल व समाजाचेही हित होईल आणि असे सागावेसे वाटते की समाज सुधारण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची महामूर्ख माणसे समाजासाठी बॅकवर्ड क्लासप्रमाणे शिक्षण, नोकऱ्यांसाठी राखीव जागा व सवलती सरकारकडून न मिळवता फक्त बुरखापद्धत हटाव असल्या मूर्खपणाच्या गोष्टीकडेच याचे लक्ष का केंद्रित होते? मुस्लिम समाजात कित्येक सुशिक्षित बेकार, काही विद्यार्थी हुषार असूनदेखील त्याना शिक्षण घेता येत नाही. त्यासाठी सत्यशोधक मंडळ का पुढाकार घेत नाही?

का हे कठपुतळीप्रमाणे बाहुल्या आहेत?

आमच्या सपूर्ण मुस्लिम बाधवाना ईदमुबारक

खुदा हाफिज

विश्वविजय व्यायाम मडळ, सागली, करीम नूर महंमद बेग, इम्तियाज नजिर हकिम, मजहर हुसेन मुल्ला, जुबेर अब्दुल, मुजीर शिलेदार, इम्तियाज खलील शिलेदार

टीप :- आम्ही समाजाच्या हितासाठी म्हणून हे करीत आहो व हा चाललेला अरबाचा नंगानाच, समाजद्रोही कृत्ये हाणून पाडण्यासाठी ही कल्पना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतरावदादा, केंद्रीयगृहमंत्री चरणसिंग व अरबस्थानचे भारतातील वकील याना देणार आहोत. तरी समाजाने, गरीब-श्रीमंतानी आपल्या या समाजकार्यास मन.पूर्वक साथ द्यावी व समाजातील अरबाचे नीच कृत्य हाणून पाडावे!

कृपया आपण मन.पूर्वक वाचा व आपल्या बांधवासही वाचावयास द्या!

१९७७ मध्ये ईदनिमित्त काढलेले पत्रक.

¤

राहणारा. इचलकरंजीत पॉवरलूमवर काम करतो. सत्तरी उलटली तरी अद्यापही शरीरने चागला धडधाकट. मीही सोलापूर भागातला आहे म्हटल्यावर त्याने जवळ येऊन आपली 'पानाची चंची' सोडली. ' सुपारीपान ' दिले.

' मी येथल्या गुडगिरीबद्दल बरेच काही ऐकतो आहे हे खरे आहे का ? त्याचा त्रास तुमच्यासारख्या कामगाराना होतो का ?' असा प्रश्न मी त्यांना विचारला.

त्यावर अर्जुनराव म्हणाले, ' काळेसाहेब, मी गेल्या पंधरा वर्षांपासून येथे आहे. येथे गुडगिरी फार आहे, हे खरे आहे. साहेब, आपल्या सोलापूरची जुनी गिरणी बद पडली त्यामागे अनेक कारणे आहेत त्यात गुडगिरी हेही एक कारण होते, हे तुम्ही लक्षात घ्या. स्थानिक दादालोकाच्या गुडगिरीला आणि दहशतीला कंटाळून शेठ मुरारकाने गिरणीकडे दुर्लक्ष केले आणि ती कायमची बंद पडली ! एके काळी सोलापूरचा कापडउद्योगात किती दबदबा होता आता तो नावाला नाही. माझे वडील त्या गिरणीत कामाला होते. मीही तेथेच होतो. गिरणी बद पडली आणि देशोधडीला लागलो ! साहेब, ही गुंडगिरी काही चागली नाही !'

अर्जुन पवाराचे म्हणणे अगदी खरे आहे. 'सोलापूरची जुनी गिरणी' हा भारतीय कापडउद्योगातला एक इतिहास आहे. ब्रिटिशांची सत्ता असताना मँचेस्टरच्या बरोबरीने तिचे उत्पादन चालू होते. एके काळी वैभवाच्या शिखरावर विराजमान झालेली 'जुनी गिरणी' आज सोलापूरच्या हजारो कामगाराची व्यथा बनलेली आहे. जुनी गिरणी बद पडल्यामुळे तीस ते चाळीस हजार कामगाराचे संसार उघड्यावर पडून ते देशोधडीला लागले, ही वस्तुस्थिती आहे. या कामगारांपैकी कोणाच्या समोर जुन्या गिरणीचा विषय काढला तर त्याचे चेहरे काळवडतात. हे मी अनेक वेळा अनुभवले आहे. एखाद्याच्या शरीरावर पक्षाघातासारख्या व्याधीने आघात केल्यानंतर तो जसा ते विसरू शकत नाही तसा हा त्यांच्या मनावर झालेला आघात आहे. सोलापूरच्या त्या वेळची परिस्थितीत आणि इचलकरंजीच्या आजच्या परिस्थितीत साम्य वाटते. पूर्वी सोलापुरात जे घडले नेमके तेच आज इचलकरंजीत घडत आहे. एके काळी फार गाजलेली सोलापूरची गुडगिरी आज संपलेली आहे हे खरे असले तरी ती औद्योगिक समृद्धी बरोबर घेऊन संपली आहे, हे लक्षात घ्यायला हवे !

आज इचलकरंजीत औद्योगिक समृद्धी आहे. कोणीही बेकार नाही. प्रत्येक माणूस दोन वेळचे व्यवस्थित खाऊ शकतो असे असले तरी कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती ढासळलेली आहे. अशांततेचे, गुडगिरीचे, दहशतीचे परिणाम कळत नकळत-औद्योगिक क्षेत्रावर होत आहेत. सर्वसामान्य कामगार त्यामुळे त्रस्त आहे. पोटाला मिळत असले तरी दिवसभरात आपल्या मुलीबाळीचे जीवन सुरक्षित राहील की नाही याची धास्ती त्याला आहे. हे असेच जर काही काळ पुढे चालत राहिले तर इचलकरंजीतली परिस्थिती सोलापूर-सारखी झाल्याशिवाय राहणार नाही, हे अगदी कुडमुड्या ज्योतिषी-देखील सागू शकेल !

विषय सपलेला होता; लेखमाला पूर्ण झाली होती. माझे सर्व सामान आवरून मी एस. टी. गाठली. निरोप देण्यासाठी अजित पाटील, गजानन मुरदडे, मौला नदाफ वगैरे आले होते. एस. टी. सुरू झाली. हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांचे निरोपादाखल हालणारे हात मागे गेले. खिडकीतून बाहेर पाहत होतो. डेक्कन प्रोसेस, दत्ताजीराव कदम टेक्सटाइल, रत्नाप्पा कुंभार सूतगिरणी हळूहळू मागे पडत होती. दृष्ट लागावी असे हे इचलकरंजीचे उद्योगवैभव डोळचापुढून पुढे सरकत होते आणि त्याच वेळी अर्जुन पवाराचे ' काळेसाहेब, आपली सोलापूरची गिरणी बद का पडली माहीत आहे ना ?' हे शब्द कानात घुमत होते !

स मा प्त


## ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण


# माइन काम्फ

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

स्त्रियांच्या मेळाव्यापुढे स्त्रीत्वाच्या नव्या जाणिवांविषयी, बदलत्या रूपाविषयी, आव्हानांविषयी एखादं व्याख्यान ठेवलं की एक प्रसंग हमखास घडतोच. वक्त्यानं जीव तोडून साध्या राहणीचा, अर्थपूर्ण जगण्याचा, व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा पुरस्कार केलेला असतो आणि व्याख्यानानंतरच्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात एखादी तरी तरुणी, पुरंध्री हिरीरीनं उठून माफक धिटाईनं विचारतेच, 'ते तुमचं साध्या राहणीचं ऐकायला ठीक वाटतं; पण आम्हालाच नटायला आवडत असेल तर ?' किंवा 'तरुण वय आहे, चार पैशांची ऐपत आहे, मग आम्ही रंगरंगोटी केली तर काय बिघडलं ?' सगळीकडेच असा प्रश्न इतक्या थेटपणे विचारला जात नसेलही कदाचित; पण एकूणच, चांगलं दिसणं हा काय गुन्हा आहे का, असा उघडछुपा सूर कित्येकींच्या प्रतिक्रियांमध्ये हमखास आढळतो. त्याच्याही पुढे जाऊन काहीजणी वक्त्यांच्या रंगरूपाबद्दल, वयाबद्दल अनुदार शेरे मारतात आणि हा सगळा प्रकार 'कोल्ह्याला द्राक्षं आंबट' या तत्त्वाबरहुकूम असावा, असाही ग्रह करून घेतात. 'ह्यांना एक जमत नाही म्हणून—'

या सगळ्या युक्तिवादामधली धिटाई किंवा क्रांतिकारकता मला मात्र सपशेल फसवी वाटते. चांगलं दिसणं हा खासच गुन्हा नाही. देहाकडे लक्ष द्यावंसं वाटणं, तो सजवावासा वाटणं या मनुष्याच्या सहज प्रवृत्ती आहेत. वयाच्या, जीवनाच्या विशिष्ट अवस्थांमध्ये या प्रवृत्ती अधिक उफाळून येतात हेही नैसर्गिक आहे. माणसांच्या इतर भुकांमध्ये जसा व्यक्तीव्यक्तीगणिक फरक असतो तसाच या बाबतीतही असू शकेल, काहींना उपजतच देहाचं भान जास्त असेल, काही त्याच्या रंगरूपाबद्दल उदासीन असतील हेही समजण्यासारखं आहे. प्रश्न आहे तो जीवनव्यवहारामधल्या अग्रक्रमाचा. या अग्रक्रमाचं भान जेव्हा सुटतं तेव्हा रंगरूपासारख्या बाह्य गोष्टी अवास्तव भाव खाऊन जातात, प्रमाणाबाहेर वेळ, पैसा किंवा शक्ती ह्यांचा ऱ्हास करतात आणि त्या नादात बुद्धीच्या, मनाच्या विकासात कित्येकदा अडथळासुद्धा आणतात.

आजही आपल्याकडे मुलीचा जन्म हा कुटुंबाच्या दृष्टीनं 'हौशीची सुरुवात' असते. मुलीचा जन्म मुलाच्या जन्माइतका आनंददायक नसला तरी यथाशक्ती कपडे, दागिने जो तो करतोच. लहानलहान मुलींना शाळेच्या, बालमंदिराच्या गॅदरिंगच्या निमित्तानं अमर्याद नटवलं जातं. कित्येकदा ती शिक्षिकांची, पालक आयांची अपुरी इच्छाही असू शकते; पण अद्ययावत सिनेमातल्या एखाद्या नटीच्या मॉडेलनुसार पाचसात मिनिटांच्या नाचातल्या मुलींचे केसकपडे वगैरे केलेले सर्रास दिसतात. घरात, शाळेत, सणसमारंभामध्ये मुलगी चांगली दिसली पाहिजे, मुलगा त्याबाबत बेफिकीर असला तरी चालेल असाच संस्कार नकळतपणे होत असतो. सारांश म्हणजे या काळात मुलीच्या अंतःप्रेरणेने नव्हे तरी बाह्य दाबाने मुलगी नटते-मुरडते. पुढे वयात येऊ लागल्यावर काही काळ देह हा तिच्या सर्व संवेदनांचा केंद्रबिंदू बनतो; पण तेव्हाच घरातली आई-आजी वगैरे— —हे घालू नको, ते लावू नकोस असे नाना निर्बंध घालू बघतात. हळव्या वयात तिला बाहेरच्या सर्व अनिष्ट प्रवृत्तींपासून जपण्याचा त्यांचा हेतू तर चांगलाच असतो; पण दाबलेल्या इच्छा अधिक उफाळून येतात या न्यायाने या वयातही मुली नटतात मुरडतात. कॉलेजं ह्या तर लग्नाच्या वेटिंग-रूम्ज (महाविद्यालयं ही लग्नाच्या स्टेशनवरची प्रतीक्षालयं) त्यामुळं व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या किंवा अत्यंत बांधून ठेवणाऱ्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त साधं, जुजबी पदवीशिक्षण जिथे मिळतं ती कॉलेजं ही नटव्या, दिखाऊ, सुंदर मुलींचे अड्डेच बनून जातात. या सर्वांना सन्माननीय अपवाद आहेतच; पण नियम इतका गाढ आहे की, या वयात केसकपड्यांविषयी निरिच्छ असणारी मुलगी हा चेष्टेचा विषय तरी बनतो, नाही तर दयेचा विषय तरी बनतो. सारांश इतरांसाठी, स्वतःसाठी, गरज म्हणून, सवय म्हणून मुली आपल्या नटतच असतात.

या सर्व सायासातून हवा तसा नवरा गळाला लागला की पुढं त्याला खूष ठेवण्यासाठी नटणं आलंच. कधी त्याच्या प्रतिष्ठेसाठी, त्याच्या कुटुंबातल्या लोकांचं लक्ष वेधण्यासाठी, कपड्यादागिन्यांच्या प्रदर्शनासाठी, कधी वय भरात आहे म्हणून, कधी उतरणीला लागलं म्हणून !

कित्येक वेळा या नटण्यामुरडण्याचा गृहिणींना जाच असतो. हवामानाप्रमाणे, मुलं लहानमोठी असतील त्याप्रमाणे प्रकृती नरमगरम असेल त्याप्रमाणे नटण्यात सूट मिळावी असं वाटत असतं; पण ते बोलून मात्र दाखवता येत नाही. सुंदर दिसण्याची (यात तरुण दिसणं अभिप्रेत आहेच.) टांगती तलवार कायमची मानेवर असते. भरीत भर स्त्री नोकरी, व्यवसाय करणारी असेल तर त्या वर्तुळातही तिची छाप पडावी लागते. तिथे तर पुरुषसाम्राज्य मोठं, ही अल्पसंख्यांकात, त्यामुळं आकर्षक दिसणं अपरिहार्य होऊन बसतं. गंमत म्हणजे ज्या पुरुषांच्या दृष्टीसाठी हे सौंदर्य जोपासायचं त्यांची स्वतःची राहणी बहुधा एकसारखीच असते. घरात, बाहेर, सणसमारंभांमध्ये, चर्चा, मैफिलींसाठी ठळक असे बदल पुरुषांच्या बाह्य पेहेरावात होत नाहीत. निदान सक्तीपोटी होत नाहीत. पैशांची सुबत्ता असेल, छानछोकीकडे कल असेल तर कपड्यांची चैन पुरुष करू शकतो; पण ती स्वतःसाठी कोणाच्या तरी प्रतिष्ठेसाठी किंवा दृष्टिसुखासाठी नव्हे. हे सगळं इतकं सनातन आहे की, खटकणं तर सोडाच, खुद्द स्त्रियांच्याही लक्षात यातली सक्ती येत नाही आणि अतिपरिचयानं, खरोखरच नटणं-मुरडणं आपल्याला सदासर्वकाळ आवडतंच असं बायकांनाही वाटतं.

आपल्याकडे गेल्या चार–पाच दशकांमध्ये क्रमाक्रमानं स्त्रियांची भूमिका किती बदलली, किती व्यापक झाली; पण स्त्रीसौंदर्याची


त्यांच्या मात्र आपण बदलायला तयार नाही. त्यात तशीच रंगरंगोटी हवी, तसाच विशिष्ट अवयवांना उठाव हवा, तसेच विभ्रम हवेत, त्याहून वाईट म्हणजे सतत तशीच त्याची 'जागरूकता' (कॉन्शसनेस) हवी. असं का ?

दिवसेंदिवस आयुष्याचं व्यापारीकरण होत चाललंय. जीवघेणी स्पर्धा तर आहेच; पण एकूणच माणसामाणसांच्या गलबल्यामध्ये स्वतःकडे लक्ष वेधून कसे घ्यावे हा स्त्री–पुरुष सर्वांपुढेच बिकट प्रश्न आहे. त्यामुळे किमान नीटनेटकेपणा, प्रसन्नता, सुभगता सर्वांनाच फायद्याची ठरणार आहे. इतर अनेक शास्त्रांप्रमाणेच रंगभूषा, वेषभूषा ही शास्त्रेही प्रगत होत आहेत. त्यांचाही फायदा घेण्यात काहीच वावगं नाही. वावगी आहे ती अद्ययावततेची सक्ती, वावगा आहे प्रवाहपतितपणा. एखाद्या मार्मिक अभिप्रायानं, प्रसन्न विनोदानं, सूक्ष्म निरीक्षणानं एखादी व्यक्ती समूहाचं लक्ष वेधून घेऊ शकत नाही का ? अगदी एखादी स्त्रीही ? प्रसंगानुरूप, व्यवसायानुरूप केसकपडे ठेवण्याचं स्वातंत्र्य स्त्रीला नसावं का ? आणि मुख्य म्हणजे या सगळ्याबाबत आपला 'आतला आवाज' काय म्हणतोय हे खुद्द स्त्रियांनाही ऐकू येऊ नये का ? का या कपड्या–दागिन्यांच्या ढिगाखाली हा आतला आवाजच त्या दाबून टाकताहेत ?

'आम्हाला हौस असली तर ?' अशासारखा एखादा प्रश्न ऐकला की, इतके सारे प्रश्न माझ्या मनात उभे राहतात. नेहमीच ते बोलून दाखवले जात नाहीत; पण एकदोनदा बोलून पाहिले तेव्हा ठरलेली उत्तरंच मिळाली ! 'आजच्या व्यापारीयुगात स्त्रीदेहाचं होत चाललेलं व्यापारीकरण, मॉडेलिंग, जाहिराती... अहो, टी. व्ही. वरची वृत्तनिवेदिकासुद्धा सुंदर मुखड्याची असावी लागते ! तिचं निवेदन सदोष असलं तरी चालतं...' इत्यादी इत्यादी. मुद्दा बिनतोड आहे. कटु असला तरी सत्य आहे. फक्त त्यामुळे सर्व स्त्रियांनी नटण्यामुरडण्याच्या आहारी जावं याचं समर्थन होत नाही. आयुष्यात कोणी कशाचं भांडवल करावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; पण भांडवल निश्चित केल्यावर ते जपणं, जोपासणं अटळ असतं. देह किंवा मुखडा हेच ज्या व्यक्तींचं, ज्या व्यवसायांचं भांडवल असेल त्यांनी त्याची भलावण जरूर करावी. रंगमंचावर वावरणारा देह कुरूप, स्थूल असणं किंवा जाहिरातीतली स्त्री बेढब असणं क्षम्य नाही; पण त्याच मापदंडानं बुद्धिजीवी, कलावंत, शास्त्रज्ञ, पुढारी पिंडाच्या स्त्रीला जोखलं की, फसगत होणारच. आपापल्या व्यवसायाचं भांडवल म्हणजे आपापली बुद्धी, कला, छंद, निरीक्षण, वाचन, स्मरण यावर जास्त मेहनत घेताना त्या रूढ अर्थानं सुंदर दिसल्या नाहीत तरी काही बिघडत नाही; पण मुळात त्याविषयी त्या स्त्रियांनाच आत्मविश्वास हवा. निश्चित दिशा हवी आणि प्रवाहाबरोबर भरकटत न जाण्याइतका निर्धारही हवा !

सौंदर्य बघणाऱ्याच्या दृष्टीत असतं हे तर खरंच; पण ते आपापल्या दृष्टीतही असतं. इतरांच्या दृष्टीत सुंदर दिसण्यापेक्षा, तरुण दिसण्याच्या केविलवाण्या धडपडीपेक्षा स्वतःच्या दृष्टीत स्त्रिया सुंदर दिसतील तो सुदिन !

□



# आपली मुलं

## अभ्यास-मुलांचा आणि आपला

● शोभा भागवत ●

मुलांची लहानपणी टेप केलेली कॅसेट ऐकत होतो. आवाज किती वेगळे वाटत होते ! भाषा ताजी होती. बोलण्यात उत्साह होता. मधेच बोलता बोलता मुलीला ढेकर आला तर ती हसत म्हणाली, 'पादले !' त्यावर मुलगा म्हणाला 'पादले नाही ढेकर आली.' सगळं बोलणं किती लडिवाळ होतं. मुलाला विचारतं होते कावळा कसा करतो ? काव काव.

चिमणी कसं करते ? चिव चिव.

पोपट कसं करतो ? पोप पोप्.

कावळा–काव, चिमणी चिव तर पोपट पोप. एकदम तो भलतंच विठू विठू कसं बोलेल ? त्या पोपच मग विठू करायचं. त्याला पोपट दाखवून ऐकवून पुरावा द्यायचा.

किती प्रकारे मुलांचं शिक्षण चालू असतं!

शाळेत गेल्यावर प्राण्यांची माहिती असा एक प्रकार लिहायचा असतो. इतके दिवस चिमणी कशी चिव् चिव् करते, दाणा कशी टिपते, माना कशी वेळावते, घरात टुण टुण उड्या कशी मारते, खिडकीतून उडून कशी जाते, तारेवर कशी बसते हे साभिनय सांगणारं मूल चिमणीची माहिती लिहिताना चिमणीचा रंग करडा असतो असं माहितीचं पहिलं वाक्य लिहितं तेव्हा हा करडा रंग त्याच्या संबंध शिक्षणाला व्यापून राहणार हे दिसू लागतं. अरे, तुला जे वाटतं ते लिही. तू जे एरवी सांगतोस चिमणीबद्दल ते लिही म्हटलं तर मुलाला पटत नाही. बाई रागावतील असं उत्तर मिळतं.

हे मुलाचं नैसर्गिक बाळवळण मोडायचं आणि मग पुन्हा संवेदनशीलता, ललितलेखन हेही अभ्यासक्रमातूनच शिकवू पहायचं

असा आपला प्रयत्न असतो.

हे अभ्यासाचं करडं भूत मुलाला अनेक वर्षं छळतं. लोळवत. निरर्थक गोष्टी पाठ कराव्या लागतात. लक्षात ठेवाव्या लागतात. परीक्षेत पुन्हा लिहून दाखवाव्या लागतात. मुलाचा अभ्यास हा आईवडलांच्या चिंतेचा विषय बनतो. या सगळ्यात नवं नवं शिकण्याची क्षमता, जिज्ञासा, त्यातला आनंद हेही गवसेनासं होतं

एकदा शेवटची परीक्षा दिली, पदवी घेतली की, किती माणसं पुढं अभ्यास करतात ? शिकत राहतात ?

आपापल्या क्षेत्रातलं, व्यवसायातलं आवडीचं नव नवं ज्ञान मिळवणं, काही सखोल विचार करणं हे मोठेपणी चालू राहत ? आणि असे आपण विद्यार्थीदशा हरवलेले पालक पोराच्या मागे अभ्यासाचा ससेमिरा लावत राहतो. मग तीन वर्षांच्या पोरानं अ आ इ ई किंवा ए बी सी डी लिहावं असं आपल्याला वाटतं, त्यानं चित्र, विचित्र श्लोक गाणी पाठ करावीत, म्हणून दाखवावीत असं वाटतं. त्यानं चागले मार्क मिळवावेत, बक्षिसं मिळवावीत, पुढं जावं अशा आपल्या सदिच्छा असतात. ह्या शर्यतीत आपलं मूल काय गमावतं आहे, कोणते ताण सोसतं आहे, त्याच्या प्रकृतीवर त्याचा काही परिणाम होतो आहे का, त्याचं व्यक्तिमत्त्व यातून कोणता आकार घेतं आहे याच भान आपल्याला राहत ?

अगदी दोनच मुलं आपल्याला असली तरी त्यांचे स्वभाव, व्यक्तिमत्त्व सारखी नसतात, सवयी सारख्या नसतात. एक मूल लवकर उठणारं असतं. दुसऱ्याचे डोळे आपण होऊन उघडायची वाट पाहिली तर दहा सुद्धा वाजू शकतात. लवकर उठणाऱ्या मुलाचे डोळे नऊ वाजले की मिटायला लागतात आणि तेव्हा हे उशीरा उठणारं मूल बागडतच असत. ते बारा वाजेपर्यंतही आपल्याला तंगवू शकतं. एक मूल शिस्तीच असतं. त्याला आपले कपडे, पुस्तकं, खेळणी, वस्तूंचे सग्रह उपजतच जपण्याची कला माहीत असते तर दुसरं वेंधळं असतं. काय केव्हा कुठे होतं, कुठे गेलं त्याला पत्ताच नसतो. एक मूल अभ्यासाचा, कर्तव्यांचा ताण घेणारं असतं. अभ्यास पुरा झाला नाही तर त्याला चालतच नाही.ते रडतं, कळवळून रडतं



तर दुसऱ्याला त्याच्या अभ्यासाची काळजी फारशी नसते. दुसरीकडे कुठे गेलं तर हे शिस्तीचं मूल फारसं रमत नाही अस दिसतं. त्याला आपलं घर, आपला परिवार जास्त प्रिय असतो; पण हे दुसरं उनाड मूल इतकं नवं नवं पहायला उत्सुक असतं, समजून घेण्यात पटाईत असतं. त्याचं बाहेर फारसं काही अडत नाही. अभ्यासात सुद्धा असच दिसतं. एकाची भाषाविषयात मुळातच उमज जास्त असते एकाला गणित म्हणजे हातचा मळ वाटतो. एक मूल आनंदी असतं एक गंभीर असतं. शाळेतही एका वर्गातल्या सत्तर मुलामध्ये गणवेष एवढंच साम्य असतं. बाकी प्रत्येकाचं मूळचं धन वेगळंच असतं. ह्या मुलामध्ये जे मुळात नाही ते निर्माण करायचं आणि मुळात आहे ते अधिकाधिक फुलवायचं यासाठी आपल्याला किती तरी गोष्टी शिकाव्या, समजून घ्याव्या आणि डोळसपणे पहाव्या लागतात.

उनाड मुलाला थोडी शिस्त लावावी लागते तेही त्याच्या मूळ प्रेरणा मारल्या जाऊ नयेत याची काळजी घेऊन. शिस्तीच्या मुलाच्या कानात थोडं वारं भरावं लागतं तेही त्याच्या मूळ शिस्तीचा अपमान न करता.

क्रिकेटमध्ये चागला बॅटस्‌मन म्हणे बोलरच्या हातून बॉल सुटेपर्यंत बॉल कसा मारायचा तो निर्णय घेत नाही. त्या पाव क्षणात तो निर्णय घेतो आणि फटका मारतो किंवा मारत नाही. जो आधीच ठरवून ठेवतो अशी बॅट फिरवायची तो चकतो. त्यामुळेच न्‌ष्यानं क्रिकेट, बॅडमिन्टन आपण खेळू लागलो की बॅट आणि बॉल, फूल आणि रॅकेट यांची भेटच होत नाही ! दोघंही आपापल्या मार्गानं निघून जातात !

पालक आणि मुलाच नातंही काहीसं असंच असत. माझ्या मुलानं कसं वागावं, काय व्हावं ह्याचा निर्णय मी आधी घेऊन कस चालेल ? त्याचा कल पाहून, त्याचा पिंड पाहूनच ते ठरवायला हवं.

मोठ्या माणसाची आपण चरित्र वाचतो. मुलाखती वाचतो तेव्हा हे जाणवत की, ती माणस त्याच्या जे मनात होत, जे पटलं त्याच्याशी प्रामाणिक राहिली. आपल्या स्वभावधर्माच्या विरुद्ध ती वागली नाहीत. आयुष्यात कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेताना म्हणूनच त्याच्या सदसद्विवेकबुद्धीन त्याना दगा दिला नाही. आतल्या मनाला जे पटलं नाही ते त्यानी कधी केलंच नाही. त्यासाठी झगडा केला, अनेक गोष्टी गमावल्या; पण स्वाभिमान, निष्ठा कधी गमावली नाही !

आपल्या चिमुकल्या जीवनातही आपल्याला आपलं मन सारखं हे हवं, ते नको, हे बरोबर आहे, हे नाही हे बजावत असत. त्याला 'गप्प बस रे कारट्या !' म्हणून धपाटा घालून पोराच रडण थांबवू पहावं तसं आपण गप्प बसवू पाहतो; पण ते पुन्हा पुन्हा वर येत राहत. ते मन भौतिक गोष्टीमध्ये रमत नाही. आपण त्याला सपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा, लौकिक यानी दडपू पाहतो; पण ते दडपले जात नाही. त्याची मागणी वेगळीच असते.

मग माणस अस्वस्थ राहतात किंवा शांती शोधण्यासाठी कुणी देव, कुणी बुवा, कुणी महाराज, कुणी भगवान यांना शरण जातात. 'हरे कृष्ण हरे रामा' पंथाच्या परकीयाच्या आकर्षणाबद्दल विचारलं असताना एक अमेरिकन बाई सागत होत्या. 'We Americans grow up with lots of toys, lots of books, lots of clothes, lots of things, just things and we find this is not what we wanted' आणि मग जे मिळाल नाही त्याच्या शोधात आम्ही भटकत राहतो.

माझे वडील एक गोष्ट सागायचे. एक कुटुंब असतं. गरीब असत. मुलाना शिकवण असते दुसऱ्याच काही घ्यायचं नाही. एकदा वडील आणि मुलगी रस्त्यानं जात असतात. मुलगी मागे असते. वडलाना रस्त्यात एक सोन्याचा दागिना पडलेला दिसतो. त्याना वाटतं, मुलगी अजाण आहे तिला तो हवासा वाटेल म्हणून ते त्यावर माती टाकतात. तेवढ्यात



ती लहान मुलगी ते पहाते आणि म्हणते, 'बाबा, दुसऱ्याच्या विष्ठेवर तुम्ही का माती टाकताय ? माझ्यावर विश्वास नाही का ?'

अशी एकेक गोष्ट त्या आतल्या आवाजाला पक्की पटावी लागते.

हे काम सोपं नाही. आपली मुलं इतक्या परस्परविरोधी गोष्टी पहात असतात, ऐकत असतात, शिकत असतात की कधीकधी आपल्यालाही तो गुंता उलगडत नाही; तर मुलांना तो कसा उलगडेल ?

यासाठी हा गुंता उलगडण्याची ताकद नसली तरी आपल्याला काही पटलेल्या चागल्या गोष्टीवरची श्रद्धा भक्कम असावी लागते. एवढा वारसा मुलाला दिला तरी त्याला पुढे मार्ग काढता येतो.

एखाद्या घरात विद्याव्यासंग हे मूल्य मुलाना मिळत, एखाद्या घरात औदार्याचा गुण मुलांकडे दिला जातो, एखाद्या घरातून कलांची देणगी मिळते, एखादं घर सरळपणा शिकवतं, सेवा शिकवतं, एखाद घर जिद्द शिकवत. आपल्या घरातून आपल्या मुलाना काय मिळतं आहे ?

ह्या मूल्याचे काही घास भरवता येत नाहीत किंवा इंजेक्शन्सही देता येत नाहीत. जमिनीच्या पोटात पाणी झिरपत जावं तशी ही मूल्यं निरीक्षणातून मनात झिरपत जातात. जाणिवांची मुळं त्याच्यापर्यंत पोचली की, ती व्यक्तिमत्त्वात शोषली जातात आणि शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांच्या आविष्कारातून फुलून येतात.

नकारातून ही मूल्यं देता येत नाहीत.



जसं नीट जेवण्याबद्दल मुलाना आपण शिकवतो. ती सगळं खात नाहीत, टाकतात. मग आपण संतापतो. मी एवढे कष्ट करून स्वैपाक केला त्याची किंमत नाही तुला ? जेवली नाहीस तर सगळी जीवनसत्त्वं कशी मिळणार तुला ? थाब तुला उपाशीच ठेवल पाहिजे दिवसभर मग सगळं जेवशील पटपट !

आपण आपल्या अहकाराची, ज्ञानाची नुसती कारजी उडवत असतो ! मूल या सगळ्यातून काय ऐकत ? आई आपल्याला जेवताना रागावते, बोलते. म्हणजे आईला आपण आवडत नाही. आपण कुणाला तरी आवडत नाही ही भावना त्याना सहन होत नाही आणि मग जेवणावर तो नकार लादला जातो. जेवावसच वाटत नाही. म्हणून तर जेवताना मन प्रसन्न असावं, कटकटी नसाव्यात. भाडणं, वादविवाद नसावेत असं म्हणतात.

आपण मुलाला कसं जेवायला घालतो ? आपल्याला जसं वाटतं आपण केलेल्या पदार्थाचं मुलांकडून, घरातल्या इतर माणसाकडून कौतुक व्हावं तसंच मूल ज्या गोष्टी मनापासून करत त्याचंपण आपण कौतुक केलं पाहिजे. नुसत छान छान म्हणून मुलं फसत नाहीत. तुमचं खरंच त्यात लक्ष आहे का हे ती पहातात. दिखाऊपणा त्यांच्या लगेच लक्षात येतो. आपल्या आई-वडलाना आपण जे करतो त्यात खरा रस नाही हे समजलं की ती आपल्यापासून दूरच जातात.

किती प्रकारे मुलं विचार करू शकतात हे निरीक्षण करणं फार गमतीच असतं मुलगी लहान असताना तिला तो प्लास्टिकच्या टोपल्याचा मनोरा असतो ना तो आणला होता. मला वाटलं ती एकावर एक बास्केटस् ठेवेल आणि खेळेल; पण तिनं एकदा तो मनोरा करून पाहिला. मग एकामागे एक त्या बास्केटस् लावल्या आणि आता झुक्झुक् गाडी झाली म्हणाली, मग तिचं रंगाकडे लक्ष गेलं. सारख्या रंगाच्या जोड्या काढल्या. मग एक मोठी एक छोटी अशा जोड्या लावल्या आणि म्हणाली, 'ही आई आणि हे तिचं पिल्लू.' मग सगळ्या बास्केटस् गोल लावल्या न् म्हणाली, 'हे सर्कसमधले हत्ती गोल फिरतायत्.' त्या एका खेळण्यात ती काय काय पहात होती ! ही तिची प्रतिभा शाळेत निबंध लिहितानाही फुलायला हवी, नाही का ?

सध्या मुलं टी. व्ही.वर क्रिकेटचे सामने पहातात. खेळाडूंची नावं त्याना पाठ असतात. लॉइड कसा चालतो आणि गोम्स कसा धावतो याच्या नकला करतात. गावस्करवर त्याचं प्रेम असत. तो काही कपिलदेव किंवा संदीप पाटीलसारखा इकडे बॅट उचलून तिकडे आउट होत नाही हे त्याचं मत असत. एखादा कॅच कसा गेला ते आपल पाहूणं हुकलं तरस्लो मोशनमध्ये ती करून दाखवतात कसा कॅच घेतला ते. तोंडान रनिंग कॉमेंट्री चालू असते.

'बहुतही खूबसूरतीसे शॉट लगा दिया' हे बहुतही खूबसूरतीसे म्हणत असतात. हे क्रिकेटमधलं निरीक्षण ते शब्दात सागणं, व्यक्त करणं मुलाच्या अभ्यासात झिरपायला हवं. ते नातं शिक्षकाना जोडता यायला हवं; पण शिक्षक जर आठ तास शाळा आणि उरलेले तास शिकवण्या यात गुंतले तर ते मुलांबरोबर कसे राहणार ? मग त्याना नव नवं काही माहीत नसतं. मुलाचं मन कळत नसतं. त्याच्या पूर्वीच्या व्यासंगाच्या शिदोरीवरच ते शिकवत राहतात आणि मुलांचं जीवन आणि शिकण यातली दरी वाढत राहते.

आमच्या शाळेतले बहुतेक सर, बाई पुस्तकातले धडे शिकवणारेच होते; पण काही शिक्षक मात्र असे भेटले की ते अनेक विषयावर आमच्याशी गप्पा मारायचे, मोठी माणसं त्याच्याकडे यायची त्यांच्याशी गप्पा मारा-

यला आम्हाला सोडून निघून जायचे. लायन्स क्लबची पार्टी कशी असते चला बघायला, म्हणून आम्हा सात–आठ मुलाना घेऊन जायचे, आज आपण इंग्रजी सिनेमा पहायचा बरं का म्हणून सिनेमाला न्यायचे, आता तुम्ही किती मार्क मिळवता याला महत्त्व नाही तुम्ही १५।२० वर्षांनी कसे असाल, काय करत असाल त्यात मला रस आहे असं म्हणायचे. ह्या सगळ्यांनी आम्हाला पुस्तकातले धडे शिकवले नाहीत, जीवनातले धडे दिले. त्यानी मुलाच पालकपण स्वत हून स्वीकारलं होतं.

आपल्या मुलानां असे पालक, असे शिक्षक भेटायला हवेत. पालकाना चागलं शिक्षक होता आलं पाहिजे शिक्षकाना चांगल पालक होता आल पाहिजे. जेवढं जमेल तेवढ तरी! वेळ नसतो, पैसा नसतो, ताण असतात, शातता नसते, ह्या सगळ्या सबबी आहेत पालकांच्या आणि शिक्षकाच्याही. ज्याला सर्वात जास्त कामं असतात त्यालाच सर्वात जास्त वेळ असतो असं म्हणतात. कारण त्याला वेळेची किंमत कळलेली असते. वेळेचं चीज करण्याची कला माहीत असते.

'वडलाना वेळ नसतो' ही बहुतेक, घरांमधली आजची किंचित कौतुकान सांगण्याची गोष्ट आहे. यातून अनेक गोष्टी होतात. मुल वाढवण्याच्या आनंदाला वडील मुकतात. आईवरचा ताग वाढतो. आई चिडचिड करते. तो राग मुलावर निघतो. वडील हा प्राणी महत्त्वाचा असतो. मुलाकडे लक्ष देण ही बिनमहत्त्वाची गोष्ट आहे हा संदेश मुलं पकडतात. हा वारसा ती पुढे आपल्या ससारात चालवतात. मुलं बिघडली की, 'तुम्ही लक्ष दिलं असतंत वेळेवर तर असं झालं नसतं.' अस आई वडिलाना सुनावते !

ह्या सगळ्या गोष्टींचं द्रष्टेपण आपल्यात असायला हवं की नको ?

सगळ्याच प्रकारच्या ज्ञानसंपादनाचा वेग आपल्याला वाढवायला हवा. याचा अर्थ धापा टाकत त्यामागे धावायचं असा नव्हे. आपण आपल्या काळात शाळेतून शिकलो, आजूबाजूच्या काही गोष्टीतून, माणसातून शिकलो. आता मुलाना टी. व्ही., चित्रपट, खेळ, पुस्तकं, मासिकं, नाटकं यातून इतक शिकायला मिळतं ! मुलीला शाळेतल्या धड्यात वझीर शब्द आला. वझीर म्हणजे काय ग विचारल तर म्हणाली तो नाही का राजाहून थोडा बुटका असतो आणि तिरका, सरळ कसाही चालतो तो वझीर. पुस्तकातल्या वझिराआधी बुद्धिबळातल्या वझिराशी तिची ओळख झाली यात चुकीचं काय म्हणायचं ? आमच्या वेळी हे असं नव्हतं म्हणून प्रश्न सुटणार नाहीत.

यासाठीच आपलं पालकांचं काम दिवसेदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणार आहे असं दिसतं आहे.

मुलाकडे किती लक्ष द्यायचं आणि दुर्लक्ष किती करायचं, रागवायच केव्हा अन् समजवायचं केव्हा, शाबासकी कधी द्यायची आणि शिक्षा कधी करायची, दूर केव्हा ठेवायचं आणि प्रेमानं पोटाशी केव्हा घ्यायचं याचा विवेक. यातला तोल आपल्याला कळायला हवा, कडकपणे पण वागता आलं पाहिजे आणि मैत्रीपण कायम ठेवता आली पाहिजे ही तारेवरची कसरतच असते. ती करायची तर आपला आपल्याला तोल सापडायला हवा. आपला अभ्यास वाढवायला हवा.

आणि हा अभ्यास म्हणजे काही पुस्तकं घेऊन, नोटस् घेऊन, भाषणं ऐकून, लायब्ररीत बसून करायचा अभ्यास नव्हे.

अभ्यास या शब्दाचा अर्थच एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणं असा होतो. ठीक आहे, आज मला मुलांना गोष्ट सांगता येत नाही; पण मी ती सांगून बघीन. चुकेलमाकेल पण थांबणार नाही. दहा वेळा गोष्ट सागितली, मुलाना त्यातलं काय आवडलं, कळलं की आपोआप चागली गोष्ट सांगता येईल.

आज मला मुलांशी प्रेमानं नाही बोलता येत. मला चटकन् राग येतो. माझी भाषा कडक असते. जेव्हा जेव्हा मी असं बोलेन तेव्हा मी स्वत.ला बजावीन हे चुकलं माझं. पुढच्या वेळी असं नाही बोलायचं किंवा आताच हे वाक्य थोडं शांतपणे, प्रेमानं मी बोलून बघते. मग आपोआप 'गाढवा, लाज नाही वाटत असं बोलायला ?' या वाक्याऐवजी 'का बरं असं बोलायचं ?' 'असं बोलू नये रे राजा. एकदा शब्द तोंडात बसले की निघत नाहीत' अशी वाक्यं सुचू लागतील.

आज मला सताप येतो. मी मुलांना धपाटे घालते; पण मारल्यावरोबर मला जाणवलं पाहिजे हे चुकलं. मुलाला म्हणता आलं पाहिजे. मी खरं तुला कधीही मारायच नाही असं ठरवलं होतं; पण विसरले. रागाच्या भरात लक्षात नाही राहिलं. असं दहा वेळा घडलं की मारणं बद होईल.

आज भांडण झालं की मी मुलीशी बोलणं टाकते. संवाद बंद होतो. तो बद झाला की मला तो संवाद पुन्हा सुरू करता यायला हवा. तिला जवळ बसवून, तिच्याजवळ बसुन मला म्हणता आलं पाहिजे हे बघ कशावरून भाडलो आपण ? तुझं हे वागणं मला आवडलं नाही. मला त्याचा असा असा त्रास झाला. तुला माझं म्हणणं पटलं नाही. कारण मला ते नीट माडता आलं नाही. आता तुला काय वाटतं त्या सगळ्याबद्दल आपण बोलू या. असं होत राहिलं की मुलीचाही माझ्यावरचा विश्वास वाढेल माझीही भांडणाची सवय जाईल.

राग आला की दहा आकडे मोजावेत असं म्हणतात. हल्ली घरात टेपरेकॉर्डर्स असतात. आवाज चढला की टेपरेकॉर्डर सुरू करावा. लगेच आवाज खाली येईल. मुलाच निरीक्षण करण्याचं कौशल्य, मुलांशी सवाद साधण्याचं कौशल्य, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगण्याचं कौशल्य, दुसऱ्याच्या मनातलं समजून घ्यायचं कौशल्य, काही विसरण्याच कौशल्य, काही आठवणीने उल्लेख करण्याचं कौशल्य, क्षमा करण्याच कौशल्य ( त्यात स्वत.लाही क्षमा करणं आलच ) बरंचस देण्याचं कौशल्य आणि श्रेयफुली घेण्याचंही कौशल्य अशी किती तरी कौशल्यं आपल्याला यायला हवीत.

हा आपल्याला मुलं वाढवण्याच्या निमित्तान मिळालेला अभ्यासक्रम आहे. तो फक्त मुलांच्यासाठी घरातच नव्हे तर आपल्या संबंध जीवनातच उपयोगी पडणार आहे आणि केवळ आपल्यालाच नव्हे तर आपल्या मुलाच्याही पदरात हा अभ्यास बरंचस यश घालणार आहे. ☐

## कशासाठी ? मुलांसाठी ?

'आपली मुलं' या लेखमालेतला हा अकरावा आणि शेवटचा लेख.

'या लेखनाबद्दल माझ्या मुलांची मला क्षमा मागायला हवी. त्याच्या बऱ्याच खाजगी गोष्टी मी जाहीर केल्या; पण अशासाठी केल्या की या अनुभवातला चांगला भाग सर्वांपर्यन्त पोचावा. सर्वच मुलासाठी त्याचा उपयोग व्हावा.

ह्या लेखनाच्या निमित्तान आम्ही दोघं नव्या बाळाची वाट पहावी तितक्या उत्सुकतेनं प्रत्येक नव्या लेखाची वाट पहात होतो त्याबद्दल बोलत होतो.

आणि वाचकांचा प्रतिसाद ही काय चीज असते त्याचे अनेक सुखद अनुभव मला या लेखनानं दिले... वाचू या पुढील लेखात–

# आज

# भारतीय गणराज्याच्या

## ३४ व्या वर्धापन दिनीं

आपण प्रतिज्ञा करूं या—


★ आम्ही मिळविलेल्या यशाची जपणूक

★ राष्ट्र निर्मितीसाठीं जीवन समर्पण

★ सर्व उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग

★ दिखाऊ खर्च टाळून काटकसर

★ प्रत्येकाच्या सहकार्यासाठीं आणि ओझ्यात वांटा उचलण्यासाठीं भावी आवाहनास प्रतिसाद



आम्हास दुर्बळ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या
सर्व शक्तींविरुद्ध सतत जागरुक

**वर्तमान आणि भावी**

**आव्हांनास**

**तोंड देण्यास सदा सुसज्ज**

83/421

फिल्मोत्सव–८४

# सर्कल ऑफ डिसीट


## स्क्लोएनडॉर्फचे चित्रपट

जगाचा इतिहास हा वेगवेगळ्या युद्धांनी आणि क्रांत्यांनी सजलेला आहे. या युद्धांनी आणि क्रांत्यांनी चित्रपटसृष्टीला फार मोठ्या प्रमाणावर विषय पुरवलेले आहेत. त्यातही अशा प्रकारचे युद्धपट निर्माण करण्यात परदेशी चित्रपटसृष्टी आघाडीवर आहे. अशा प्रकारच्या युद्धपटांतील भव्यता, डोळे दिपवून टाकणारे आणि हृदय गोठवून टाकणारे चित्तथरारक प्रसंग आणि या चित्रपटांना लाभलेली गती यामुळे या युद्धपटांविषयी एक वेगळंच आकर्षण आढळतं. युद्धपटांची संख्या खूप मोठी असूनही चित्रपटशौकीन न कंटाळता हे युद्धपट वारंवार पाहात असतात. या वर्षीच्या फिल्मोत्सवात व्होल्कर स्क्लोएनडॉर्फ या जर्मन दिग्दर्शकाचा 'सर्कल ऑफ डिसीट' हा चित्रपट बघायला मिळाला. वरवर पाहूलं तर हा युद्धपटच भासावा; पण अधिक खोलवर जाऊन डोकावलं तर युद्धाच्या पार्श्वभूमीवर फुलणारा, पण मानवी मनाचा वेध घेणारा मानवी मनाची गुंतागुंतीची रचना शोधण्याचा प्रयत्न करणारा– –असं काहीसं या चित्रपटाचं निराळंच अंतरंग डोळ्यांसमोर उभं राहातं आणि या पार्श्वभूमीवरून हा चित्रपट मनावर एक निराळाच ठसा उमटवण्यात यशस्वी झाला आहे.

स्क्लोएनडॉर्फचा पहिला चित्रपट 'यंग टोअरलेस' आणि या चित्रपटापासून स्क्लोएनडॉर्फविषयी अपेक्षा बांधल्या गेल्या. या चित्रपटाला १९६६ मध्ये पारितोषिक मिळालं आणि चित्रपटसृष्टीत पाय रोवू पाहणारा स्क्लोएनडॉर्फ एकदम आंतरराष्ट्रीय कीर्तीचा मानकरी ठरला. त्याचा हा पहिलाच चित्रपट; पण हा चित्रपट स्क्लोएनडॉर्फच्या तीन सर्वोत्कृष्ट कलाकृतींपैकी एक मानला जातो. या चित्रपटामुळे जर्मन चित्रपटालाच एक नवी दिशा मिळाली आणि या नव्या सिनेमाचा पुरस्कार स्क्लोएनडॉर्फनं पुढच्या चित्रपटातूनही करण्याचा सपाटा लावला. त्यामुळे नव्या, समांतर चित्रपटांच्या प्रवर्तकांमध्ये स्क्लोएनडॉर्फचं नाव आवर्जून घेतलं जातं.

आपल्या मुलानं डॉक्टर अथवा वकील व्हावं, या कुठल्याही सर्वसामान्य पित्याच्या अपेक्षेप्रमाणे स्क्लोएनडॉर्फच्या डॉक्टर वडिलांची अपेक्षा होती; पण खुद्द स्क्लोएनडॉर्फचा ओढा मात्र चित्रपटांकडे अधिक होता. बाप–लेकाच्या या वादात लेकाच्या हट्टापुढे वडिलांना माघार घ्यावी लागली आणि स्क्लोएनडॉर्फची स्वारी सिनेमॅटोग्राफीच्या शिक्षणासाठी फ्रान्सच्या आय. डी. एच. ई. सी. या संस्थेत दाखल झाली. शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर पॅरिसमध्ये एका दिग्दर्शकाच्या हाताखाली पाचवा सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी मिळाली खरी; पण पद 'सहाय्यक दिग्दर्शक' असं गोंडस असलं तरी पदाचं स्वरूप मात्र 'हरकाम्या'सारखं होतं. ही चहा–कॉफी आणून देणे वगैरेसारखी फालतू कामं करत असतानाच स्क्लोएनडॉर्फनं दिग्दर्शनातील बारकावे, अचूक जागा या गोष्टी निरीक्षणाच्या बळावर आत्मसात केल्या. हा अनुभव आणि फ्रान्समधील जवळजवळ दहा वर्षांचा अनुभव यामुळे चित्रपटाविषयीच्या आणि एकूणच चित्रपटमाध्यमाविषयीच्या, माध्यमाच्या उपयोगाविषयीच्या निश्चित कल्पना मनात तयार झाल्या होत्या. त्या काळात फारसे कलात्मक जर्मन चित्रपट तयार होत नव्हते आणि थोडक्या वेळात फार मोठ्या जनसमुदायावर खोलवर परिणाम करू शकणाऱ्या या माध्यमाकडे अधिक व्यावसायिक दृष्टिकोनातून पण गांभीर्यानं पाहिलं जाणं आवश्यक आहे, असं मानणाऱ्या स्क्लोएनडॉर्फनं, पुरेसा अनुभव गाठीशी जमा होताच स्वतंत्र चित्रपट तयार केला. 'डेर यंग टोअरलेस', 'टीन ड्रम', 'सर्कल ऑफ डिसीट', 'डॉईछलँड इम हर्बस्ट', 'व्हेलेस्का गेर्ट', 'मिशेल कोल्हास' अशा अनेक चित्रपटांबरोबरच त्यानं दूरदर्शनसाठीचे चित्रपट, लघुपट, ऑपेरा वगैरेही तयार केले. साहित्यिक कलाकृतींमधील सामाजिक किंवा राजकीय बांधिलकी दाखवण्याचा त्यानं केलेला प्रयत्न, तसंच चित्रपट अभिव्यक्तीसाठी चित्रपटसृष्टीच्या इतर अंगाचा घटकांचा केलेला उपयोग यामुळे स्क्लोएनडॉर्फचे चित्रपट चौकटीबद्ध झाले नाहीत.

'सर्कल ऑफ डिसीट' हा त्याचा चित्रपट म्हणजे जॉर्ज लास्वेल या युद्धवार्ता-



व्होल्कर स्क्लोएनडॉर्फ आणि मार्गारेट फॉन ट्रोव – पत्रकार परिषदेत...

हूराची कहाणी. जॉर्ज हा एका अनिश्चित, अनाकलनीय अशा मानसिक अवस्थेत सापडलेला असतो. प्रौढावस्थेतला जॉर्ज हा ऑफिसच्या कामाशी एकरूप होऊ शकत नाही की स्वत:च्या पत्नीशी रममाण होऊ शकत नाही. या विचित्र अवस्थेतून सुटका करून घेण्यासाठी आणि त्याचबरोबर आत्मपरीक्षण करण्यासाठी युद्धवार्ताहर म्हणून बैरुतच्या युद्धभूमीवर दाखल होतो; पण कल्पनेतली परिस्थिती आणि सत्य परिस्थिती यात किती अंतर आहे, हे प्राणाची बाजी लावून युद्धाच्या प्रसंगी हजर असणाऱ्या जॉर्जला कळत. युद्धात बळी जाणारे निरपराधी जीव-ज्याचं भविष्यही अजून ठरलेलं नाहीय-अशी बंदुकीच्या गोळ्यासरशी मृत्यूला कवटाळणारी कोवळी मुलं किंवा युद्ध म्हणजे काय याचाही कल्पना नसलेली निरागस मुलं...असे अनेक प्रसंग जॉर्जच्या डोळ्यासमोर घडत असतात. आणि एकीकडे दुसरी माणसं, घरं, दुकानं, इमारती बंदुकीच्या गोळ्यांनी उध्वस्त होत असतात. तर दुसरीकडे हे सारं पाहून जॉर्जही कणाकणांनी उध्वस्त होत असतो. त्याच्या मनाची बाजूही अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे, तो त्याच्याबरोबर या युद्धभूमीवर आलेला छायाचित्रकार, युद्धातील भयानक छायाचित्रांचा लिलाव करून धंदा करू पाहणारा एक माणूस, युद्धातील अनेक भयकर गोष्टींसरशी सनसनाटी, मसालेदार बातमी मिळाल्याच्या कल्पनेनं हुरळून जाणारे सहकारी...या साऱ्या व्यक्तिरेखाच्या विरोधाभासातून; पण या मंडळीजवळ असलेला पूर्णपणे व्यावसायिक दृष्टिकोन जॉर्जजवळ नाही आणि त्यामुळे या युद्धाकडे तो इतक्या तटस्थ आणि त्रयस्थ दृष्टिकोनातून बघूही शकत नाही. 'या सगळ्याचा शेवट काय आणि कुठे?', 'या सगळ्या विनाशाचा परिणाम काय?' अशा अनेक प्रश्नांच्या गुंतावळ्यात तो जास्तच गुरफटत जातो. जॉर्जच्या या व्यक्तिरेखेच्या रूपानं 'सर्कल ऑफ डिसीट' युद्धातील फोलपणावर भाष्य करून जातो. या साऱ्या चढउतारामध्येच हिंदकळत असतानाच जॉर्जच्या आयुष्यात एक प्रसंग असा घडतो की, कणाकणांनी उध्वस्त होणारा जॉर्ज पूर्णपणे उध्वस्त होतो. एका निर्वासितांच्या छावणीत जॉर्ज बसलेला असताना अचानक बाँबहल्ला सुरू होतो आणि छावणीत एकच हाहाकार उडतो. सगळीकडे एकच पळापळ सुरू होते. मरणभयानं वेढलेला एक निर्वासित जॉर्जला घट्ट मिठी मारतो. त्याच्या मगरमिठीतून सुटका करून घेण्यासाठी जॉर्ज खूप प्रयत्न करतो; पण व्यर्थ! शेवटी बाजूला पडलेल्या चाकूवर जॉर्जचं लक्ष जातं आणि जॉर्ज त्या निर्वासिताच्या पाठीत सपासप चाकूचे वार करतो. रक्ताच्या चिळकांड्या उडतात आणि त्या माणसाची जॉर्जभोवतीची मिठी ढिली पडते. त्याच्या रक्तानं माखलेला जॉर्ज जिवाच्या करारानं पळत सुटतो आणि हॉटेलवर येऊन पहिल्यांदा नळाखाली उभा राहतो. अंगावरून गळून पडणाऱ्या पाण्याबरोबर त्याच्या अंगावरचे डाग निघून जातात; पण मनावर पडलेल्या डागाचं काय? आयल्या हातून घडलेल्या या कृत्यानं स्वपर्चस्वाच्या त्याच्या सगळ्या भ्रामक कल्पना गळून पडतात आणि जॉर्ज हवालदील होतो. या साऱ्याचाच परिणाम होऊन शेवटी जॉर्ज आपल्या पदाचा राजीनामा देतो.

या चित्रपटात जॉर्ज आणि ऑड्रियन यांच्या प्रेमकहाणीचा एक पदरही गुफलेला आहे. जॉर्जप्रमाणे ऑड्रियनलाही पॅलेस्टिनी लोकांच्याबद्दल सहानुभूती आहे; पण तिची सहानुभूती ही कागदावरची नाही. ती या लोकांशी संबंध ठेवते. एका मुलाला दत्तक घेते. एका अरबी माणसाशी मैत्री करते. म्हणजे ती खऱ्या अर्थानं त्यांच्यातलीच एक होऊन जाण्यासाठी प्रयत्न करते. साहजिकच तिच्याकडे ओढा असलेल्या जॉर्जला ती मैत्रीखेरीजच्या मर्यादा ओलांडू देऊ शकत नाही. केव्हा तरी तिचं मन आपण वळवू शकू अशी आशा बाळगणारा जॉर्ज ऑड्रियनला भेटायला आलेला असताना तिला आणि तिच्या मित्राला एकत्र पाहतो आणि तिला माघारी वळवणं अशक्य आहे, हे जाणवून तो तिला न भेटताच तिथून आणि तिच्या आयुष्यातून निघून जातो.

'एखाद्या चित्रपटावर टीकाटिप्पणी करताना चित्रपटसमीक्षक चित्रपटदिग्दर्शकाच्या भावना, कल्पना, विचार लक्षात घेत नाही' असं मत स्पष्टपणे मांडणाऱ्या स्क्लोएनडॉर्फनं या चित्रपटाविषयी बोलताना सांगितलं, 'सर्कल ऑफ डिसीट' हा केवळ युद्धपट नाही, तर त्यात मानवी मनाचं चित्रण करण्याचा आणि युद्धाची निरर्थकता पटवण्याचा उद्देश आहे. कारण दुसऱ्या जागतिक युद्धानं अनेक जर्मन लोकांच्यावर आपल्या खुणा उमटवलेल्या आहेत आणि आम्हीही त्यातलेच एक आहोत. त्यामुळे केवळ प्रचारकी थाटाचा चित्रपट निर्माण करण्याऐवजी भावनिक पातळीवरून या चित्रपटाची हाताळणी केली आहे तसेच कुठल्याही प्रकारच्या विचारांनी प्रभावित होऊन मी चित्रपट तयार करत नाही. कारण त्यामुळे कुठल्याही समस्येवर तोडगा निघतो असं मला वाटत नाही. त्यामुळं सर्वसामान्य आयुष्याचं चित्रपट करण्यावरच माझा अधिक कटाक्ष असतो.'

'सर्कल ऑफ डिसीट', 'टीन ड्रम', 'दि लॉस्ट ऑनर ऑफ कॅथरिन ब्लूम' असे तीन चित्रपट फिल्मोत्सवात दाखवले गेले आणि या चित्रपटाचा दिग्दर्शक स्क्लोएनडॉर्फनं 'कुठल्याही चित्रपट-दिग्दर्शकाला चित्रपट निर्माण करताना स्वत:शी असलेली बांधिलकी आणि समाजाशी असलेली बांधिलकी या दोन्हीचा तोल राखणं ही अतिशय आवश्यक गोष्ट आहे' असही सांगितलं.

व्होल्कर स्क्लोएनडार्फ याची पत्नी मार्गारेट फॉन ट्रॉटानही दिग्दर्शिका, पटकथालेखिका आणि अभिनेत्री अशा तिहेरी भूमिकातून चित्रपटसृष्टीला चांगली परिचित आहे. सुरुवातीच्या काळात फासबिन्डर आणि स्क्लोएनडॉर्फ यांच्या चित्रपटातून काम करत असतानाच स्क्लोएनडॉर्फ आणि मार्गारेट फॉन ट्रॉटा यांचं प्रेम जमलं आणि त्याची परिणती या दोघांच्या विवाहात झाली. अर्थात विवाहानंतरही दोघांचीही करियर आपल्या वाटांनी स्वतंत्रपणे मार्गक्रमणा करतच राहिली.

**—शुभदा रानडे**



# फिल्मोत्सव–८४

# आलम चित्र दुनियेचा 'कॅलिडिस्कोप'

आपल्याकडच्या दलित–ग्रामीण कथेशी नातं सांगणारा आशयसमृद्ध आफ्रिकन सिनेमा ...तर अंतराळ सफरी, अशा एक्स्ट्रा–टेरेस्ट्रिअल विषयात रमणारा जादुई तंत्राचा झगमगीत अमेरिकन सिनेमा ... महायुद्धाच्या जखमा अद्यापही ओल्या असल्याची साक्ष पटविणारा फ्रेंच, जर्मन, जपानी सिनेमा ...

ओशिमा, वाज्दा, गोदार्द, बर्गमन या अभिजात दिग्दर्शकांच्या ताज्या कलाकृती. आपापल्या देशांचा वसा आणि ठसा घेऊन आलेले हे परदेशी ४०–५० देशांचे शे–दोनशे चित्रपट आणि

# इंडियन पॅनोरमा

**विषयातील वैविध्य राखणारा भारतीय सिनेमा**

एकीकडे आपल्या परंपरांचा अस्सलपणा ( आदि शंकराचार्य ) प्रतित करणारे चित्रपट, तर दुसरीकडे 'हरणाऱ्यां'ची लढाई दाखविणारे 'अर्धसत्य', 'आकाश'सारखे समकालीन सिनेमे. शिवाय मा. विनायक, गुरुदत्त, वासन यांचा 'नॉस्टेलजिया', 'कागज़ के फुल'च्या दुःखद स्मृती तर 'ब्रह्मचारी', 'मि. संपत'मधील विनायक-मोतीलालचा नादी उत्साह.

**'मेट्रो'चा भोज्ज्या धरून मुंबईतील सात-आठ थिएटर्सशी खांबखांबोळी खेळत 'माणूस' प्रतिनिधिने टिपलेला–**

# फिल्मोत्सव – ८४

त्यातील क्षणचित्रे, नवे 'ट्रेंड' सांगणारा, या सर्वच चित्रपटांचा सविस्तर आढावा घेणारी खास पुरवणी–छायाचित्रांसहित.

# 'माणूस' पुढील अंकी

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No PN–28


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन. मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**
**मूळ किंमत : रु. १५०/- किमान**
**सवलत मूल्य : रु. ९५/- फक्त (ट. ख. स्वतंत्र)**
**पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.**
**आज पासून सर्वत्र नोंदणी सुरू.**

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०

आमची पंधरावी कला